# संपादकीय

प्रसिद्ध इतिहास संशोधक कै. प्रा. दत्तो वामन पोतदार १९३५ साली साहित्य संमलेनाच्या निमित्ताने अहमदनगरमध्ये गेले असताना त्यांना एका कोशकाराचा शोध लागला व त्याची ओळख त्यांनी त्या वेळच्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतून करून दिली (सदर लेख आम्ही या अंकात पुन्हा प्रकाशित केला आहे). ग्रंथपारखी नजरच अशी रत्ने शोधू शकते. आम्ही ग्रंथपालांनी यातून काय बोध घ्यायचा ? आमच्या ग्रंथालयात असणारी अनमोल ग्रंथांची रत्नेही जर आम्हाला माहीत नसतील तर कोणाला बोल लावणार ? ग्रंथपालाची नजर अशी भेदक हवी (दटावणी या अर्थाने हा शब्द घेऊ नये). ग्रंथाच्या आरपार जाणारी सूक्ष्म दृष्टीच असा शोध घेऊ शकते. अशी दृष्टी एका दिवसात प्राप्त होत नाही. वषानुवर्षे ग्रंथांचे परिशीलन करावे, तेव्हा कुठे थोडी-थोडी दृष्टी प्राप्त व्हायला लागते. यासाठी वाचनाची सवय असायला हवी, नसल्यास ती जडवून घ्यायला हवी.

ग्रंथपालाचे वाचन हा एक इतरांच्या तुलनेत जरा भिन्न प्रकार आहे. ग्रंथपालाचा आवडीचा विषय वेगळा असू शकतो. त्या विषयातले वाचन त्याने जरूर करावे; परंतु व्यावसायिक गरजेसाठी जे वाचन करावे लागते ते वेगळे असते व अशा व्यावसायिक गरजेचे वाचन करण्याची कला ग्रंथपालाला जोपासावी लागते.

व्यावसायिक गरजेचे वाचन कसे असते ? ग्रंथालयात दाखल झालेल्या नवीन पुस्तकांच्या वर्गीकरणासाठी केलेले वाचन ही या वाचनाची पहिली पायरी असली तरी त्याचा प्रारंभ ग्रंथनिवड प्रक्रियेतच सुरू होतो; परंतु ग्रंथनिवड प्रक्रिया अनेकदा त्या त्या विषयाच्या विभागप्रमुखांच्या हातात असल्याने त्यात ग्रंथपालाला फारसा वाव उरत नाही. अशी परिस्थिती असली तरी ग्रंथालयातील जुन्या-नव्या ग्रंथांचे वाचन करण्याकडे ग्रंथपालाचा ओढा असायला हरकत नाही. वर्गीकरणातून, ग्रंथनिवडीतून जसे ग्रंथवाचन होते, तसेच ते तालिकीकरणाच्या प्रक्रियेतून होते. किंबहुना तालिकीकरणातून व वर्गीकरणातून व्यवसायाची गरज भागवणारी दृष्टी निर्माण करणारे वाचन होते असेच म्हणायला हवे. **एखादा ग्रंथ वाचक कोणकोणत्या अंगाने (Assess points) मागू शकतो याचे भान तालिकीकरण प्रक्रिया देत असते.** आज मात्र चित्र असे आहे की ग्रंथपाल फक्त वर्गीकरण करतात व तालिकीकरण त्यांचे सहकारी करतात. त्यांच्याकडे अशी दृष्टी असतेच असे नाही. संगणकाचे महत्त्व मोठ्या हिरीरीने मांडणारे ग्रंथपाल ग्रंथांचे विविधांगी Access point नोंदवताना मात्र दुर्लक्ष करतात. मग त्या संगणकाचा उपयोग काय असा प्रश्न निर्माण होतो. असे विविधांगी Access points लक्षात येण्यासाठीच व्यावसायिक वाचनाची गोडी लावून घ्यायची आवश्यकता असते.

व्यवसायाच्या दृष्टिकोनातून वाचन करायचे म्हणजे नेमके काय कारायचे ? काय वाचायचे! याचा प्रारंभ Imprint page पासून होतो. प्रकाशकाचा इतिहास साक्षात उभा करणारे हे पान



आहे. ते पान वाचायला शिकायला हवे. ग्रंथपालाला ते ज्ञात असते. पुढे प्रस्तावना, पुरस्कार, प्रकाशकाचे - लेखकाचे मनोगत, इत्यादी पृष्ठे इतरांच्या दृष्टीने बिनमहत्त्वाची असली तरी ती ग्रंथपालांच्या दृष्टीने अनमोल असतात. त्यातून जी माहिती मिळते त्यातूनच दृष्टी तयार होत जाते. आम्ही ग्रंथपाल काय करतो, जर मुखपृष्ठावरील ग्रंथशीर्षकातून आम्हाला वर्गीकरण क्रमांक काढता आला नाही, तर आम्ही अनुक्रमणिकेकडे वळतो, तिथेही ग्रंथाचा विषय समजला नाही, तरच आम्ही प्रस्तावनेकडे वळतो. प्रस्तावनेतून ग्रंथविषय ध्यानात आला की आमचा जो प्रस्तावनेशी संपर्क तुटतो तो कायमचा ! एकदा वर्गीकरण झाले की त्या ग्रंथाची निर्देशसूची, परिशिष्टे, आकृत्या,आलेख, छायाचित्रे, रकाने, रेखाचित्रे, ब्लर्बवरील मजकूर, लेखक-प्रकाशकांच्या इतर पुस्तकांची असणारी माहिती या सर्वांकडेच आमचे दुर्लक्ष होते आणि ग्रंथ विराजमान झाल्यावर तर आम्ही त्याला विसरूनही जातो.

पारखी नजर तयार होणाच्या दृष्टिकोनातनू प्रस्तावना, पुरस्कार इत्यादी मजकूर मनापासून वाचायला हवा. अनेक पुस्तकांच्या प्रस्तावना या ग्रंथाची, विषयाची, लेखकाची इतकी ऐतिहासिक माहिती पुरवतात की त्यातून ग्रंथपालाचा बौद्धिक विकास होतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. वानगीदाखल एकदोन देतो. प्रा. रा. ना. वेलिंगकर यांचा 'ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार' नावाचा एक कोश मराठी संशोधन मंडळाने प्रकाशित केला आहे. त्याला प्रा. अ. का. प्रियोळकरांनी पुरस्कार लिहिला आहे. त्यात त्यांनी ज्ञानेश्वरीच्या संदर्भात निर्माण झालेल्या शब्दकोशांचा इतिहास दिला आहे. तो इतका रोचक आहे की त्यातून एखाद्याला शब्दकोश निर्मितीची प्रेरणाच मिळावी; परंतु त्यात त्यांनी एक जो उल्लेख केलाय तो म्हणजे शोधक दृष्टी तयार होण्याचा उत्तम पाठच म्हणता येईल. ज्ञानेश्वरीच्या कठीण शब्दांचे अर्थ तळटिपेत प्रथम देण्याचे श्रेय प्रियोळकरांनी पांडुरंग विठ्ठल रानडे यांना दिले आहे. ही ज्ञानेश्वरी १८८६ मध्ये प्रकाशित झाल्याचे ते सांगतात. या प्रतीचा उल्लेख दाते यांच्या ग्रंथसूचीत नाही आणि डॉ. मु. ग. पानसे यांच्या सूचीतही नाही. या ग्रंथाची एक प्रत प्रियोळकारांना फक्त पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयात पाहायला मिळाली. आता हा उल्लेख इतका महत्त्वपूर्ण आहे की त्याचा शोध घेण्यास मन प्रवृत्त व्हावे. आपल्या ग्रंथालयात त्याची दुसरी प्रत आहे का हा शोध प्रथम घेता येतो. नसल्यास इतरत्र कुठे आहे ? सापडल्यास त्या ग्रंथपालाच्या नजरेस ही बाब आणून देता येते. डॉ. म. प. पेठे यांनी 'ज्ञानदेव वाङमयसूची' तयार केली आहे. ते स्वत: पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयात कार्यरत होते. काही काळ ग्रंथपालही होते. त्यांनी त्यांच्या सूचीत ही बाब नोंदवलेली आहे का?* पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयाला याबाबत जाणीव आहे का? असे असंख्य प्रश्न निर्माण होऊन ग्रंथपाल कार्यतत्पर होऊ शकतो. प्रा. प्रियोळकरांचे कोणतेही साहित्य वाचताना हा अनुभव येऊ शकतो.

प्रा. रा. ना. वेलिंगकरांच्या याच पुस्तकातील दुसरे उदाहरण पहा. प्रा. वेलिंगकरांनी या पुस्तकाला मनोगत लिहिले आहे. त्यात त्यांनी ज्ञानेश्वरीकडे त्यांना सी.डी. देशमुख यांनी कसे

* डॉ. म. प. पेठे यांच्या 'ज्ञानदेव-वाङ्मय-सूची' (आ. १ ली) १९६८, या ग्रंथात प्रस्तुत ग्रंथाचा समावेश नाही, मात्र पेठे यांच्या 'श्रीज्ञानेश्वर वाङ्मय-सूची' संक्षिप्त (१९९४) या पुढील सूचीत सदर ग्रंथाचा समावेश डॉ. पेठे यांनी केला आहे.

वळवले ते सांगून या कोशाच्या कार्याबद्दल प्रत्येक भेटीत देशमुखांबरोबर कशी चर्चा होत असे हे लिहिले आहे. आता सी. डी. देशमुखांचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीसाठी ही नोंद उपयुक्त ठरते, पण हे केव्हा लक्षात येणार जेव्हा तो मजकूर आम्ही वाचू तेव्हाच.

व्यावसायिक गरजेचे वाचन करताना प्रस्तावना इत्यादी मजकूर वाचणे जसे अगत्याचे असते, तसेच विविध प्रकारच्या सूचींचे वाचन आवश्यक ठरते. कोणी म्हणले की सूचींचे काय वाचन करायचे ? पण सूचींचे वाचन एकदा करायला शिकलो की त्यातील मजा लक्षात येईल. एखाद्या कादंबरीपेक्षाही ते अधिक रोचक असते. इतकी विपुल आणि विलक्षण भिन्न पद्धतीची महिती मिळते की त्यातून नवाच आनंद मिळतो. माहीत नसणाऱ्या कितीतरी बाबी ध्यानात येतात. काही नवे विषय समजतात. नवे लेखक गवसतात. जुने वाद नव्याने समोर येतात. जुना विषय नव्यानेच समोर उकलत जातो. पुस्तक, लेख, टीका, चर्चा, भांडणे यांची नव्याने ओळख होते. मराठी नियतकालिकांची सूची तर अनेक नवीन पुस्तकांचे निर्मितिस्रोतच असल्याचे जाणवत राहते, जेव्हा आपण त्यांचे वाचन करतो.

नियतकालिके, त्यांतील लेख, जाहिराती, कोशातील नोंदी व नोंदीच्या तळाशी असणारी यादी अशा विविध साधनांच्या द्वारा ग्रंथपाल व्यवसायाभिमुख वाचनात निष्णात होत जातो आणि मग जेव्हा जेव्हा तो ग्रंथालयात वा ग्रंथांच्या सहवासात असतो, मग ते त्याचे ग्रंथालय असो वा इतरांचे, तेव्हा तो याच नजरेने सर्वत्र फिरतो, यातूनच त्याला नवे सापडू शकते, नवनवा विचार-माहिती तो वाचकांना देऊन त्यांनाही प्रवृत्त करू शकतो. वाचणाऱ्या ग्रंथपालाची नजर 'भेदक' होते ती ही अशी.

**– संपादक**

❑❑❑

## ग्रंथपारखी नजर – १

सेन्ट्रल बुक डेपोमध्ये मला मुंबईच्या गव्हर्नरच्या पत्नीचा – लेडी फॉकलंडचा – 'चाऊ-चाऊ' नावाचा १८५८ साली प्रसिद्ध झालेला प्रवासवर्णनात्मक द्विखंडात्मक ग्रंथ मिळाला, तेव्हा मला स्थानीय इतिहासनामक स्मरणरंजनी वाचनाची नुकतीच गोडी लागली होती. मुंबई – पुणे – वाई – महाबळेश्वर... अशी मुंबई इलाख्यातल्या एकेक शहरांना दीडशे वर्षांपूर्वी भेटी देणाऱ्या लेखिकेनं केलेलं रसाळ वर्णन मी किती अधाशासारखं वाचून काढलं होतं, ते आजही स्मरतं. माझी मासिक मिळकत पंधराशेच्या आसपास असताना या द्विखंडात्मक ग्रंथासाठी चारशे रुपये देताना हृदयाचे एक-दोन ठोके चुकलेही होते. ग्रंथ वाचून काढू आणि पैशाची गरज भासली तर तो परत विकून टाकू, कोणीही धनिक ग्रंथसंग्राहक तो घेईल, अशी मी मनाची समजूत काढली आणि धारिष्ट्य केलं. आजपर्यंत तरी तो ग्रंथ विकण्याची पाळी माझ्यावर आली नाही.

'अक्षरनिष्ठांची मांदियाळी'
डॉ. अरुण टिकेकर, मुंबई, डिंपल पब्लिकेशन, २००५. पृ. ४६.



# प्रा. जे. एच. शेरा यांची तत्त्वप्रणाली – भाग १

डॉ. प्रदीप कर्णिक

*ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातले विचारवंत प्रा. जे. एच. शेरा यांनी १९६५ साली Social Epistemological Foundatiim for Libraries नावाची तत्त्वप्रणाली मांडली, सातत्याने त्याबाबत आपले लेखन प्रसिद्ध केले. १९९५ साली जे. एम. बड यांनी शेरा यांच्या तत्त्वप्रणालीकडे पुनर्भेट देण्याची आवश्यकता विशद केली व त्यांच्या विचाराचा चिकित्सकपणे ऊहापोह केला. शेरा यांचे विचार नेमके कसे आहेत, त्यांच्या विचारांवर टीकाकारांची मते काय आहेत आणि इतक्या वर्षांनंतरही ते कसे लागू पडतात या सर्वांचा हा आढावा.*

Social Epistemology या तत्त्वप्रणालीवर प्रा. जे. एच. शेरा यांनी सातत्याने भर दिलेला दिसून येतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या शाखेत अलीकडे या प्रणालीचा विचार विस्ताराने आणि खोलात जाऊन केला जातोय.

Social Epistemology चा विचार पुढील मुद्यांच्या आधारे करणे आवश्यक आहे.

(१) जे.एच.शेरा यांना अभिप्रेत असणारी Social Epistemology ची प्रणाली नेमकी कशी आहे ? त्यात त्यांनी नेमके काय मांडले आहे.

(२) शेरा यांच्या SE प्रणालीचा विचारवंतांनी कसा स्वीकार केला ? त्याबाबत काही मतभेद आहेत का?

(३) शेरा यांच्या दृष्टिकोनातून आणि विचारवंतांच्या मतांनुसार या प्रणालीचा पुनर्विचार करावा काय? केल्यास तो काय असेल ?

(४) ही प्रणाली वापरून एखाद्या ग्रंथालयाचे विश्लेषण करणे शक्य आहे काय? असल्यास त्या विश्लेषणाचे स्वरूप कसे असेल/ असावे?

या मुद्यांचा विस्ताराने विचार करणे आवश्यक आहे.

## (१) जे. एच. शेरा यांचा सोशल ऍपिस्टेमॉलॉजी बाबतचा दृष्टिकोन

१९५२ साली Social Epistemology ही संकल्पना जे. एच. शेरा यांनी प्रथम वापरली तरी त्या संकल्पनेचे श्रेय शेरा यांनी Margaret E. Egan[१] यांना दिले आहे. पुढे मात्र आयुष्यभर शेरा यांनी या संकल्पनेच्या विस्तारासाठी सातत्याने प्रयत्न केले.

काय आहे शेरा यांची ही संकल्पना ? शेरा यांना अभिप्रेत असणारी SE ची संकल्पना पुढीलप्रमाणे आहे –

'An Epistemological Foundation for Library Science'[२] या प्रकरणात जे. एच. शेरा यांनी Social Epistemology चा विस्ताराने विचार केला आहे. शेरा याचा विचार पुढील प्रमाणे करतात –

(1) Need of Information

(2) Need of New Epistemological Disicipline

(3) The Nature of knowledge

(4) The classification of knowledge

(5) Social Epistemology and the Sociology of knowledge

(6) Social Epistemolgy and the Library

वरील सहा मुद्यांचा विचार विस्ताराने लक्षात घेणे आवश्यक आहे, त्याशिवाय शेरा यांची संकल्पना स्पष्ट होणार नाही.

### १.१ माहितीची गरज (Need of Information)

शेरा मानवाच्या मूलभूत गरजांपासून विचार करतात. हवा, पाणी, अन्न आणि निवारा या मानवाच्या चार मूलभूत गरजा आहेत. मानवाच्या या चार गरजांमध्ये John Reader Platt यांनी 'Information' पाचव्या गरजेचा समावेश केला, त्याचा आधार शेरा घेतात.[३]

> "The Fifth need of man is the need for what can be called - in a mathematical sense- 'Information' for a continuous, novel, unpredictable, nonredundent and surprising flow of stimuli."

Platt यांचे हे वाक्य उद्धृत करून शेरा असे प्रतिपादन करतात की माहिती (Information) ही मानवाच्या मेंदूची गरज आहे.[४]

> "The brain also exists in order to organise and to weave pattenrs from information presented to it, and it becomes seriously deranged if this essential opportunity is denied. This activity of organising input information not only characterizes the sane mind but is also necessary to maintenance of sanity."

मेंदूला ही गरज सातत्याने पडत असते. नवनवीन माहिती जमा करणे, त्याची प्रक्रिया



(Process) करणे ही क्रिया nervous system चा एक भाग झालेला असतो. मानवाच्या बौद्धिक विकासामध्ये या प्रक्रियेचा फार मोठा वाटा आहे. तसेच मानवाची शिकण्याची जी क्रिया असते त्यासाठीही या प्रक्रियेची गरज असते. मेंदूचा अत्यंत लहान भाग जन्मत:च मानवाबरोबर येतो, पण त्याच्या मोठ्या भागाचा विकास मात्र Stimulation आणि अनुभवामुळेच होतो.

मेंदूच्या या गरजेबाबत शेरा यांनी असे मत मांडले आहे की, माणसाच्या जगण्यासाठी माहितीची (Information) आवश्यकता असते. त्याशिवाय माणसाचे अस्तित्वच धोक्यात येईल.[५]

> "A constant need of the brain for something upon which to feed - for information - may be seen as a basic human drive, and the power to communicate becomes not a happy and fortuitous invention, but an inevitable essential to man's survival."

शेरा यांनी मेंदूच्या या गरजेची आवश्यकता एका व्यक्तीच्या बाबत मांडून हीच गरज व्यक्तिसमूहाच्या म्हणजे समाजाच्या बाबतीतही आहे, या विषयाकडे ते अभ्यासकांचे लक्ष वेधतात. शेरा यांच्या या भाष्यातून ग्रंथालयाच्या दृष्टीने अनन्यासाधारण महत्त्व आहे.

इथून शेरा समाजाकडे वळतात आणि नवीन ज्ञानशाखेच्या गरजेची संकल्पना प्रस्थापित करतात.[६]

For the discussion and analysis of the society's need for information, Shera argues that there is a need for new discipline as the then existing discipline of Epistemology considers only information need at individual level.

### १.२ नवीन ज्ञानशाखेची गरज

SE प्रणालीचा पाया शेरांच्या मते संप्रेषण (Communication) आणि माहिती (Information) हा आहे व त्याच्याशिवाय समाजाची बौद्धिक प्रगती होऊ शकत नाही, तसेच समाजाची ती अंगभूत व मूलभूत गरज आहे, माहिती (Information) आणि ज्ञान (knowledge) यांतला फरक शेरा यांना Epistemology च्या विचारांकडे नेतो.

जे. एच. शेरा पुढे मात्र Epistemology च्या प्रांतात प्रवेश करतात. या शाखेचे तज्ज्ञ Epistemology या क्षेत्रात, ज्ञानाचा विचार 'a body of knowldge about knoweldge itself 'असा करतात. पण अभ्यासानंतर त्यांना असे आढळून आले की या ज्ञानशाखेचा अभ्यास व्यक्तीच्या बौद्धिक विकासाच्या संदर्भातच करण्यात येतो. "The study of epistemology has always been seen against a background of the intellectual processes of an individual." आणि त्याबाबत अजून अधिक संशोधन होण्याची गरज आहे. ती गरज शेरा यांनी अशी मांडली आहे की,[७]

"The manner in which knowledge has developed and has been augmented has long been a subject of study, but the ways in which knowledge is coordinated, integrated and put to work is, as yet, an almost unrecognised field for investigation."

शेरा पुढे जाऊन असंही मांडतात[८] की "neither epistemologists nor psychologists have developed an ordered and comprehensive body of knowledge about intellectual differentiation and the integration of knowledge within a complex social organization.

इथे शेरा समाजाच्या बौद्धिक विकासप्रक्रियेच्या अभ्यासाची गरज विशद करतात. व्यक्तीच्या बौद्धिक विकासाची प्रक्रिया आणि समाजाच्या बौद्धिक विकासाची प्रक्रिया यात मूलभूत फरक असल्याने शेरा यांना नवीन ज्ञानशाखेची आवश्यकता भासते.[९] ही ज्ञानशाखा म्हणजे Social Epistemology.

"The new discipline that we here envisage (and which, for want of a better name, we have called social epistemology) should provide a framework for the effective investigation of the entire complex problem of the intellectual proceses of society - a study by which society as a whole seeks a perceptive relation to its total environment."

समाजाच्या बौद्धिक विकास प्रक्रियेच्या अभ्यासाचा प्रमुख झोत (focus) सुद्धा काय असायला हवा हेही शेरा यांनी नमूद केले आहे.[१०]

"The focus of this new discipline will be upon the production, flow, integration and consumption of all forms of communicated thought throughout the entire social problem. From such a discipline should emerge a new body of knowledge about, and a new synthesis of the interaction between knowledge and social activity."

या विचारामध्ये निर्मिती (Production), प्रवाह (Flow), एकसंघता (Integration), आणि वापर (Consumption) याला महत्त्व तर आहेच; पण त्याचबरोबर ज्ञान (Knowledge) आणि सामाजिक क्रिया (Social activity) मधील देवाणघेवाणीला (Interaction) शेरा यांनी महत्त्व दिले आहे.

वैचारिकतेच्या निर्मितीचे सर्व प्रकारचे घटक (forms) हे सामाजिक प्रश्नांबाबतच्या (Social Problem) संप्रेषण माध्यमातून कसे (Communicate) होतात याकडे शेरा यांनी लक्ष पुरवले आहे. सामाजिक क्रिया आणि ज्ञान यांचे आदानप्रदान कसे होते या संशोधनावर नवीन ज्ञानशाखेचा भर असला पाहिजे असे शेरा यांना वाटते.

त्यामुळे शेरा 'ज्ञान' या संकल्पनेच्या आणखी मुळाशी जाण्याचा प्रयत्न करतात. लिखित स्वरूपाचे जे ज्ञान आहे त्याच्या बद्दलची समज असणे इतकीच आवश्यकता पुरेशी नाही, तर ज्ञानाचा समाजातील भाग (Role) काय आहे ते पाहणे अत्यावश्यक आहे असे त्यांना वाटते.



या सामाजिक भूमिकेच्याही (Role) मुळाशी जाण्यासाठी शेरा काही प्रश्नच उपस्थित करतात.[११]

(1) How man knows ?
(2) How society knows ?
(3) How personal knowledge becomes social knowledge ?
(4) How the history and philosophy of knowledge have evolved through time and in various cultures ?
(5) How the library mechanisms and systems are useful to communicate the knowlege to the society ?

## १.३ ज्ञानाचे स्वरूप (The Nature of Knowledge)

शेरा यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा विचारही त्यांनी अनेक प्रकारचे दाखले देऊन केला आहे.

ज्ञान म्हणजे काय (What knowledge is) याचा विचार करताना शेरा Webster's च्या तिसऱ्या आवृत्तीत विचार करतात. या Dictionary ने १२ व्याख्या दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. 'Syntopicon of the Great Books of the Western World' या पुस्तकाचाही दाखला त्यांनी दिला आहे. Karl Deutsch, Kenneth Boulding यांच्या Term चा ही विचार केला आहे.

तात्त्विक विचारांच्या चर्चेकडून ते Boulding[१२] यांच्या विचाराचा स्वीकार करतात, कारण ग्रंथालयाच्या संदर्भात त्या संकल्पनेला महत्त्व आहे.

"We follow Boulding in distingusihing between information and knowledge, despite Fritz Machlup's proposal " that we get rid of the duplication 'knowledge and information' ..... we may occasionally refer to certain kinds of knowledge as 'informatiom', but we shall avoid, the redundant phrase 'knowledge and information'. The present writer, however, sees, a clear distinction between the two, probably derived from the terminology of informatiom theorists : information is the input of knowledge and is always received through the senses, no matter what or how many devices may intervene betwneen transmitter and receptor."

ग्रंथालयांच्या संदर्भात आणखी मूलभूत विचाराकडे शेरा ज्ञान आणि माहितीच्या संदर्भात गेले आहेत.[१३]

"The extent to which the library as an information system is involved in the knowledge-situation is not accidental. The use of the library and the knowledge-situation are generically related in much as the former is one manifestation of the latter. The knowledge situation, or knowledge process, is a unity of subject vehicle, and object."

या व्याख्या स्पष्ट होण्यासाठी शेरा यांनी आकृतीही (digram) सादर केली आहे.[१४]

| | | |
|---|---|---|
| The Library User → | The Library's Bibliographic → | Intellectual |
| (Subject) | Apparatus | Content of the Library Store |
| | (vehicle) | (Object) |

या आकृतीच्या स्पष्टीकरणार्थ शेरा असे नमूद [१५] करतात की,

"The Library is more than an important link in the communicaton chain, as an intellectual system it is part of the total knowledge-situation. The Librarian must be concerned not only with that which is known, but also with the intellectual condition or state of knowing. This condition is both personal and social, and the librarian must operate in two worlds at once, the microcosm of the individual and the, macrocosm of the culture in which the individual resides and with which he must work out a harmonious relationship."

ज्ञानाच्या संदर्भात शेरा जास्त महत्त्व माहिती आणि संप्रेषणाला देत असले तरी ज्ञानाचे जे वर्गीकरण अनेक तज्ज्ञांनी केले आहे त्याकडेही ते लक्ष पुरवतात.

## १.४ ज्ञानाचे वर्गीकरण

ज्ञानाच्या वर्गीकरणाचा विचार करतानाही शेरा यांनी अनेक तत्त्वज्ञ मंडळींची वर्गीकरण पद्धती विचारात घेतली आहे. विशेष म्हणजे डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वर्गीकरणाचाही विचार केला आहे.

शेरा ज्ञानाच्या वर्गीकरणाचा विचारही संप्रेषणाच्या अंगानेच करतात.[१६]

"The study of the functions of knowledge in society asks the question, 'who knows, and why and for what purpose?' Thus, there can be no absoultes in the classification of knowledge according to function. Instrumental knowledge, to use Scheler's grouping, for the professional man may be intellectual knowledge for layman : a knowledge of thermodynamics is instrumental knowledge for the physicist and intellectual knowledge for the librarian, while the understanding of the principles of bibliographic organization is instrumental to the librarian and intelletual to the physicist. To the bibliophile, however, the lore of books is probably more spiritual than eighter instrumental or intelectual."

Machlup च्या वर्गीकरण पद्धतीचाही शेरा विचार करतात. त्याचे कारण "the subjective meaning of the knonwn to the knower is the most useful for persent purposes" असे त्यांना वाटते. त्यासाठी ते त्याचे ५ प्रकारही सांगातत आणि



"subjectively new and socially new knowledge यामधला फरकही नोंदवतात आणि ग्रंथपाठाच्या दृष्टीने त्याचे महत्त्वही विशद करतात.[१७]

" Investigations into the rate of obsolescence of knowledge are still far form exetensive and would be of tremendous value to the librarian, even through social utility is not necessarily to be measured only in terms of its rate of decay."

यानंतर ते Sociology of knowledge च्या चर्चेकडे वळतात.

## १.५ Social Epistemology and the Sociology of Knowledge

Kenneth Boulding आणि Don K. Price यांच्या विचारांचा आढावा[१८] घेऊन शेरा अस नमूद करतात की,

Social epistemology is related to, but in a sense is the reverse of, the sociology of knowledge. The sociology of knowledge reveals very clearly the distinction between information and knowledge, for the former does not admit of sociohistorical perspective.

The assertion, to cite the simplest example that two plus two equals four gives no clue as to when, where, and by whom it was formulated. Perspective becomes important when the validity of the information is in doubt. We cannot here become involved with a consideration of the nature of truth, but it is important to record that it is at the point of validation, that information passes the barrier into knowledge."

Sociolgy of knwoledge च्या संदर्भात ते संस्कृतीचाही विचार करतात; पण त्यासाठी ते Boulding यांचाच दाखला देतात.[१९]

"Every culture, as Boulding has shown, produces a 'transcript' a record in more or less permanent form which cab be handed down from generation to generation."

पुढे ते नमूद करतात- समाज ज्ञानाची प्राप्ती दोन माध्यमांतून करून घेतो. थेट अनुभव (direct experience) आणि लिखित नोंदी (the record or transcript) व ज्ञानीय सत्र (areas of knowledge) आणि विविध संस्कृती (different cultures) मधून हे ज्ञान समाजापर्यंत जाते.[२०]

"The growth of public knowledge is part and parcel of the growth and organization of society" असं नमूद करून Margaret Mead यांचा दाखला देतात.

ज्ञानाचे स्वरूप (Nature of knowledge), ज्ञानाचे वर्गीकरण (Classification of knowledge) आणि Sociology of knowledge या सर्वांचा

विचार शेरा यांनी केवळ ५ प्रश्नांचा वेध घेण्यासाठी केला आहे. माणसाला ज्ञान कसे मिळते, समाजाला कसे ज्ञान मिळते, इत्यादी. ते ५ प्रश्न मागे आले आहेत.

शेरा यांनी हा जो वेध घेतला आहे. तो केवळ स्वत:च्या विश्लेषणाद्वारे नसून त्यासाठी त्यांनी अनेकांचे दाखले दिले आहेत. या विश्लेषणाद्वारे ते कायम संप्रेषणाचा मुद्दा अधोरेखित करतात.[२१]

Social Epistemology आणि ग्रंथालयाच्या संदर्भात विचार करताना तर तो अधिकच स्पष्ट होतो.

### १.६ Social Epistemology and the Librany

ग्रंथालयाचा विचार करताना ते प्रामुख्याने ग्रंथपाल आणि ग्रंथपालन व्यवसाय या घटकाची कर्तव्ये, हेतू आणि जबाबदारी दाखवून देण्याचा प्रयत्न करतात.

"Librarianship is primarily concerned with the utilization of the social transcript by human beings it is fundamentally a behavioristic science, but because the method and findings of the physical and biological sciences are being increasingly applied to the study of human behavior, librarianship must be 'scientific' even in the classical use of the term."

पुढे ते असंही म्हणतात-[२२]

"The librarian's responsibility is the efficient and effective management of the transcript, the graphic record of all that society knows about itself and its world."

'The Library as an Agency of Social Communication' या लेखात ग्रंथालयाच्या भूमिकेविषयी त्यांनी अधिक अचूक दिशा दाखवून दिली आहे.[२३]

"The complex communication system that operates today in the western world depends upon many instrumentalities, of which the library is but one. One need not dwell upon the impact that the telegraph, the telephone, the radio and television, not to mention the newspaper and the periodical, have made upon the communication patterns of our society. Each of these has had its effect upon the role of the library. With them has come a new urge on the part of the librarian to assume a vigorously active role in communication. Librarians no longer are content to accumulate materials in anticipation of use, but seek to engage actively in bringing their resources to the attention of those who need them. The growing importance of all types of graphic records to the successful operation of contemporary society, conditioned as it is by and to science and technology, has forced the librarian to search for and adopt new



methods and techniques for making recorded information available not only to scholars but also to business, industry, and government. Effective use of the library has been demanded by the educational system, for elementary and secondary schools as well as institutions of higher learning. In recent years the introduction of automation into a variety of learning and teaching activities has provided the librarian with potentially powerful tools for increasing his effectiveness as a communicator, though the capabilities of these developments have not yet fully realized."

शेरा यांच्या Social Epistemology चा विचार नुसता तात्त्विक पातळीवरील चर्चा, असा न राहता, त्या विचाराला ते प्रात्यक्षिकाची जोड देतात. वस्तुत: Epsitemolyogy ही तत्त्वाज्ञानामधील (Theory of knowledge) शाखा आहे. Truth, Justification for belief अशा तात्त्विक संघटनेचा विचार त्यात केला जातो. Sociology of knowledge हीसुद्धा तत्त्वज्ञान आणि सामाजिक शास्त्र या विषयाची शाखा आहे. त्यात तर असा विचार केलाय की, समाजातील व्यक्तीच्या सहभागाला आणि त्याच्या सामाजिक आयुष्याला कोणती प्रेरणा आहे, त्याच्याकडील ज्ञानाचा, विचारांचा आणि संस्कृतीचा प्रभाव आहे का, आणि असल्यास तो प्रभाव कसा आहे ?

शेरा Epistemology तील ज्ञानाचा सिद्धान्त आणि Social Epistemology मधील संस्कृतीची प्रेरणा यांचे मिश्रण करून हे दाखवून देतात की, ग्रंथालयाचा पाया (Foundation) जर कोणता असेल तर तो Social Epistemology चाच आहे. याचे प्रमुख कारण शेरा यांना दिसून आले ते प्रत्येक ठिकाणी होणारे जे संप्रेषण आहे, तेच आहे.

संप्रेषण ही तर ग्रंथालयाची महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे शेरा ही तत्त्वप्रणाली ग्रंथालयाला देऊन ग्रंथालयाची भूमिका अधोरेखितच करतात. त्यासाठी मार्गही सुचवतात.

शेरा यांच्या तत्त्वप्रणालीचा आढावा घेतल्यानंतर प्रश्न असा निर्माण होतो की LIS शाखेने या प्रणालीचा कसा स्वीकार केला ? तज्ज्ञांचे याबाबत मत काय? ते पाहणे आवश्यक ठरेल.

## (२) जे. एच. शेरा यांची तत्त्वप्रणाली आणि इतर विचारवंत

जे. एच. शेरा यांच्या Social Epistemology च्या संकल्पनेचा विचार दोन भागांत करणे आवश्यक ठरते.

(१) शेरा यांच्या काळात व्यक्त झालेले विचार

(२) शेरा यांच्या निधनोत्तर व्यक्त केलेले विचार.

या दोन्ही काळांत व्यक्त झालेल्या विचारांचा आढावा घेण्यापूर्वी शेरा यांच्याबद्दल थोडी माहिती देणे आवश्यक आहे.

जे. एच. शेरा यांचा जन्म ८ डिसेंबर १९०३ रोजी झाला.

"Over the years, he has been one of the leading commentators and theorists on the American library science. For several years he was a member of that outstanding team, the faculty of the Graduate Library School at the University of Chicago. Since his appointment as Dean of the school of Library Science at Western Reserve University in Cleveland, Ohio, he has brought it into the very front rank, both in its work of education for librarianship and through the center for Documentation and Communication Research in pushing forward the frontiers of knowledge in the development of our professional theory." असं D. J. Foskett यांनी लिहून ठेवलंय.[२४]

त्यांचा मृत्यू ८ मार्च १९८२ साली झाला. शेरा यांनी या काळात अनेक निबंध लिहिले, संशोधनपर पेपर, भाषणे आणि पुस्तके प्रसिद्ध केली. ७९ वर्षांच्या काळात त्यांनी सातत्याने Social Epistemology या संकल्पनेवर विचार केला. त्याचा विस्तार करण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

त्यांच्या हयातीत व पश्चात या संकल्पनेवर ग्रंथालयशास्त्रातील तज्ज्ञांनी विचार व्यक्त केले आहेत. ते समजून घेणे उपयुक्त ठरेल.

## २.१ शेरा यांच्या काळात व्यक्त झालेला विचार

Social Epistemology ही संकल्पना निर्माण करण्याचे श्रेय शेरा यांनी Margaret E. Egan यांना जरी दिले असले, तरी त्यांनी स्वत:च असे नमूद केले आहे की,[२५]

"So far as the present writer knows, Miss Egan never used the phrase in any published writing, but she used it frequently in class lectures and in conversation."

Social Epistemology या संकल्पनेवर आधारित पहिला लेख 'Foundations of a theory of bibliograpy' हा Miss Egan आणि Shera यांच्या संयुक्त नावाने १९५२ साली The Librany Quarterly (vol. 22. No. 2, pp 125-37) मध्ये प्रकाशित झाला. पुढे मात्र Shera यांनी स्वतंत्रपणे या विषयावर लिहिले किंवा भाषणे दिली. त्यातून संकल्पना विस्तारत गेली.

१५ सप्टेंबर १९५४ रोजी Western Reserve University मध्ये 'In the Beginning was the Word' या विषयावर commencement भाषण शेरा यांनी केले. त्यातील काही भाग Documentation in Action (1956) या ग्रंथात समाविष्टही झाला. त्यात Social Epistemology या संकल्पतेच्या उल्लेखामध्ये तळटीपही[२६] दिली आहे.

" a fuller statement of this discipline is to be found in Foundation of a Theory of Bibliography."



१९६१ साली 'Willson Library Bulletin' (vol. 35, June, 1961) मध्ये 'Social Epistemology, General Semantics and Librarianship' (pp 767-770) हा लेख प्रसिद्ध केला.

१९६५ (ऑगस्ट) मध्ये शेरा यांचे 'Libraries and the Organization of Knowledge' हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकात ' In the Beginning was the Word', 'Social Epistemology, General Semantics, and Librarianship', आणि 'Foundations of a Theory of Bibliography' हे लेख पहिल्या भागात समाविष्ट करण्यात आले आहेत. या पुस्तकाला D.J.Foskett यांची प्रस्तावना आहे.[२७] या प्रस्तावनेत Foskett यांनी Social Epistemology विषयी मत नोंदवले आहे.

"In the first section he gives a lucid account of 'social epistemology' - the function of recorded information in the actual working of society. It may at first appear a large claim, but, it is none the less true that the contemporary world could not exist without effective communication; and because we live in a world order (and not merely in a small city or nation state), in which millions of people and vast distances are involved, most communication has to be recorded. Librarianship has always been the profession of looking after the records of civilization and it is therefore proper that librarians should be involved at the centre of thinking in the modern world. Shera's thesis is the 'documentation' - the extension of librarianship from the world of books to the world of information - is more than the mere preserving of information, necessary through that still is. It means also the dissemination of information, it means taking the initiative in creating channels along which information may pass quickly to those who can use it.

Such a role cannot be played extempore. It has to be carefully studied, and a technique elaborated."

१९६५ पर्यंत Social epistemology च्या संकल्पनेचे स्वरूप अत्यंत मर्यादित होते. या संकल्पनेचा विस्तार आणि खोलात जाऊन मांडणी करण्याचा प्रयत्न शेरा यांनी एका चर्चासत्रामध्ये वाचलेल्या पेपरमध्ये केला.

२८-३० जुलै १९६५ रोजी Syracuse University मध्ये 'The Foundaions of Access to Knowledge' या विषयावर झालेल्या चर्चासत्रामध्ये शेरा यांनी 'An Epistemological Foundation for Library Science' असा पेपर वाचला.

या पेपराला L. B. Heilprin यांनी प्रतिसाद दिला. शेरा यांचा पेपर आणि Heilprin यांचा प्रतिसाद इतर पेपरबरोबर Edwared B. Montgomery यांनी संपादित केलेल्या 'The Foundations of Access to Knowledge' या १९६८ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले.

पुढे शेरा यांनी या पेपरमध्ये अधिक भर घालून नव्याने पेपर लिहून काढला. तो या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.

या नवीन पेपरचे स्वरूप विस्तारित तर आहेच; पण त्यात दोनतीन ठिकाणी शेरा यांनी L.B. Heilprin यांना उद्धृत केले आहे.

शेरा यांच्या विचाराल प्रतिसाद देणारे Heilprin हे त्यांचे पहिले महत्त्वाचे समीक्षक ठरतात.

L. B. Heilprin यांनी Social Epistemology विषयी असे लिहिले आहे की,[२८]

"Social epistemology is described as a new kind of epistemology - a theory of knowledge about how society knows as a whole. This apparently contrasts it with traditional epistemology... based on the knowledge of individual. However, we know only as individuals, never as a group or a society. The referent of the concept 'Society' is not a single superbeing but a set of individual... Evidently (the intent is ) to place a new comphasis on an old area. We need to study that part of access to knowledge which affects us all and on which we must act together."

शेरा यांना Heilprin यांचे विचार आणि प्रतिसाद महत्त्वाचा वाटला होता. त्यांनी या सुधारित लेखात Heilprin यांना उद्धृत तर केले आहेच, पण लेखाचा शेवट Heilprin यांचे दीर्घ अवतरण देऊन केला आहे.

याच लेखात शेरा यांनी दोन पुस्तकांचे दाखले दिले आहेत, की जी त्यांच्या संकल्पनेशी समांतर आहेत.

(1) Fritz Machlup यांचे 'The Production and Distribution of Knowledge in the United States'

(2) Frederick Harbison & Charles A. Myers यांचे 'Eductaion, Manpower and Economic Growth.'

या दोन्ही पुस्तकांबाबत शेरा यांनी असे म्हटले आहे की,[२९]

" In recent years there have appeared two inportant books that are aimed in the direction of providing a foundation for the kind of discipline here indicated, neither work could properly be called 'social epistemology' as the term is here employed, but each is dealing in certain ways with the problems with which 'social epistemology' is concerned."

हा समान दुवा खुद्द शेरा यांनाच सापडला असल्याने हाही संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

१९५२ ते १९६८ असा कालवधी शेरा यांना ही संकल्पना अभ्यासपूर्ण मांडण्यासाठी लागला. पुढे ते या संकल्पनेच्या विस्ताराकडे फारसे वळलेले दिसत नाहीत.



ऑक्टोबर १९७३ मध्ये B.C. Brookers यांनी 'Journal of Librariansip' या नियतकालिकात 'Jesse Shera and the Theory of Bibligraphy' असा लेख लिहिला, तर Goldman Alvin यांनी 'Foundations of Social Epistemics' असा लेख 'Synthese' मध्ये (Oct.1973) लिहून त्यांच्या संकल्पनेचा एका परीने स्वीकारच केलेला दिसतो.

## २.२ निधनोत्तर व्यक्त झालेले विचार

'Social Epistemology' या संकल्पनेच्या अंगाने पुढील काळात विस्तार झालेला दिसून येतो. यामध्ये Steve Fuller यांचा प्रामुख्याने विचार करायला हवा.

'Social Epistemology' नावाचे पुस्तक Fuller यांनी 1988 मध्ये प्रकाशित केले. १९९१ साली त्याची दुसरी आवृत्तीही प्रसिद्ध झाली. १९९६ साली त्यांनी American Philosophical Quarterly मध्ये ( vol. 33 pp 149-66) 'Recent work in social epistemology' असा लेखही लिहिला.

१९९४ साली F. E. Schmitt यांनी 'Sociallzing Epistemology. The Social Dimensions of Knowledge' असे एक पुस्तक लिहिले. असा विस्तार हे शेरा यांचेच श्रेय म्हणायला हवे.

संकल्पनेच्या अंगाने झालेला हा विचार आहे. याबरोबर दोन लेखांचा उल्लेख करायला हवा, जे शेरा यांच्या विचारांवर काही भाष्य करतात.

यामध्ये महत्त्वाचे नाव घ्यायला हवे J. M. Budd यांचे. यांनी दोन लेख लिहिले.

(1) The Library Quarterly (vol. 65 No.3) 1995 च्या अंकात Budd यांनी 'An Epistemological Foundation for Library and Information Science' असा लेख लिहिला.

(2) The Library Quarterly (vol. 72 No.4) ऑक्टोबर २००२ मध्ये 'Jesse Shera, Socialogist of Knowledge' असा लेख लिहिला.

दुसरे नाव आहे Jack Anderson यांचे. यांनी 'Journal of Documentaion, (vol. 58 No.4) च्या 2002 च्या अंकात "The Role of subject literature in scholarly communication. An interpretation based on social epistemology" असा लेख लिहिला आहे.

Jack Anderson यांनी शेरा यांच्या विचाराला LIS मध्ये स्वीकारले गेले नाही असे म्हटले आहे.

"In LIS social epistemology is particularly known through the writings of Egan and Shera (1952). They argued for social epistemology in connection with the creation of a theory of bibliography and defined social epistemology as '... the analysis of the production, distribution and utilization of inteletctual products' (Egan and Shera,1952, pp 33-4). Such an epistemology was needed,

they, argued, because "Cassical" epistemology was/ is centered around ".. the intellectual processes of the individual (Egan and Shera, 1952, p, 132). As a consequence "Classical" epistemology cannot come up with an answer as to what the social - epistemic function of knowledge in Society (and in scinece and scholarship) is. However, Egan and Shera's social epistemology never received that much attention in LIS (except for Wilson1983) which is a dedicated work to this area. Recently, however, Warner (1993,2001) among others, has revived social epistemology in connection with historical analyses of copyright acts viewed as public texts."

Anderson यांनी फक्त शेरा यांचे १९५२ मधलेच लेखन विचारात घेतलेले दिसते. An Epistmological Foundation for Library Science (1968) हा लेख विचारात घेतला असता तर कदाचित असे मत मांडले नसते.

ग्रंथालयशास्त्राने शेरा यांच्या संकल्पनेला स्वीकारले नाही असे जे Anderson म्हणतात तेही बरोबर नाही.

J. M. Budd यांनी 1995 साली लेख लिहून त्यांची दखल तरी घेतलीच; पण 2002 मध्ये जो लेख लिहिला त्याचा उद्देश असा होता :

"Througout his career, Jesse Shera suggested that social epistemology (SE) could provide librarianship with the intellectual basis it needed to evolve. While he spoke of social epistemology on a number of occasions, he did not articulate a completely clear and consistent idea of SE. Given an empasis on knowledge today, it may be time to revisit Shear's writing on SE what emerges is a fuzzy conception of knowledge and an approach that is more sociological than philosophical in nature. Shera's sociological grounding has hepled establish a foundation for the profession, but the foundation can be strengthened by the addition of a more strictly epistemological component."

या लेखामध्ये Budd यांनी शेरा यांच्या महत्त्वाच्या प्रत्येक विधानाचा विचार केला आहे. त्यातील त्रुटी निदर्शनासही आणल्या आहेत.

अलीकडेच प्रसिद्ध झालेला हा लेख असल्याने या लेखाचे महत्त्व शेरा यांच्या संकल्पनेचा पुनर्विचार (revisit) करण्यास उद्युक्त ठरेल असे म्हणतात येईल.

## (३) शेरा यांच्या तत्त्वप्रणालीचा पुनर्विचार

J.H. Shera यांच्या Social Epistemologyचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. Budd यांनी तर त्याची गरज विशद करताना असे म्हटले आहे की,



"Shera's contribution in the area of SE is monumental, but the practice and study of LIS will benefit from a close examination of his ideas and what they imply for the field. His version of SE is, at the end of the day, Sociological. LIS may be in a better position to grow and develop if the implications for knowledge of Shera's writings related to the human use of the graphic record (and graphic record is defined broadly as information recorded in any usable format) were explored. Specifically, LIS can build upon the foundation Shera has provided us by incorporating epistemological grounding into his sociological program."

Budd यांच्या विधानातील 'Close examination of his ideas' हा संदर्भ आणि 'human use of the graphic record' ही संकल्पना वाढवून विस्तारली पाहिजे असे जे सांगितले आहे ते फार महत्त्वाचे आहे.

या व्यतिरिक्त काही गोष्टीही नमूद करायला हव्यात.

(१) शेरा यांनी सर्व चर्चेमध्ये जास्त भर हा ग्रंथपाल किंवा ग्रंथपालन व्यवसायावर दिला आहे. हाच भर जर ग्रंथालय या घटकाला डोळ्यासमोर ठेऊन दिला गेला असता, तर शेरा यांना एखादे 'मॉडेल' विकसित करणे नक्कीच शक्य झाले असते.

(२) शेरा हे व्यवसायाने Libray and Information Science School चे प्राध्यापक/डीन असल्याने त्यांना ग्रंथपाल घडवण्यात जास्त रस होता असे दिसते. ते जर व्यवसायाने ग्रंथपाल (Practicing Librarian) असते तर त्यांनी नक्कीच ग्रंथालय या घटकाला केंद्रस्थानी आणले असते आणि त्यांचे विवेचन वेगळ्या दिशेने गेले असते.

(३) 'Social Epistemology' या संकल्पनेवर विचार करताना ते व त्यांचे विचार (आणि भाष्यही) तत्त्वज्ञानाच्या चर्चेत जास्त शिरलेले दिसते. Epistemology ची स्वतंत्र शाखा निर्माण करण्यात आणि त्याचे व्यासपीठ ग्रंथालयाला मिळवून देण्यात त्यांना अधिक रस होता असे दिसते व म्हणून ही चर्चा तत्त्वज्ञानाच्या प्रांतातली किंवा सामाजिकशास्त्राच्या प्रांतातली जास्त प्रमाणात झाली आहे.

(४) त्यांनी Communication आणि Communicable या संज्ञांना महत्त्व दिले असले तरी त्याचे प्रत्यक्ष कार्य कसे असायला हवे हे मात्र विस्ताराने विशद केले नाही.

(५) ज्ञान या संकल्पनेचा शोध त्यांनी खोलात जाऊन घेतला आहे. तत्त्ववेत्त्यांचे दाखलेही दिले आहेत, तरीही माहितीचे ज्ञानामध्ये रूपांतर कसे होते, केव्हा होते व का होते याचा शोध घेतला नाही. हे ज्ञान पुन्हा समाजात कसे जाते याचाही विचार विस्ताराने केला नाही.

(६) काही ठिकाणी ग्रंथपालाने काय करावे हे सांगितले गेले आहे. परंतु त्याचा विस्तार केला नसल्याने ती तात्त्विक चर्चाच राहते. उदा. "Librarians no longer are concern to accumulate material in anticipation of use, but seek to engage actively in bringing their resources to attention of those who need them."

ही चर्चा तात्त्विकच राहिली. साधनांचा अंदाजित वापर (anticipated use) करायचा म्हणजे नेमका कोणता कार्यक्रम घ्यायला हवा ? ते विशद झाले नाही. असे अनेक ठिकाणी झाले आहे.

किंवा त्यांच्या नंतरही तज्ज्ञांनी शेरा यांच्या विचारातील प्रत्यक्ष कृतीच्या (application) भागाचा विस्तार केला नाही.

(७) एखाद्या ग्रंथालयाचे उदाहरण घेऊन ही संकल्पना जर मांडली गेली असती तर कदाचित या संकल्पनेतील उणिवा, दोष, त्रुटी निघून गेल्या असत्या आणि तिचा विस्तार अचूक झाला असता.

वरील मतांच्या अनुषंगाने काही ठोस चर्चा करणे आवश्यक आहे.

(**टीप** : तळटिपा भाग – २ प्रकाशित झाल्यानंतर सर्व एकत्रितपणे दिल्या जातील.)

❑❑❑

### ग्रंथपारखी नजर – २

कार्यालयातून घरी यावं अन् पोस्टानं अब्दुल्लाभाईंची यादी आलेली पाहावी, असं अनेकदा झालं. ती यादी पाहिली की थकवा पळून जाई, कधी एकदा ती नजरेखालून घालतो असे होई. त्यात आपल्याला हव्या असलेल्या ग्रंथांची नोंद असली की दुसऱ्या दिवशी लवकरात लवकर कोकिल अँड कंपनीकडे जाऊन तो ग्रंथ हाती घेतल्याशिवाय चैन पडत नसे. दुर्मीळ ग्रंथांबाबत हीच बेचैनी असते. एकदा अब्दुल्लाभाईंच्या यादीत मला 'बॉम्बे असोसिएशन' या मुंबईतल्या पहिल्यावहिल्या राजकीय संस्थेनं ब्रिटिश पार्लमेंटला सादर केलेले दोन अर्ज (१८५२ व १८५४) एकत्र बांधलेल्या अवस्थेत असल्याची नोंद मिळाली. दुसऱ्या दिवशी मी कार्यालयाला जाण्यापूर्वी अब्दुल्लाभाईंकडे सकाळीच गेलो. पण माझ्याही पूर्वी कायदेतज्ज्ञ ए. जी. नूराणी तिथं येऊन तो घेऊन गेल्याचं कळलं. अर्थात दरवेळी निराश होण्याचंच दुर्भाग्य माझ्या नशिबी आलं असं नाही. इतर काही ग्रंथप्रेमींना मीही त्यांच्या आधी दुकानात पोहोचून निराश केलेलं असणारच.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी
पृ. ५८



# माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथपालांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

डॉ. सु. प्र. सातारकर

*प्रशासनातील कोणतेही पद विशिष्ट कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांनी पूर्ण असते. व्यावसायिक दृष्टी असणाऱ्या तसेच पदावरील कार्याची जाणीव असणाऱ्या व्यक्तीस अशा प्रकारची कर्तव्ये व जबाबदाऱ्या लिखित स्वरूपात देणे आवश्यक नसते; मात्र लिखित स्वरूपात अशी माहिती न ठेवल्यास व्यक्तिपरत्वे त्यामध्ये फरक पडू शकतो. मानव संसाधन व्यवस्थापनातील महत्त्वाचे कार्य म्हणजे प्रत्येक पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये ज्याला 'कार्यविवेचन' (Job Description) म्हटले जाते, ते देणे आवश्यक असते. ग्रंथपालाच्या पदासाठीचे कार्यविवेचन कसे आहे, कसे असावे हे प्रस्तुत लेखात स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने १३ फेब्रुवारी २००४ रोजी निर्गमित केलेल्या महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या कार्यविवेचनाची माहिती दिली आहे. महाविद्यालीन ग्रंथपालांसाठी देण्यात आलेले हे कार्यविवेचन काहीशा फरकाने सर्वच ग्रंथपालांना लागू पडते. त्या दृष्टीने या लेखाची मांडणी केली आहे.*

## प्रास्ताविक

आधुनिक व्यवस्थापनशास्त्रामध्ये मानवसंसाधन व्यवस्थापनास अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही संस्थेच्या यशस्वीतेमध्ये हे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कर्मचाऱ्यांनी मनापासून आणि संस्थेशी बांधिलकी राखून आपापले काम केले की यश हमखास मिळते असा अनुभव आहे. अशा बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याकरिता संबंधित कर्मचाऱ्यास आपली नेमणूक कोणत्या कामासाठी झाली आहे, त्या कामातील महत्त्वाचे

घटक कोणते, त्या कामाचे स्वरूप कसे आहे, कामाचे मूल्यमापन कोण करणार आहे, आपल्या आवडी -निवडी आणि कामाचे स्वरूप जुळते की नाही इत्यादी घटक महत्त्वाचे ठरतात. म्हणूनच आधुनिक व्यवस्थापनात मानव संसाधन व्यवस्थापनास आणि मानव संसाधन व्यवस्थापनात कार्यविवेचनास महत्त्वाचे स्थान आहे.

संस्थेमध्ये विविध स्तरांवरील निरनिराळी पदे असतात. याचे उदाहरण म्हणजे ग्रंथालयामध्ये असणारी निरनिराळी पदे जसे- ग्रंथपाल उपग्रंथपाल, सहायक, ग्रंथपाल, ग्रंथालय सहायक, ग्रंथालय परिचय, सेवक इत्यादी होत. ग्रंथालयाचे कामकाज यशस्वी करण्याकरिता या सर्वांचा सहभाग आणि सहकार्य असणे आवश्यक ठरते. त्याकरिता ग्रंथालयातील विविध कामे कोणती, त्यांचा स्तर कोणता हे ठरविणे म्हणजे कार्यविश्लेषण (Job Analysis) करणे होय. ग्रंथालय व्यस्थापकाने अशा प्रकारे कार्यविश्लेषण आपल्या ग्रंथाकरिता तयार केले पाहिजे. यामध्ये ग्रंथालयातील प्रत्येक लहानमोठ्या कामाचा समावेश असावा. ही कामे विविध पदांवरील व्यक्तींमध्ये विभागून द्यावीत. अशी विभागणी करताना कामाचा दर्जा, कर्मचाऱ्यांची पात्रता व क्षमता आणि कार्यविभागणीत समतोल राखणे या घटकांचा विचार करावा. अशा प्रकारे कार्यविश्लेषणातून प्रत्येक पदाचा, व्यक्तीच्या कार्यविवेचनाची निर्मिती होते.

## कार्यविवेचनाची संकल्पना

कोणत्याही पदाचे कार्यविवेचन त्या कर्मचाऱ्यास दिले असता कार्याच्या गुणवत्तेमध्ये व कार्य वेळेवर पूर्ण होण्यास मदत होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या कर्मचाऱ्याला आपल्याला कोणकोणती कामे करावयाची आहेत, कोणकोणत्या जबाबदाऱ्या आपणावर आहेत याची जाणीव होते. आपल्या सोयीनुसार तो कर्मचारी कामांचा क्रम लावू शकतो व काम दिलेल्या वेळेमध्ये पूर्ण करू शकतो. साधारणत: कार्यविवेनासाठी दोन महत्त्वाची उद्दिष्टे समजली जातात असे पी. सुब्बाराव[१] यांनी म्हटले आहे.

(१) संस्थेच्या व्यावसायिक गरजा पूर्ण करणे : या गरजांमध्ये उत्पादनात वाढ, सेवेची गुणवत्ता वाढविणे आणि कार्य तत्परतेने पूर्ण करणे या घटकांचा समावेश होतो.

(२) संबंधित कर्मचाऱ्यांच्या गरजा पूर्ण करणे : यामध्ये त्या कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक आवडी-निवडी, त्याच्यासमोरील आव्हाने, आणि त्या कर्मचाऱ्यांच्या जीवनातील उद्दिष्टांच्या पूर्ततेस मदत करणे या घटकांचा समावेश होतो.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की कार्यविवेचनामुळे संबंधित कर्मचाऱ्यास तर फायदा होतोच, परंतु ह्या संस्थेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठीही मदत होते. म्हणूनच कार्यविवेचनाचे महत्त्व आहे.

## व्याख्या

कार्यविवेचनाच्या विविध व्याख्या उपलब्ध आहेत. सर्वांत सोपी व्याख्या पी. सुब्बाराव[२] यांनी त्यांच्या 'Essentials of Human Resource Management and Industrial Relations' या पुस्तकात दिली आहे; ती खालीलप्रमाणे-

Job description is an important document which is basically descriptive in nature and contains a statement of job analysis.... It tells us what should be done, why it should be done and where it is to be performed.

वरील व्याख्येचा मराठी अनुवाद पुढीलप्रमाणे आहे- कार्यविवेचन हा एक महत्त्वाचा दस्तावेज असून तो मूलत: विस्तृत असतो, त्यात कार्यविश्लेषणाचा तपशील दिलेला असतो. याद्वारे आपणास कोणते काम करावयाचे आहे, का करावयाचे आहे आणि कोठे करावयाचे आहे याची माहिती मिळते.

परंतु सर्वसमावेशक वाटणारी व्याख्या मायकेल आर्मस्ट्रॉंग यांनी दिली आहे, ती खालीलप्रमाणे-

Job design is defined as the process of deciding on the content of a job in terms of its duties and responsibilities; on the method to be used in carring out the job, in terms of techniques, systems and procedures and in the relationship that should exist between the job holder and his superiors, subordinates and colleagues.

कार्यविवेचन म्हणजे एखाद्या कामाचे घटक, (अ) त्यातील कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या लक्षात घेऊन ठरविणे, (ब) ते कार्य पूर्ण करण्याची पद्धत लक्षात घेऊन ठरविणे, (क) त्यातील तांत्रिक बाजू स्पष्ट करणे, (ड) कार्यप्रणाली तसेच तंत्र व पद्धती सांगणे; हे करीत असताना त्या कार्य करणाऱ्या व्यक्तीचे वरिष्ठांशी, त्याहून कनिष्ठ कर्मचाऱ्यांशी आणि सहकाऱ्यांशी संबंध कसे असावेत ते स्पष्ट करणे होय.

वर नमूद केलेल्या व्याख्या आणि विवेचनावरून एक बाब सुस्पष्टपणे दिसते की अशा प्रकारचे कार्यविवेचन कोणत्याही कर्मचाऱ्यास दिल्यास ते केवळ त्या व्यक्तीकरिताच नव्हे तर संपूर्ण संस्थेच्या कामाचा दर्जा वाढविण्याकरिता उपयुक्तच ठरते. एखादे काम आपणास का करावयाचे आहे, कसे करावयाचे आहे आणि त्याचे उद्दिष्ट व विश्लेषण कर्मचाऱ्यास कळाले की साहजिकच गुणवत्ता वाढते. हे विवेचन जितके सुस्पष्ट आणि नि:संदिग्ध असेल तेवढे उपयुक्त ठरते.

## कार्यविवेचनाची वैशिष्ट्ये

अर्नेस्ट डेल (Earnest Dale) यांनी चांगल्या विवेचनाची पाच वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

(१) कार्यविवेचनाने कामाचे स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्वाचे संबंध दर्शविले पाहिजेत.

(२) कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, आणि पदाची कामे स्पष्टपणे दर्शवावीत.

(३) कार्यविवेचनातील शब्द सुस्पष्ट असावेत; ज्यामध्ये-
(अ) कामाचे स्वरूप, (आ) क्लिष्टतेची मर्यादा, (इ) लागणारे तंत्र, (ई) त्यातील प्रश्नांचे प्रमाणीकरण, (उ) कर्मचाऱ्याची विशिष्ट कामातील जबाबदारी, आणि

(ऊ) कर्मचाऱ्याने कोणत्या कामावर देखरेख करणे अपेक्षित आहे ते कार्यविवेचनाद्वारे स्पष्ट झाले पाहिजे.

(४) कर्मचाऱ्याने कोणत्या कामावर देखरेख करणे अपेक्षित आहे ते कार्यविवेचनाद्वारे स्पष्ट झाले पाहिजे.

(५) नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यास कार्यविवेचन वाचल्यानंतर आपल्या नेमणुकीचे स्वरूप कळले पाहिजे.

थोडक्यात नमूद करावयाचे झाल्यास कार्यविवेचन म्हणजे प्रत्येक कर्मचाऱ्यास त्याच्या कामात दिशा दर्शविणारे आयुध होय.

## ग्रंथपालांच्या कार्यविवेचनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतात ग्रंथपालनाची सुरुवात डॉ. शि. रा. रंगनाथन यांच्या प्रयत्नांनी झाली. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (1956) स्थापनेनंतर महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या दर्जामध्ये सुधारणा झाली. डॉ. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या विद्यापीठ अनुदान मंडळाच्या ग्रंथालय समितीने 1958 आणि 1969 मध्ये ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध सादर केला. काहीच राज्यांनी तो अमलात आणला, तर बऱ्याच राज्यांत तो अमलात आणला गेला नाही. कारण त्यासाठी लागणारा निधी संबंधित राज्य सरकारांनी उभा करावयाचा होता. 1972 मध्ये महाविद्यालयांनी ग्रंथपाल आणि प्राचार्य यांची नेमणूक केल्याशिवाय अनुदान मिळणार नाही असे परिपत्रक विद्यापीठ अनुदान मंडळाने निर्गमित केले. त्यामुळे महाविद्यालयातून ग्रंथपालांच्या नेमणुका होऊ लागल्या. मात्र त्यांच्या कामाचे सुस्पष्ट कार्यविवेचन राज्य सरकारद्वारा देण्यात आले नव्हते. केंद्र पातळीवर All India Council of Technical Education (AICTE) ने 1970 मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांसाठी शैक्षणिक पात्रता आणि त्रोटक कार्यविवेचन प्रस्तुत केले. (पहा प्रस्तुत लेखकाचे पुस्तक (Personnel Management in College Libraries, Jaipur, Rawat Publication, 2000.) महाराष्ट्र शासनाचे 06 मार्च 1985 रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी सेवाशर्ती आणि कार्यविवेचन निर्गमित केले; परंतु त्यामध्ये ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समावेश नव्हता. सार्वजनिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालयांसाठीही असे विवेचन अद्यापही उपलब्ध नाही.

महाराष्ट्र शासनाने प्रथमच महाविद्यालीन ग्रंथपालांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या दि.13 फेब्रुवारी 2004 च्या शासननिर्णयाद्वारे स्पष्ट केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे–

### महाविद्यालयीन ग्रंथपालपदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये

ग्रंथपाल हा विद्यार्थी, शिक्षक व अभ्यासक यांना त्यांच्या गरजेनुसार ग्रंथ व संदर्भ उपलब्ध करून देणारा महत्त्वाचा दुवा आहे. थोडक्यात, ग्रंथपाल हा विद्यार्थी व शिक्षक यांना ग्रंथालय सुविधा व त्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करून देणारी एक जबाबदार व्यक्ती आहे. ग्रंथपालाला वाचक सेवा, तांत्रिक सेवा व प्रशासन या तिन्ही प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.



### ग्रंथपालाच्या जबाबदाऱ्या

(१) वाचक व अभ्यासक यांची अचूक गरज ओळखून त्या दृष्टीने त्यांना आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून देणे.

(२) वाचक व अभ्यासकास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके, दृकश्राव्य साधने व आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स साधनांद्वारे माहिती उपलब्ध करून देणे.

(३) वर्गीकरण करणे, तालिकीकरण करणे आणि संघटित बाबींचा विचार करून माहिती पुरवणे.

(४) वाचकांना पुस्तके देणे, घरपोच पुस्तकांची व माहिती कागदपत्रांची सेवा पुरवणे.

(५) संदर्भसेवा व माहितीसेवा पुरवणे, माहितीचा शोध घेणे, वाचनसाहित्य यादी तयार करणे, संदर्भसूची तयार करणे, त्याचप्रमाणे सल्लागार समितीस अहवाल सादर करणे.

(६) वाचकांना माहिती शोधण्यास, पुस्तक स्थान दर्शविणे, लेखाबाबत माहिती पुरवणे, सीडीरॉमचा व इंटरनेट ही आधुनिक माध्यमे वापरून अतिशय तत्परतेने सेवा उपलब्ध करून देण्याकरिता साधने वापरणे.

(७) ग्रंथालयाचे व्यवस्थापन व नियोजन पाहणे, त्या अनुषंगाने साहित्य, साधने आणि ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, जनसंपर्क वाढविणे, अंदाजपत्रक तयार करणे आणि ग्रंथलयाचे कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने देखभाल करणे.

### ग्रंथपालाची कर्तव्ये

(१) ग्रंथसंग्रह निवड व शासकीय नियमाप्रमाणे ग्रंथखरेदीसाठी शिफारशी करणे.

(२) विविध प्रकाच्या माहितीस्रोतांसंबंधी ज्ञान असणे व त्यासाठी अद्ययावत प्रकाशने, नियतकालिके, संगणकाचा वापर करणे व इतर माध्यमांचे बदलते प्रवाह माहिती असणे.

(३) ग्रंथसंग्रह योग्य प्रकारे संग्रहित करणे.

(४) वाचकांसाठी गरजेनुरूप माहिती पद्धत विकसित करणे.

(५) ग्रंथसंपदा व्यवस्थित सांभाळणे, कालबाह्य पुस्तके निर्लेखित करणे त्याऐवजी अद्ययावत ग्रंथसंपदा उपलब्ध करून घेणे.

(६) महाविद्यालयातील ग्रंथालय समितीचा पदसिद्ध सचिव म्हणून काम पाहणे त्या दृष्टीने समितीस वेळोवेळी अहवाल सादर करणे.

(७) ग्रंथालयास निधी उपलब्ध होण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे (विभागाकडे) त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे तसे प्रस्ताव सादर करणे व पाठपुरावा करणे.

(८) आधुनिक इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञानाचे भांडार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यसाठी कार्य करणे.

(९) वाचनसंस्कृती निर्माण करणे.

(१०) याशिवाय वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली कामे करणे.

याशिवाय या शासननिर्णयाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत :

(१) ग्रंथपाल हे पद प्रशासकीय पद नसून शिक्षक संवर्गातील आहे हे स्पष्ट केले आहे.

(२) ग्रंथपाल व अधिव्याख्याता हे समान पातळीवरील पद आहे हे मान्य केले आहे.

(३) शासनांतर्गत ग्रंथपालांची पदे राजपत्रित अधिकारी म्हणून घोषित केली आहे.

(४) शासकीय महाविद्यालयातील या पदावरील नियुक्त्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणार आहेत.

## मूल्यमापन

या शासननिर्णयाचे अवलोकन करून या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांबाबत खालील निष्कर्ष सयुक्तिक ठरतात.

(१) शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपालाचे महत्त्व शासनाला पटले आहे.

(२) ग्रंथालयीन वाचनसाहित्यातील बदल ग्रंथपालांनी स्वीकारावेत यासाठी शासन आग्रही आहे.

(३) विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्याची जबाबदारी ग्रंथपालांवर टाकण्यात आली आहे.

(४) कालबाह्य ग्रंथ निर्लेखित करण्याचे कर्तव्य ग्रंथपालाचे आहे हे शासनातर्फे प्रथमच सांगितले आहे.

(५) निधी प्राप्त करण्याचा पत्रव्यवहार करण्याचे स्वातंत्र्य ग्रंथपालांना मिळाले आहे.

या निर्णयामुळे ग्रंथपालांना सन्मानाचा दर्जा प्राप्त झाला आहे. मात्र याचा उपयोग करून आपले ग्रंथालय विद्यार्थी व शिक्षकाभिमुख कसे करता येईल याकडे सर्वच ग्रंथपालांनी लक्ष देणे गरजेचे आहे. हा शासननिर्णय पाहता खालील कामांकरिता ग्रंथालय संघटनांनी आग्रह धरणे आवश्यक वाटते.

(१) इतर प्रकारच्या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी कार्यविवेचन करणे आता आवश्यक झाले आहे.

(२) ग्रंथालयातील ग्रंथपाल वगळता अन्य कर्मचाऱ्यांसाठी कार्य विवेचन तयार करणे जरुरीचे आहे.

(३) अनुदानित महाविद्यालयांसाठीदेखील असे कार्यविवेचन देण्यात यावे.

## *संदर्भ*

(1) Subba Rao. P., *Essentials of Human Resource Management and Industrial Relation* : *Text Cases and Games*, Mumbai, Himalaya Publishing House, Ed. 2, 2004, P. 69.

(2) उपर्युक्त पृ. 87

(3) Armstrong Michael, *Handbook of Personal Management,* Kogan Page Ltd, London, 1976, P. 101.

(4) Dale Earnest, *Management : Theory and Practice,* Newyork, MCGraw Hill Book Company,1965, P. 67.

(5) Maharashtra Government, Maharashtra Non Agricultural Universitites and affiliated Colleges Employees Education and Employment Departemnt Bomaby, Mantralaya Annexe, dated 6th March 1985.

(6) महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एससीपी -2001/(165/01) मशि -2 दि. 13 फेब्रुवारी 2004.

❑ ❑ ❑

### ग्रंथपारखी नजर – ३

रमेशकुमार जैन अन् विजयकुमार जैन या दोन ग्रंथप्रेमी दुर्मीळ ग्रंथविक्रेत्यांनी मला सर्वतोपरी साह्य केलं, त्यांच्यामुळेच माझ्या अभ्यासाचे विषय निश्चित होण्यास खरं तर मदत झाली. पुढं रमेशकुमार जैन यांनी काही दुर्मीळ ग्रंथांचं पुनर्मुद्रण केलं, आणि नंतर स्वतंत्रपणे ग्रंथ-प्रकाशन व्यवसाय सुरू केला. आज दिल्लीच्या नामवंत प्रकाशकांमध्ये त्यांच्या मनोहर पब्लिकेशन्सचा समावेश केला जातो. त्यांचे बंधू विजयकुमार जैन मात्र आजही दुर्मीळ ग्रंथविक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या प्रभू बुक सर्व्हिसचा दुर्मीळ ग्रंथांचा खजिना हा देशातला सर्वांत मोठा खजिना आहे, असा माझा विश्वास आहे. आता आमच्या भेटी कमी झाल्या आहेत. तरीही मी दिल्लीला गेलो अथवा ते मुंबईला आले तर आजही आम्ही एकमेकांच्या संपर्कात येतो, अन् जुन्या ग्रंथांविषयी मिळालेली माहिती एकमेकांत वाटून घेतो. माझ्या संशोधनासाठी एखादा ग्रंथ हवा असला, विजयकुमार जैन यांच्याकडे विचारणा केली, अन् तो ग्रंथ माझ्या आर्थिक ताकदीपलीकडचा असला – माझ्या आर्थिक ताकदीची त्यांना पूर्ण कल्पना आहे – तर ते स्वखर्चानं त्या ग्रंथाची फोटोकॉपी काढून त्याचं व्यवस्थित बाइंडिंग करून मला ते तो ग्रंथ उपलब्ध करून देतात. दुर्मीळ ग्रंथांचा असा ग्रंथप्रेमी विक्रेतासुद्धा दुर्मीळ मानावयाचा की नाही?

अक्षरनिष्ठांची मांदियाळी

पृ. ३५

# माहितीचे मूल्यनिर्धारण व तदनुषंगिक प्रश्न

प्रा. मोहन पाठक

*माहिती ही एक उपयुक्त (वस्तू) असून माहिती जवळ असणे ही जमेची बाब आहे, असा समाजाचा दृष्टिकोन आहे. इतर परिमित, भौतिक वस्तूंप्रमाणेच अर्थतज्ज्ञही माहितीचा विचार करतात; पण कोणतेही ज्ञानक्षेत्र माहितीची हाताळणी परिमाणबद्ध कशी करावी याबाबत सांगताना दिसत नाही. ज्ञानक्षेत्रे माहिती या घटकाकडे भिन्न प्रकारे पाहतात हे खरे असले तरी इतर भौतिक साधनांप्रमाणे मीहितीचे मापन करण्याचे परिमाण विकसित होणे अवघड आहे. माहितीचे मूल्यनिर्धारण करण्यासाठी अस्तित्वात असणारी मूल्यपद्धती वापरली जाते; पण तो उत्तम उपाय ठरत नाही. ग्रंथपाल त्यांना अर्थसाहाय्य देणारांसाठी आवर्ती खर्च गृहीत धरून अशी एखादी माहिती मूल्य निर्धारण योजना देऊ शकतात काय? याची चर्चा आज होणे आवश्यक आहे.*

## माहिती – मूलभूत प्रश्न

माहिती ही आज वाणिज्य विषय बनली आहे, विपणनयोग्य बाब बनली आहे. पूर्वी यश वा यशस्वीता लक्षात घेण्यासाठी आर्थिक, भौतिक सुविधा, लेखन, अन्न, वस्त्र, निवारा हे निकष लक्षात घेत. आज मीहतीवरील नियंत्रण, तिचा विकास, पृथक्करण सादरीकरण या निकषांना महत्त्व आहे. त्यामुळेच आपल्या वर्तमानकाळाचे वर्णन माहितीचे युग असे केले जाते. आज आपण माहिती विकत घेतो, विकतो. काही वेळा माहितीच्या बदल्यात माहिती असाही व्यवहार असतो. असे असले तरी जागतिक स्तरावर मान्य होईल अशी आर्थिक व्यवहाराची बैठक माहितीच्या क्रय-विक्रयास नाही.

माहिती म्हणजे काय, तिची व्याख्या कशी करायची, ती परिमेय करायची, तिचे मूल्य कसे ठरवायचे, तिचे महत्त्व कसे ठरवायचे हे सांगू पाहणारे अनेक दृष्टिकोन आहेत. उदाहरणार्थ,



अर्थशास्त्र, लेखापालन, समाजशास्त्र, वर्तणूकशास्त्र अशा ज्ञानशाखांचे याकडे बघण्याचे मार्ग वेगळे आहेत. अर्थतज्ज्ञ माहितीची व्याख्या करताना मागणी तसा पुरवठा तत्त्वावर आधारलेल्या विनिमय दराने तिचे मूल्यमापन करतात व अनिश्चितता कमी करणारे एक नवल अशा दृष्टीने माहितीकडे पाहतात. लेखापाल एक फायद्याची बाब म्हणून तर समाजशास्त्राज्ञ समाजाच्या फायद्याची बाब म्हणून माहितीकडे पाहतात. वर्तनशास्त्रात माहिती ही ज्ञानाने आकलनीय व वर्तनात बदल घडवून आणू शकणारी बाब म्हणून माहितीचा अभ्यास करतात. यावरून असे म्हणता येते की माहितीचे मूल्य ठरविणे ही साधी, सरळ व एका टप्प्यात होऊ शकणारी गोष्ट नाही.

एखाद्याला मोलाची वाटू शकणारी माहिती ही अनेक टप्प्यांतून परिवर्तन होऊन तयार होते. माहिती ही माहिती या स्वरूपात ओळख पटण्यापूर्वी अप्रकट अवस्थेत असते व उदाहरण म्हणून सिद्ध होण्याच्या प्रतीक्षेत असते. नंतर अशा अपरिपक्व, विस्कळीत अवस्थेतील या गोष्टी, गृहीत गोष्टी उपयोगाच्या ठरू शकतील याचे आपल्याला भान येते. या गोष्टी आपण गोळा करतो, त्यांचे पृथक्करण करतो व निष्कर्ष काढतो. माहिती व निष्कर्ष यांचे संप्रेषण करण्यापूर्वी आपण माहितीचे आकलन करून तिचे मोल ठरवू शकतो.

माहितीचे निव्वळ मूल्यनिर्धारण या अंतिम टप्प्यावर शक्य असते. माहितीत असे माहितीचे मूल्य नसते तर तिचे आकलन व पाठोपाठ येणारे उपयोजन यातून मूल्यनिश्चिती करता येते. या शेवटच्या अवस्थेतील आपण केलेली मूल्यनिश्चिती ही आपली अपेक्षित व अंदाजित मूल्यजाणीव यांवर अवलंबून असते. पलीकडचा फक्त अंतिम उत्पादन वा निष्कर्ष यांची किंमत ओळखत असतो.

## माहिती-विपणन

व्यापारी जगात माहिती ही उपयुक्त वस्तू असून संगृहीत माहिती ही जमेची बाब आहे या दृष्टीने मीहितीकडे पाहते. अर्थतज्ज्ञ इतर भौतिक बाबींप्रमाणे एक उपयुक्त माल, वस्तू म्हणून माहितीचे महत्त्व जाणतात; परंतु मूल्यनिश्चितीचे कोणतेही निष्कर्ष, कोणतीही मान्य प्रतिकृती पुष्कळ समान वाटणाऱ्या वर्णनांच्या उपलब्धीनंतरही अस्तित्वात नाही.

माहितीचे मूल्यनिर्धारण काही प्रमाणात संस्थेतील इतर जमेच्या बाबींप्रमाणे करून आर्थिक अहवालात तिचा समावेश करता येईल. यादीतील एक वस्तू म्हणून विस्काळीत गोष्टींमध्ये मूल्यवर्धन करून आलेली अवस्था, विकास चालू असणारी, विपणनयोग्य बाब म्हणून माहितीचा समावेश करता येईल. माहिती संकलन व सादरीकरणासाठी भांडवली गुंतवणूक व मनुष्यबळाची गरज असते. माहितीप्राप्ती ही तर महाग असतेच शिवाय व्यवस्थापनाचाही खर्च गृहीत असतो. इतर भौतिक जमेच्या बाबींप्रमाणे वितरणापूर्वी माहितीचीही दर्जा तपासणी करावी लागते. वस्तूंच्या यादीतील इतर वस्तूंप्रमाणे माहिती ही गरजेच्या वेळी उपलब्धता असण्याशी संबंधित आहे. विशिष्ट काळ गेल्यानंतर माहितीचे मूल्य कमी होते.

प्रत्येक अवस्थेत या पातळीवर माहितीचे विशेष असे व्यापारी व उपभोक्ते असतात. माहिती हवी असणारे उपभोक्ते माहितीचे जास्त मोल देतात व पुरवठादार कमी किमतीत ती

देतात असे होऊ शकते; कारण माहितीच्या पातळ्या व विविधता यांचे व्यवहार करताना वेगळेपण त्यांनी जाणलेले नसते. माहितीच्या महत्त्वाची ओळख व माहितीचे मोजमाप खालील प्रश्नांमुळे असे होते.

## विपणनाचे स्वरूप व माहितीची वैशिष्ट्ये

जोसेफ स्टिगलिटझ् विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या विकेंद्रित मूल्य पद्धतीमुळे साधनांचे प्रभावी विभाजन वा वाटणी होऊ शकते; या मताचा दाखला देऊन म्हणतात, ''अर्थशास्त्राच्या इतर शाखांप्रमाणे त्याच समान तत्त्वांचे माहितीच्या अर्थशास्त्रासाठी उपयोजन उपयुक्त ठरेल असा अंदाज होता.'' परंतु त्यांच्या मते, माहितीच्या अर्थशास्त्राचे निर्धारण करण्यास ती मूल्यपद्धती उपयुक्त नव्हती. कारण माहितीतील समस्या व इतर वस्तूंपेक्षा माहितीचे असणारे भिन्नत्व यांचा त्यात विचार नव्हता.[१]

'माहितीवाणिज्य' या संकल्पनेचा संदर्भ घेऊन जॉन पेरी बारलो यांनी समाज माहितीचे मूल्यनिर्धारण करताना अर्थबाह्य मार्ग कसे अवलंबतो याबाबत लिहिले आहे. सर्वसाधारणपणे माहिती जशी वाढत जाते, परिचित होत जाते तसे तिचे मूल्य वाढते. उलट भौतिक साधने दुर्मीळ झाली तर त्यांचे मूल्य वाढते. काही वेळा दुर्मिळतेमुळे माहितीचेही मूल्य वाढते; उदाहरणार्थ, फायदा होण्यातील गुप्तता माहीत असणाराकडे असणारी माहिती. अशा वेळी माहितीप्रमाणेच वेळ हा घटक मूल्य ठरविणारा जबाबदार असतो. माहिती निर्मितीच्या वेळी तिच्या सान्निध्यात असणारी व्यक्ती तिच्या उपयोगामुळे फायद्यात जाऊ शकते. माहितीबाबतची माहिती व तिचा उपयोग यात खंड पडत गेला तर माहितीचे आर्थिक मूल्य कमी होते, तिची उपयुक्तताही कमी होते. बारलोने असेही निरीक्षण नोंदले आहे की माहिती कोण पुरवतो यावरही तिचे मूल्य ठरते. आपण मान्यताप्राप्त अशा तज्ज्ञांनी केलेल्या मतप्रदर्शनाचे मोल देतो. म्हणजेच असे लोक त्यांच्या विशिष्ट गोष्टी ज्ञात करण्याच्या कौशल्यांची विक्री करून आपल्याला मीहिती देतात.[२]

उपलब्ध मूल्यपद्धतीनुसार माहितीचे मूल्यनिर्धारण करणे अवघड आहे. तिच्या वैशिष्ट्यांमुळे ती भौतिक वस्तूप्रमाणे आणि नसतेही.

(१) माहिती ही यंत्रावर बनविलेल्या पक्क्या मालासारखे उत्पादन नसते.

(२) माहिती नेहमी कमी मोबदल्यात वा विनामूल्य तयार होते.

(३) माहितीचा प्रत्येक घटक एक दुसऱ्यापेक्षा भिन्न असतो. तसा तो नसेल तर ती नवी माहिती होऊ शकणार नाही. एखादे उत्पादन एकाच दुकानातून परत परत विकता येते; पण माहिती विकत घेणाऱ्याला ती माहिती झाल्याने परत विकता येत नाही.[३]

(४) माहितीची अदलाबदल करता येते; पण ती आवश्यक असतेच असे नाही. माहिती प्राप्त करून घेणे हा सर्वस्वी वैयक्तिक, व्यक्तिगत अनुभव असतो. शिवाय व्यक्ती जेव्हा मानवी सहवासात असते तेव्हाच माहिती मिळू शकते.

(५) माहिती दुर्मीळ असत नाही. पृथक्करण केलेली, नीट सादर केलेली व व्यवस्थित वितरित केलेली माहिती मात्र नेहमीच उपलब्ध असेल असे नाही.



(६) माहितीचा उपभोग एका व्यक्तीने घेतला तरी इतरांना अधिक मूल्य न घेता ती पुरविता येते.

(७) एकच माहिती ही व्यक्तीच्या दृष्टिकोनानुसार एकाच वेळी स्थिर व अस्थिर ठरू शकते.

(८) माहिती उपलब्ध असूनही आवश्यक तेथे पुरविली जात नाही आणि पुरविली गेलेली माहिती प्रभावीपणे वापरली जातेच असे नाही.

(९) मीहती ही वस्तुनिष्ठ वा आशयनिष्ठ किंवा एकाच वेळी दोन्ही स्वरूपांत असू शकते.

(१०) भौतिक वस्तू एकतर अस्तित्वात असते वा नसते; माहिती मात्र काही विभागांमध्ये विभागलेली असू शकते.

(११) मीहती ही पूर्णत: खरी किंवा खोटी, अंशत: खरी किंवा खोटी किंवा खरी किंवा खोटी नसलेली या स्वरूपात असू शकते.

(१२) माहिती ही खाजगी वा सार्वजनिक असू शकते. खाजगी अखत्यारित असल्याने ती कमी होत नाही किंवा तिच्या इतरांना उपलब्ध असलेल्या भागाचे मूल्य व किंमत कमी होत नाही.

## ग्रंथपालनाचा संदर्भ

ग्रंथपाल हे माहिती व्यावसायिक आहेत. त्यांची माहितीकडे बघण्याची दृष्टी कशी असते? पूर्वी ग्रंथपाल माहिती संप्रेषणप्रक्रियेचे काम करीत. लेखक, कलावंत, प्रकाशक यांनी संकलन व संघटन केलेली माहिती ग्रंथपाल सादर करीत. त्यामुळे कुठे काय उपलब्ध होईल व ते कोणाला उपयुक्त होईल हे त्याला माहीत असणे अपेक्षित असे. माहितीचे सादरीकरण, उपलब्धी करून देणे हे त्यांचे प्रमुख काम होते, माहिती निर्मिती नव्हे !

सध्या माहिती कोणत्या स्वरूपात आहे व ती कोणत्या साधनांनी उपलब्ध करू देता येईल यात ग्रंथपालांना रस आहे. अनेक ग्रंथपाल परिषदा व नियतकालिकातील लेख यात छापील स्वरूप व इलेक्ट्रॉनिक स्वरूप यांची वैशिष्ट्ये चर्चिलेली असतात वा व्यावसायिक माहितीचे मध्यस्थ, की जे आपल्या क्षेत्रांवर अतिक्रमण करतील याची ग्रंथपालांना भीती असते.

ग्रंथालयशास्त्राच्या साहित्यात मूल्यवर्धित माहितीसेवेची बरीच चर्चा असते. ग्रंथपाल व उपभोक्ते माहितीची रेलचेल यांचा विचार करून त्यातील अनावश्यक व व्यर्थ माहिती वगळण्याचा विचार करतात. माहिती उपलब्धी, पृथक्करण व ग्रंथालय उपभोक्त्यांना उपयोजन यात अनेक अडथळे जाणवत असतात. ग्रंथपाल माहितीत मूल्यवर्धन करतात तेव्हा ते असे अडथळे कमी करतात. हे मूल्यवर्धन म्हणजे काय असते? तर योग्य माहितीचे साधन व उपभोक्ता यांतील अंतर सुलभतेने कमी करणे. माहितीचे पृथक्करण व प्रक्रिया करूनही मूल्यवर्धित होते व सहज शक्य होते.

माहिती पुरविणे, चांगली, मूल्यवर्धित सेवा देणे या सर्वांत माहिती मोजता येत नाही वा परिमेय पद्धतीने तिची मूल्यनिश्चिती करता येत नाही, याची ग्रंथपालांना सतत व सुप्त जाणीव

असते. माहिती मिळविणे, मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण करणे आणि तिचे सादरीकरण करणे या सर्व माहिती हाताळणीत प्रत्येक टप्प्याला स्वत:चे मूल्य असते. माहिती प्राप्त करून घेताना आलेला खर्च आणि त्या माहितीचे मूल्य यांमध्ये कोणता अंतर्गत संबंध आहे ? हा प्रश्न आव्हानात्मक आहे. भविष्यात ग्रंथपालांना या कामी अर्थसाहाय्य करणारांना येणाऱ्या खर्चाचे योजनाबद्ध पद्धतीने समर्थन द्यावे लागेल.

## संदर्भ


(1) Stiglitz, J.E. "The Contribution of the Economics of Information to Twentieth Century Economics" Quarterly Journal of Ecomonics 115, (Nov. 2000) 1441-1475

(2) Barlow, J.P., "The Economy of Idias, Wired 2 (March 1994) 84-90, 126-129

(3) एक प्रमाणे.


❑ ❑ ❑

### ग्रंथपारखी नजर – ४

ग्रंथसंग्राहकांच्या वर्गात एका छोट्या वर्गाचाही समावेश केला पाहिजे. या वर्गाला 'मार्जिनॅलिया' संग्रहित करणाऱ्यांचा वर्ग म्हणता येईल. 'मार्जिनॅलिया' म्हणजे पुस्तकावर केलेल्या खुणा, स्वहस्ताक्षरात ग्रंथाच्या प्रारंभी, पानावरील 'मार्जिन'मध्ये, वा ग्रंथाच्या शेवटी वाचकानं केलेलं भाष्य! समजा, एखाद्या सुप्रसिद्ध व्यक्तीनं एखादं गाजलेलं पुस्तक वाचताना पानापानावर आपली पसंती-नापसंती व्यक्त केली असेल, तर ते पुस्तक संशोधकाला महत्त्वाचं वाटेल की नाही? एखाद्या नामवंत प्राध्यापकानं एखाद्या ग्रंथात आपल्या 'नोट्स' नोंदवल्या असतील, तर त्याचं महत्त्व त्यांच्या ग्रंथप्रेमी विद्यार्थ्यांना वाटेल की नाही? 'छापील' पुस्तकावर असं स्वहस्ते 'भाष्य' लिहिलेल्या व्यक्तीच्या मालकीचं असलेल्या पुस्तकाचं महत्त्व समजणारा ग्रंथसंग्राहक ते पुस्तक हातून सोडणार नाही. अशा पुस्तकांच्या संग्रहाला 'मार्जिनॅलिया' म्हणतात. आपल्या मालकीच्या नसलेल्या परंतु सार्वजनिक ग्रंथालयातनं आणलेल्या ग्रंथांवर सामान्य वाचक जी मनपसंत शेरेबाजी करतो तीही 'मार्जिनॅलिया' या गटातच मोडते. 'वाः फारच छान!', 'गचाळ लेखन, सुमार दर्जा!', 'भंकस', 'ए, लिहिणं थांबवलंस तर बरं!'... अशा प्रकारच्या अनामिक प्रतिक्रिया 'मार्जिनॅलिया'चेच लघुअवतार मानता येतील.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी
पृ. १०६



# मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब. शिक्षणक्रमातील स्वयं-अध्ययन पुस्तकांच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास

प्रा. मधुकर शेवाळे

## प्रास्ताविक

भारतामध्ये स्वांतत्र्यानंतर उच्च शिक्षणाच्या स्वरूपात झपाट्याने वाढ झालेली दिसते. १९४७ मध्ये भारतात १९ विद्यापीठे कार्यरत होती. आजमितीस ३०६ विद्यापीठे व तत्सम संस्था उच्च शिक्षण देण्यात व्यस्त आहेत. असे असले तरी पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या मर्यादा आणि वेगाने वाढत जाणारी लोकसंख्या यामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. हे सर्व लक्षात आल्यावर 'दूर शिक्षण' ही संकल्पना पारंपरिक शिक्षण पद्धतीस पर्याय म्हणून पुढे आली. जगामध्ये अनेक देशांत मुक्त विद्यापीठे आणि मुक्त शिक्षण संस्थांची स्थापना झाली आहे. भारतातील पहिले मुक्त विद्यापीठ सन १९८२ मध्ये हैद्राबाद येथे स्थापन झाले. १९८५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर दिल्ली येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. आज भारतात १२ मुक्त विद्यापीठे कार्यरत आहेत. प्रत्येक राज्यात एक मुक्त विद्यापीठ असावे असे भारत सरकारचे धोरण आहे. महाराष्ट्र राज्यासाठी सन १९८९ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य असलेल्या या विद्यापीठाने गेल्या १५ वर्षांत शैक्षणिक क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. कृषी, कला, वाणिज्य, व्यावसायिक, तांत्रिक, यांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर व संशोधन अशा स्वरूपाचे शिक्षणक्रम राबवून राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्याशी समन्वय साधण्याचा या विद्यापीठाने कसोशीने प्रयत्न केला आहे. मुक्त विद्यापीठात जे विविध शिक्षणक्रम राबविले जातात त्यांपैकी ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचा पदवी पातळीवरचा बी. लिब. हा एक वर्षाचा शिक्षणक्रम आहे.

## १. बी. लिब. शिक्षणक्रमाची गरज

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बी. लिब. शिक्षणक्रम सन १९९६ पासून सुरू केला आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक व माहिती सेवांचे जाळे व्यापक प्रमाणात विस्तारण्यासाठी

तसेच त्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून या शिक्षणक्रमातून अध्ययन केलेल्या व्यक्तींचे योगदान मोलाचे ठरणार आहे. महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये व काही महाविद्यालयांमध्ये त्या त्या विद्यापीठाचा ग्रंथालयशास्त्राचा शिक्षणक्रम सुरू आहे. नियमित (Regular) स्वरूपाचा हा शिक्षणक्रम सेवेत असणाऱ्या ग्रंथालय सेवकांना पूर्णवेळेचा अभ्यासक्रम असल्याने व उपस्थिती अत्यावश्यक असल्याने सोयीचा नसल्यामुळे मुक्त विद्यापीठाने दूर शिक्षण पद्धतीने बी.लिब. शिक्षणक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्रभर खेड्यापाड्यांतून असलेली शैक्षणिक व सार्वजनिक संस्थांची ग्रंथालये उत्तम चालावीत यासाठी मराठीतून ग्रंथपालन करणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. पारंपरिक विद्यापीठामधून ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण घेण्याची संधी दूरवर विखुरलेल्या सर्व इच्छुकांना उपलब्ध होणे कठीण आहे, हे लक्षात घेऊन मुख्यत: त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुक्त विद्यापीठाने बी.लिब शिक्षणक्रम सुरू केलेला आहे.

## २. बी. लिब. शिक्षणाची उद्दिष्टे

या शिक्षणक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) ग्रंथालयाचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे.

(२) ग्रंथांची निवड करण्याची तंत्रे व पद्धती आत्मसात करणे.

(३) ग्रंथालयशास्त्रातील मान्य पद्धतीनुसार ग्रंथांचे वर्गीकरण व तालिकीकरण करणे.

(४) संदर्भ व माहिती साधनांच्या साहाय्याने वाचकास अद्ययावत व परिपूर्ण माहिती पुरविण्याची तंत्रे आत्मसात करता येणे.

(५) ग्रंथालयांचे जतन व संवर्धन करण्यासाठी आवश्यक असणारी मर्मदृष्टी प्राप्त करून देणे.

(६) ग्रंथालयांचा अधिकाधिक व साक्षेपी उपयोग होण्यासाठी वाचकांना ग्रंथालयीन सेवांची उपलब्धता करून देणे.

(७) ग्रंथालय जास्तीत-जास्त वाचकाभिमुख करून ग्रंथालयाच्या कार्याला उठाव देणे.

## ३. बी. लिब. शिक्षणक्रमाची संरचना

बी. लिब. शिक्षणक्रम एक वर्षाचा असून त्यासाठी ३२ श्रेयांक आहेत. एक श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ घड्याळी तास अभ्यास करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास म्हणजे संपर्कसत्र, वाचन, गृहपाठ, प्रात्यक्षिक इत्यादी कार्य पूर्ण करणे होय. हा शिक्षणक्रम सुमारे १००० अभ्यास तासांचा आहे. या शिक्षणक्रमासाठी ३२ अध्ययनपुस्तके, २ कार्यपुस्तिका, वर्गीकरणासाठी सराव पुस्तिका, प्रकल्प मार्गदर्शन पुस्तिका, ४ श्रवणफिती एवढे अध्ययनसाहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. या शिक्षणक्रमातील सर्व अभ्यासक्रम अनिवार्य आहेत. वर्गीकरण आणि तालिकीकरण या अभ्यासक्रमांसाठी प्रात्यक्षिके आहेत. 'संगणकाचा उपयोग'



या अभ्यासक्रमासाठी प्रात्यक्षिक कार्य असून त्यास कार्यपुस्तिका ठेवण्यात आल्या आहेत. प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना ग्रंथसूची किंवा कात्रणे यांवरील विषय निवडून प्रकल्प पूर्ण करावा लागतो. हा शिक्षणक्रम एकूण १००० गुणांचा असून अंतर्गत व अंतिम परीक्षेद्वारे प्रकल्पासाठी असणाऱ्या तोंडी परीक्षेसह विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येते. अंतर्गत मूल्यमापनासाठी गृहपाठ देण्यात येतात. त्यासाठी एकूण मूल्यमापनापैकी ३०% भारांश आहे, तर अंतिम परीक्षेसाठी ७०% भारांश आहे.

## ४. अध्ययन पद्धती

बी. लिब शिक्षणक्रमाच्या तात्त्विक व प्रात्यक्षिक भागासाठी शनिवार, रविवार (सुटीच्या दिवशी) संपर्कसत्रांचे आयोजन अभ्यासकेंद्रांवर करण्यात येते. विद्यार्थ्याला देण्यात आलेली अध्ययन पुस्तके वाचून त्यांनी संपर्कसत्राला उपस्थित राहणे आवश्यक आहे. ही संपर्कसत्रे अनिवार्य नसली तरी त्यास उपस्थित राहणे हे विद्यार्थ्यांच्या हिताचेच आहे. प्रात्यक्षिक अभ्यासक्रमांसाठी ७०% उपस्थिती अनिवार्य आहे. याबरोबरच एखाद्या विषयावर ग्रंथसूची किंवा कात्रण प्रकल्प विद्यार्थ्यांना समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावा लागतो. संगणकाच्या प्रात्यक्षिकांमध्ये कोणत्या स्वरूपाची माहिती डेटाबेसमध्ये भरावी लागते व त्या माहितीची प्रतिप्राप्ती कशी होते, हे शिकावयास मिळते.

हा शिक्षणक्रम सुरू होताना विद्यार्थ्यांना दूर शिक्षण पद्धतीची माहिती दिली जाते. विशेषत: संपर्कसत्रातून अडीअडचणींचे /शंकांचे निरसन करण्यात येईल, केवळ व्याख्याने दिली जाणार नाहीत असे सांगून समंत्रक विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनाचे महत्त्व पटवून देतात. अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्याने लिहिलेले गृहपाठ समंत्रकाकडून तपासून देण्यात येतात. जर गृहपाठ समाधानकारक नसेल तर त्यावर समंत्रक सूचना करतात. मार्गदर्शन करतात. त्यामुळे आशय परिणामकारकपणे समजण्यास विद्यार्थ्यांना मदत होते. अभ्यासकेंद्रावर उपलब्ध करण्यात आलेल्या ४ व्हिडीओ कॅसेटद्वारे विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन कामकाजाचे शास्त्रीय स्वरूप दाखविण्यात येते. संपर्कसत्राचे आयोजन तसेच व्हिडीओ पाहणे याद्वारे विद्यार्थ्यांना मानवी आधार मिळतो व आशय समजून घेण्यास मदत होते.

## ५. संप्रेषण साधने

मुक्त विद्यापीठ व्यवस्थेत विद्यार्थी व शिक्षक असा प्रत्यक्ष संबंध येत नसल्यामुळे वेळोवेळी होणारी संपर्कसत्रे, स्वयं-अध्ययन पुस्तके, ज्ञानगंगोत्री त्रैमासिक, संवाद मासिक, दृक्-श्राव्य साधने, दूरदर्शन, आकाशवाणीवरील कार्यक्रम इत्यादींद्वारे होणाऱ्या संप्रेषणास अधिक महत्त्व प्राप्त होते. मुक्त विद्यापीठाचा विद्यार्थी अन्य कोणत्याही विद्यापीठाच्या तुलनेत कमी पडू नये या दृष्टिकोनातून विविध प्रकारे होणारे संप्रेषण परिणामकारक असणे आवश्यक ठरते. असे असले तरी ही साधने वापरताना किंवा शिक्षणक्रम अंमलबजावणीसाठी संप्रेषण माध्यम वापरताना अनेक अडथळे उद्‌भवतात, समस्या निर्माण होतात. या समस्यांचा अभ्यास केल्यामुळे मुद्रित

अध्ययनसाहित्य, संपर्कसत्रे, पत्रव्यवहार व एकूणच अंमलबजावणीसाठी जी साधने आहेत ती संप्रेषणाच्या दृष्टिकोनातून अधिक प्रभावी करता येतील. परिणामत: शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनाला चालना मिळून सर्वांगीण विकास साधता येईल. या दृष्टीनेच संप्रेषण साधनांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. स्वयं-अध्ययन पुस्तके हे यांपैकी सर्वांत महत्त्वाचे साधन आहे. अध्ययनसाहित्याबाबत चर्चा करताना सत्यपाल आनंद म्हणतात की, ''अध्ययनसाहित्य हे पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे साधन आहे.'' हे अध्ययनसाहित्य विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मार्गदर्शक ठरते. त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानग्रहण करण्याचे कौशल्य प्राप्त होते. तसेच ग्रहण केलेल्या ज्ञानाचे उपयोजन करता येते. सविता कौशल[२] यांनी म्हटले आहे की, ''दूर शिक्षणाची गुणवत्ता ही विद्यार्थ्याला पुरविण्यात येणाऱ्या अध्ययनसाहित्यावर अवलंबून असते. भारतासारख्या देशात आर्थिक भाग विचारात घेता दृक्-श्राव्य साधने मोठ्या प्रमाणात वापरणे अवघड आहे. अशा वेळी उत्तम दर्जाची स्वयं-अध्ययन पुस्तके हाच पर्याय आहे. दूर शिक्षणातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता वाढविल्याशिवाय तसेच बहुविध माध्यमांचा वापर केल्याशिवाय या शिक्षणाचा दर्जा उत्तम होऊ शकणार नाही.'' स्वयं-अध्ययन साहित्याच्या संदर्भात आट्टो पीटर्स[३] म्हणतात की, ''शाश्वत, काळजीपूर्वक व परिश्रम घेऊन तयार करण्यात आलेले साहित्य हे दूरशिक्षणाचा कणा (Backbone) आहे.'' दूरस्थ शिक्षण पद्धतीत शिकणारे विद्यार्थी हे विविध वयोगटांतील, तसेच आपली नोकरी, कामधंदा वा व्यवसाय करणारे असतात. या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे अध्ययनसाहित्य हे त्यांच्या गरजा ओळखून तयार करण्यात येत असते. विषयातील गाढा अनुभव असलेले तज्ज्ञ, लेखक, शिक्षक तसेच कुशल विषय संपादक आणि भाषिक संपादक मोठ्या परिश्रमाने अध्ययनसाहित्याची निर्मिती करतात. दूरस्थ शिक्षण पद्धतीत विद्यार्थी व शिक्षक असा थेट संबंध येत नसल्यामुळे निर्माण केलेले अध्ययनसाहित्य विद्यार्थ्याला स्वत: वाचून समजेल व विषयाचे आकलन परिणामकारक कसे होईल यांचा विचार करून तयार करण्यात आलेले असते.

पारंपरिक शिक्षण पद्धतीतील पुस्तके आणि दूरशिक्षण पद्धतीतील पुस्तके यांमध्ये फरक आहे. दूरस्थ शिक्षण प्रणालीची पुस्तके स्वयं-अध्ययनासाठी परिणामकारक व्हावीत यासाठी अनुदेशन प्रणालीचा उपयोग करण्यात येतो. अनुदेशन प्रणालीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्याला विषय समजण्यास सोपा जातो. प्रणाली ही एक विशिष्ट संरचना असून त्यातील कृती एका पाठोपाठ एक याप्रमाणे देण्यात येतात. या कृती तर्कसंगत असतात. पहिल्यानंतर दुसरी कृती किंवा पायरी तर्कशुद्धिरित्या येत असल्यामुळेच अभ्यासक्रमाचा आकृतिबंध तयार होतो. स्वयं-अध्ययन साहित्यासाठी अनुदेशन तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात आलेले साहित्य विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरते. अनुदेशनाचा संबंध ध्येयप्रेरित व पूर्वनियोजित अध्यापनप्रक्रियेशी येतो. अनुदेशनामुळे ध्येय साध्य करण्यासाठी बारीकसारीक गोष्टी कळतात. अनुदेशन पातळीवर काम करताना तुम्ही काय करणे आवश्यक आहे एवढेच शिकवणे अपेक्षित नसून त्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक ठरते. मुक्त विद्यापीठाच्या पुस्तकांमध्ये प्रास्ताविक, घटकांची उद्दिष्टे, विषय-विवेचन, सारांश, स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची नमुना उत्तरे या पद्धतीने आशयाची रचना करण्यात येते. या आकृतिबंधामुळे स्वयं-अध्ययन पद्धतीने आशय आत्मसात करण्यास विद्यार्थ्यांना मदत होत असते.



## ६. प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे

पाठ्यपुस्तकांद्वारे होणाऱ्या संप्रेषणाच्या दृष्टिकोनातून पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना स्वत: वाचून समजण्यास योग्य आहेत काय हे अभ्यासणे, पाठ्यपुस्तकांतील आशय घटकांच्या उद्दिष्टांनुसार आहे काय याची प्रचिती घेणे, स्वयं-अध्ययन पुस्तकांची रचना व छपाईची पद्धती योग्य आहे काय हे अभ्यासणे व स्वयं-अध्ययन पुस्तकांद्वारे द्विमार्गी संप्रेषण होते काय हे तपासणे ही प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे आहेत.

## ७. शोधनिबंधाची व्याप्ती

सदर शोधनिबंधाची व्याप्ती मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब. शिक्षणाक्रमापुरती मर्यादित आहे. या शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संप्रेषण साधने वापरण्यात येतात; त्यांपैकी स्वयं-अध्ययन पुस्तके या माध्यमाची परिणामकारकता तपासणे यापुरतीच ही व्याप्ती मर्यादित आहे.

## ८. माहिती संकलन

माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचे विकसत करण्यात आले होते. बी. लिब. शिक्षणक्रमाच्या महाराष्ट्रातील १६ अभ्यासकेंद्रांवरील विद्यार्थी, संमंत्रक व केंद्रसंयोजक प्रतिसादासाठी निवडण्यात आले होते. प्रत्येक अभ्यासकेंद्रावरील २० विद्यार्थी, सर्व संमंत्रक आणि केंद्रसंयोजक यांना प्रश्नावली पाठवून प्रतिसाद घेण्यात आला. बी.लिब. शिक्षणक्रमातील संप्रेषणाची जी विविध साधने आहेत त्यांपैकी 'स्वयं-अध्ययन पुस्तके' या साधनाबाबत प्रतिसादकांकडून मिळालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण प्रस्तुत निबंधात देण्यात आले आहे.

## ९. माहिती विश्लेषण

दूरस्थ शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना मानवी आधार मिळावा या दृष्टिकोनातून अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येते. ही संपर्कसत्रे रविवार, सुटीच्या दिवशी किंवा विद्यार्थी व संमंत्रकांच्या सोयीनुसार आयोजित करण्यात येतात. या संपर्कसत्रांना येताना विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन करून येणे अपेक्षित आहे. हे वाचन सुसह्य व्हावे या दृष्टिकोनातून पुस्तकांमध्ये देण्यात आलेल्या आशयाची सूत्रबद्ध रचना करण्यात आलेली असते. त्यामुळे विद्यार्थी परिणामकारकपणे आशय आत्मसात करू शकतो. स्वयं-अध्ययन करताना त्यास आलेल्या अडीअडचणी / शंकांचे निरसन मार्गदर्शक प्राध्यापक संपर्कसत्रामध्ये करतात. रायफॉक[४] यांच्या मते, ''विद्यार्थी अध्ययनासाठी वाचन करतात एवढेच न समजता पाठ्यपुस्तके अध्यापनासाठी लिहिली जातात हे पण लक्षात ठेवणे गरजेचे आहे. कारण अध्ययनक्रिया सफल होण्यासाठी पुस्तकामार्फत विद्यार्थ्याला चेतना मिळून अध्ययनप्रक्रिया होणे जरुरीचे असते.'' मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी 'स्वयं-अध्ययन पुस्तके' या माध्यमाचा कसा उपयोग होतो व पुस्तकांच्या आकृतिबंधामुळे संप्रेषणाची परिणमकारकता साधता येते काय हे तपासून पाहण्यासाठी

विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रत्याभरण मिळविण्यात आले. ह्या संप्रेषण परिणामकारकतेच्या प्रत्याभरणातून प्राप्त होणारा निष्कर्ष पुढील दिलेल्या कोष्टाकांवरून स्पष्ट होतो.

**कोष्टक क्र.१ : बी.लिब. शिक्षणक्रमासाठी मुक्त विद्यापीठाने तयार केलेले साहित्य विद्यार्थ्यांना स्वत: वाचून समजण्यास योग्य आहे काय हे दर्शविणारे कोष्टक**

| क्र. | वाचनसाहित्य विद्यार्थ्यांना स्वत: वाचून समजण्यास योग्य आहे काय? | विद्यार्थी | | संमंत्रक | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | शे.प्र. | एकूण | शे.प्र. |
| १. | योग्य | १३६ | ४७.८९ | २७ | ३८.०३ |
| २. | काही प्रमाणात योग्य | १४७ | ५१.७६ | ४२ | ५९.१५ |
| ३. | अयोग्य | ०१ | ००.३५ | ०२ | ०२.८२ |
| | एकूण प्रतिसाद | २८४ | १००.०० | ७१ | १००.०० |

कोष्टक क्र. १ वरून असे लक्षात येते की, मुक्त विद्यापीठाने बी.लिब. शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांना दिलेली पुस्तके स्वत: वाचून समजण्यास योग्य आहेत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४८% असून संमंत्रकांचे हेच प्रमाण ३८% आहे. स्वयं-अध्ययन पुस्तके वाचून समजण्यास काही प्रमाणात योग्य आहेत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२% असून संमंत्रकांचे हेच प्रमाण ५९% आहे. स्वयं-अध्ययन पुस्तके समजण्यास अयोग्य आहेत असे म्हणणाऱ्या विद्यार्थी व संमंत्रकांचे प्रमाण अत्यल्प असून ते अनुक्रमे ०.३५% व ३% एवढे आहे.

वरील विश्लेषणातील योग्य आणि काही प्रमाणात योग्य यांचे एकत्रीकरण केल्यास विद्यार्थी व समंत्रकांच्या प्रतिसादाचे प्रमाण अनुक्रमे ९९% व ९७% एवढे होईल. बहुतांशी विद्यार्थी व संमंत्रक यांचे मते मुक्त विद्यापीठाने तयार केलेले स्वयं-अध्ययन साहित्य अध्ययनाला प्रेरणादायी आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पाठ्यपुस्तकांचे नीट आकलन व्हावे या दृष्टिकोनातून देण्यात येणाऱ्या आशयाची सुव्यवस्थित मांडणी करण्यात येते. एका पाठ्यपुस्तकात साधारणपणे २ ते ५ घटक असतात. प्रत्येक घटकात उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय-विवचेन, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, स्वयं-अध्ययन प्रश्न-उत्तरे, सारांश, अधिक वाचनासाठी पुस्तके या क्रमाने माहितीची रचना करण्यात आलेली असते. पुस्तके स्वत: समजून घेण्यास या रचनेमुळे मदत होत असते. बी. लिब. शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तकातील आशय खरोखर घटकांच्या उद्दिष्टांनुसार संरचित झाला आहे काय ह्याबाबतही थेट विद्यार्थी व संमंत्रकांकडून प्रतिसाद मागविण्यात आला. या संदर्भात माहितीचे विश्लेषण कोष्टक क्र.२ वरून स्पष्ट होईल.



**कोष्टक क्र. २ : पाठ्यपुस्तकांतील आशय घटकांच्या उद्दिष्टांनुसार आहे काय हे दर्शविणारे कोष्टक**

| क्र. | पाठ्यपुस्तकांतील आशय घटकांच्या उद्दिष्टांनुसार आहे काय? | विद्यार्थी | | संमंत्रक | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | शे.प्र. | एकूण | शे.प्र. |
| १. | होय | २६५ | ९४.३१ | ७२ | ९८.६३ |
| २. | नाही | १६ | ५.६९ | १ | १.३७ |
| | एकूण प्रतिसाद | २८१ | १००.०० | ७३ | १००.०० |

कोष्टक क्र.२ चे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, पाठ्यपुस्तकातील घटकांचा आशय उद्दिष्टांनुसार आहे, असे म्हणणाऱ्या बी. लिब. च्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ९४% आहे; तर संमंत्रकांचे हे प्रमाण ९९% आहे. पाठ्यपुस्तकांतील आशय घटकांच्या उद्दिष्टांनुसार नाही असे म्हणणाऱ्या विद्यार्थी व संमंत्रकांचे प्रमाण अल्प असून ते अनुक्रमे ६% व १% आहे.

यावरून असे म्हणता येईल की, बहुतांश विद्यार्थी व संमंत्रकांच्या मते मुक्त विद्यापीठाने तयार केलेल्या पाठ्यपुस्तकांतील घटकांच्या उद्दिष्टांनुसार त्या त्या घटकांचा आशय आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकांद्वारे होणारे संप्रेषण परिणामकारक होते असे दिसून येते.

पाठ्यपुस्तकातील आशयाबरोबरच पुस्तक छपाईची मुक्त विद्यापीठाची पद्धती कशी वाटली यासंबंधी विद्यार्थी व संमंत्रकांनी नोंदविलेला प्रतिसाद कोष्टक क्रमांक ३ वरून स्पष्ट होईल.

**कोष्टक क्र. ३ : स्वयं-अध्ययन पुस्तके छापण्याची पद्धती कशी वाटली हे दर्शविणारे कोष्टक**

| क्र. | स्वयं-अध्ययन पुस्तके छापण्याची पद्धती कशी वाटली? | विद्यार्थी | | संमंत्रक | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | शे.प्र. | एकूण | शे.प्र. |
| १. | योग्य | २६८ | ९५.७१ | ६२ | ८६.११ |
| २. | अयोग्य | १२ | ४.२९ | १० | १३.८९ |
| | एकूण प्रतिसाद | २८० | १००.०० | ७२ | १००.०० |

कोष्टक क्र. ३ वरून असे लक्षात येते की, बी. लिब. शिक्षणक्रमाची स्वयं-अध्ययन पुस्तके छापण्याची पद्धती योग्य वाटली असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ९६% आहे. तर समंत्रकांचे हेच प्रमाण ८६% आहे. स्वयं-अध्ययन पुस्तके छापण्याची पद्धती अयोग्य आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थी व समंत्रकांचे प्रमाण अत्यल्प असून ते अनुक्रमे ४% व १४% एवढे आहे.

यावरून असे म्हणता येईल की बी. लिब. शिक्षणक्रमातील बहुतांश विद्यार्थी व समंत्रक छपाईबद्दल समाधानी दिसतात. मुक्त विद्यापीठाच्या पुस्तकांचा आकृतिबंध, अक्षरांचा टाईप, विशिष्ट ठळक शब्दांतील अक्षरे, पुस्तकातील डाव्या बाजूस सोडण्यात आलेला समास, आकृत्या, कोष्टके, प्रवाहदर्शिका या सर्व बाबींमुळे छपाईची पद्धती योग्य वाटते. त्यामुळे स्वयं-अध्ययन करताना परिणामकारक संप्रेषण घडून येते असे म्हणता येईल.

दूरस्थ शिक्षणपद्धतीत पाठ्यपुस्तकांच्या आकृतिबंधामुळे विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययन करणे सोपे जाते. विद्यार्थ्यांना ही पुस्तके स्वतःच अभ्यासावयाची असतात व आशय समजून घ्यावयाचा असतो. त्यामुळे पाठ्यपुस्तकातून द्विमार्गी संप्रेषण घडून येणे आवश्यक ठरते. अध्ययनकर्त्याने स्वतः शिकणे हे दूरशिक्षणाचे महत्त्वाचे अंग आहे. स्वयं-अध्ययन पुस्तकांबरोबर इतर अनेक सुविधांची निवड अध्ययनार्थीला करता येते. उदाहरणार्थ, दृक व श्राव्य ध्वनिफिती, दूरदर्शन, रेडिओ, इंटरनेट, समंत्रण सत्रे, इत्यादी. आशय आत्मसात करण्याची जबाबदारी ही अध्ययनार्थीवर असते. असे असले तरी 'स्वयं-अध्ययन' करणारा विद्यार्थी एकटा नसून त्याच्याबरोबर लेखक, शिक्षक, प्रशासक, माध्यम-निर्माते, मूल्यमापक, शिक्षणतज्ज्ञ, इत्यादी लोकांचा संघ असतो. या सर्व लोकांचे कार्य स्वयं-अध्ययनाला पूरक असे असते. स्वयं-अध्ययनसाहित्य तयार करताना विद्यार्थ्यांची वैशिष्ट्ये विचारात घेतली जातात. पर्यायाने स्वयं-अध्ययन साहित्याची भाषा सहसंवादी असते व त्यामुळे संप्रेषण परिणामकारक होते. आशय आकलनाच्या संदर्भात अध्ययनकर्त्यांकडून जे प्रत्याभरण मिळते (उदाहरणार्थ, गृहपाठ, चाचणी, प्रात्यक्षिके, प्रकल्प, तोंडी परीक्षा, अंतिम परीक्षा, इत्यादी) त्याद्वारे द्विमार्गी संप्रेषण घडून येत असते. बी. लिब. शिक्षणक्रमाच्या पुस्तकात द्विमार्गी संप्रेषण होते किंवा नाही हे कोष्टक क्र. ४ वरून स्पष्ट होईल.

**कोष्टक क्र. ४ : पाठ्यपुस्तकातून द्विमार्गी संप्रेषण होते काय हे दर्शविणारे कोष्टक**

| *क्र.* | *द्विमार्गी-संप्रेषण होते काय ?* | *एकूण समंत्रक* | *शे. प्र.* |
|---|---|---|---|
| १. | होय | ५६ | ७७.७८ |
| २. | नाही | १६ | २२.२२ |
| | एकूण प्रतिसाद | ७२ | १००.०० |



कोष्टक क्र. ४ वरून असे लक्षात येते की, बी. लिब. शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तकातून द्विमार्गी संप्रेषण होते असे म्हणणाऱ्या समंत्रकांचे प्रमाण ७८% असून द्विमार्गी संप्रेषण होत नाही असे म्हणणाऱ्या समंत्रकांचे प्रमाण २२% आहे.

पुस्तकातून द्विमार्गी संप्रेषण होते असे म्हणणाऱ्या समंत्रकांचे प्रमाण लक्षात घेता मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब. शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तकातील घटकांचा आकृतिबंध प्रभावी व योग्य आहे असे दिसून येते. याचाच दुसरा अर्थ शैक्षणिक अनुदेशन तंत्रज्ञानाचा मुक्त विद्यापीठ करीत असलेला वापरही योग्य असल्याचे स्पष्ट होते.

## सारांश

मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब. शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी असलेल्या संप्रेषण साधनांपैकी 'स्वयं-अध्ययन पुस्तके' हे महत्त्वपूर्ण साधन आहे. पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना स्वत: वाचून समजण्यास योग्य आहेत. पाठ्यपुस्तकांचा आकृतिबंध व छपाईची रचना यामुळे विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनास मदत होते. स्वयं-अध्ययन पुस्तकातून द्विमार्गी संप्रेषण (Two way communication) घडून येते. शिक्षणक्रमाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये अनुदेशन प्रणालीचा वापर केलेला असल्यामुळे परिणामकारक संप्रेषण घडून येते.

## *संदर्भ*

1. Anand Satyapal, (1979), *University Without Walls,* New Delhi, Vikas, P.76.
2. Kaushal Savita, (1995), 'Making Distance Education Work' in *University News,* Vol. XXX III, (48), Nov. 27, 1995
3 Peters Otto, (1997), 'Distance Eduction in a Postindustrial Society', in Desmond Keegan (Ed), *Theoretical Principles of Distance Education,* London, Routledge, P. 50.
4. Deshpande P. M., (1993), *Instructional System Design,* Nashik, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, P.64
5. वरखेडे रमेश, (२०००), *स्वयं-अध्ययन पुस्तकांचे लेखन व समीक्षण : मार्गदर्शक पुस्तिका,* नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

❑ ❑ ❑

# आंतरराष्ट्रीय ग्रंथ व स्वामित्व हक्क दिन : २३ एप्रिल

जगदीश कुलकर्णी

*आंतरराष्ट्रीय ग्रंथ दिन ग्रंथालयाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरतो. अशा दिवशी ग्रंथालयांनी केवळ उत्सवी कार्यक्रम न करता वाचन संस्कृतीची वाढ करण्यासाठी काय करायला हवे याचे दिग्दर्शन करणारे हे टिपण.*

*जेणे होय उपरती, अवगुण पालटती !!*
*जेणे चुके अधोगती, त्या नाव ग्रंथ !!*

**– समर्थ रामदास स्वामी**

जीवनात बदल घडविणारे, अवगुणांचे सगुणांत रूपांतर करणारे, विनाशापासून वाचविणार असे ते ग्रंथ असे अर्थपूर्ण विवेचन समर्थ रामदासांनी केले आहे. ग्रंथ हेच गुरू असेही आपण म्हणतो. मानवाच्या जीवनात ग्रंथास अनन्यसाधारण महत्त्व आहे. या ग्रंथांविषयी आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करणे त्याहीपेक्षा ग्रंथांचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात जग खूपच जवळ आले आहे. इंटरनेट व संगणकाच्या साह्याने कागदविरहित समाज निर्माण होणार अशीही चर्चा होत आहे. दृक-श्राव्य माध्यमाचा मारा एवढा प्रचंड आहे की, भविष्यात मुद्रित साधनांकडे कुणी पाहणार का नाही असा प्रश्न पडत आहे. एकीकडे वाचनाची आवड कमी होऊन ग्रंथप्रसार कमी होत आहे तर दुसरीकडे श्रमांनी केलेल्या ज्ञाननिर्मितीची चोरी, पायरसीही मोठ्या प्रमाणावर होत आहे. साहित्यनिर्मिती ही बौद्धिक परिश्रमांतून साध्य झालेली संपदा आहे; ती कॉपी करून, स्वरूप बदलून आपल्या नावाने खपवण्याचा व त्यातून आर्थिक, सामाजिक स्वार्थ साधण्याचा प्रयत्न होतो आहे.

या बाबींचा विचार करून त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न सर्वत्र चालू आहेत. ग्रंथाचे महत्त्व प्राचीन काळापासून ज्ञात आहे. बदलत्या काळात त्याची जाणीव करून देण्याची गरज होती तीही वेळोवेळी पूर्ण केली गेली आहे. १९७२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय ग्रंथवर्ष म्हणून साजरे करण्यात आले. वाचनाभिरुची वाढावी, टिकावी व तिचा प्रसार व्हावा या दृष्टीने सर्वत्र प्रयत्न झाले. भारतात नॅशनल बुक ट्रस्टची स्थापना करण्यात आली. दरवर्षी १४ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर हा कालावधी ग्रंथसप्ताह म्हणून साजरा केला जातो. ग्रंथ, ग्रंथालये व वाचन चळवळ या संबंधीचे विविध उपक्रम या सप्ताहात राबविण्यात येतात. भारत सरकारने 'सर्वांसाठी पुस्तके' हे घोषवाक्य घेऊन २००१-२००२ हे वर्ष 'ग्रंथवर्ष' म्हणून साजरे केले. वाचनाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने या वर्षात विविध स्तरांवर प्रयत्न झाले.



युनेस्कोने १९९५ पासून २३ एप्रिल हा दिवस जागतिक ग्रंथदिन म्हणून घोषित केला. आंतरराष्ट्रीय प्रकाशक परिषदेने ग्रंथदिन साजरा करण्याची कल्पना सर्वप्रथम मांडली. ही कल्पना स्पेनच्या शासनामार्फत युनस्कोपुढे ठेवण्यात आली. युनेस्कोच्या आमसभेने २३ एप्रिल हा दिवस ग्रंथदिन म्हणून मान्य व घोषित केला. ग्रंथाचे माहिती, ज्ञान प्रसारातील प्रभावी स्थान, स्थानिक ते जागतिक स्तरावरील ठेवा वारसाचे आकलन होण्यातील कार्य व परस्परांत सामंजस्य, सहिष्णुता व संवाद घडवून आणण्याचे सामर्थ्यही लक्षात घेतले गेले. रशियन फेडरेशनने यात स्वामित्व हक्काची जाणीव जोडण्याची विनंती केली, त्यानुसार हा दिन ग्रंथ व स्वामित्व हक्क दिन म्हणून घोषित केला गेला.

एकदंरीत वाचनाभिरुची वाढविणे, प्रकाशन उद्योगाला चालना देणे, बौद्धिक हक्कांचे संरक्षण करणे या तिहेरी हेतूने युनेस्कोद्वारे २३ एप्रिल हा दिवस जागतिक ग्रंथ व स्वामित्व हक्क दिन म्हणून साजरा केला जातो.

२३ एप्रिल हा स्पेनमधील सेंट जॉर्ज यांचा स्मृतिदिन. या दिवशी स्पेनमधील कॅटलोनिया येथे हा दिवस वेगळ्या स्वरूपात साजरा केला जातो. या दिवशी एकमेकांना पुस्तक व गुलाबपुष्प भेट दिले जाते. याचबरोबर महान साहित्यिक विल्यम शेक्सपियर, डॉन क्वीझोटकार – सर्वाटीन्स इन्का गार्सीलोस डे यांचाही हा स्मृतिदिन. त्याचबरोबर काही इतर जागतिक पातळीवरील जगन्मान्य साहित्यिकांचा जन्म किंवा स्मृतिदिन २३ एप्रिल आहे. त्यांच्या स्मृतीला आदरांजली व आदरभाव व्यक्त करण्यासाठी हा दिवस ग्रंथदिन म्हणून साजरा करतात.

या दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन समाजातील विविध घटकांनी आपापल्या परीने विविध उपक्रम राबविणे गरजचे आहे. लेखक, प्रकाशक, शिक्षक, ग्रंथपाल, प्रसारमाध्यमे व सामाजिक संस्थांनी राबविण्यासारखे काही उपक्रम पुढे दिले आहेत.

## लेखक प्रकाशकांनी राबवण्यासारखे उपक्रम

(१) एक ग्रंथ, एक गुलाब भेट द्या ही विशेष मोहीम राबविणे.

(२) जागतिक ग्रंथदिनी लेखकांच्या स्वाक्षरी असलेले ग्रंथ विशेष सूट देऊन वाचकांपर्यंत जाऊन विकणे / पोहोचविणे.

(३) युनेस्कोने ग्रंथदिनानिमित्त तयार केलेल्या साहित्याद्वारे (लोगो, भित्तिपत्रके, झेंडे, स्टिकर्स, ग्रंथखुणपट्टी, टी शर्टस्, पोस्टकार्ड इत्यादी) प्रचार व प्रसार करणे.

(४) बऱ्याच कालावधीपासून न विकलेली पुस्तके रुग्णालयाची ग्रंथालये, तुरुंगातील ग्रंथालये, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागातील ग्रंथालयांना भेटस्वरूप किंवा कमी किंमतीत देणे.

## शिक्षक व ग्रंथपालांनी राबवण्यासाठी उपक्रम

(१) मुले आणि तरुण विद्यार्थ्यांसाठी वाचनस्पर्धांचे आयोजन करणे.

(२) नवलेखकांना प्रोत्साहित करण्यासाठी, लघुकथा, कादंबरी , काव्यस्पर्धा आयोजन करणे.

(३) ग्रंथ व ग्रंथ उत्पादनाची प्रक्रिया यासंबंधी मार्गदर्शनपर व्याख्यान व प्रदर्शन आयोजित करणे.

(४) स्वामित्व हक्क (बौद्धिक संपदा हक्क) संबंधी विद्यार्थी व वाचकांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

(५) एखाद्या विषयावर किंवा एखाद्या लेखकाच्या साहित्यावर ग्रंथप्रदर्शन आयोजित करणे.

(६) ग्रंथलेखन, वाचन इत्यादी घोषवाक्य स्पर्धा घेणे व त्याद्वारे ग्रंथ व ग्रंथदिनाचा प्रसार करणे.

(७) ग्रंथालये पूर्ण एक दिवस सर्वांसाठी खुली करणे.

(८) साहित्य चर्चा, मेळावे, जत्रांचे आयोजन करून लेखक, वाचक, विद्यार्थी, पालक यांच्यात मनमोकळी चर्चा घडवून आणणे.

(९) वाचकांना वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी पत्रे लिहिणे.

(१०) अंध, आजारी, अपंग, अशिक्षितांना त्यांच्या घरी जाऊन वाचून दाखविणारे कार्यकर्ते (लोकवाचक) निर्माण करणे.

(११) ग्रंथालये, ग्रंथागार व वैयक्तिक ग्रंथसंग्रहाकडे विशेष लक्ष देणे.

(१२) ग्रंथवाचनामुळे झालेल्या फायद्यांची उदाहरणे देऊन वाचनाचे महत्त्व पटवून देणे.

(१३) ग्रंथ सर्वसामान्यांच्या जीवनाचा भाग होण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे.

(१४) बालग्रंथालयाकडे विशेष लक्ष पुरविणे.

(१५) फिरती ग्रंथालये चालू करून ग्रंथालयात न येणाऱ्या व्यक्तींना ग्रंथसुविधा पुरविणे.

(१६) कल्पक भित्तिपत्रके व घोषवाक्यांच्या साह्याने ग्रंथ महती पटवून देणे.

## प्रसारमाध्यमे व सामाजिक संस्थांनी राबवण्यासारखे उपक्रम

(१) वाचन, ग्रंथस्वामित्व हक्क, बौद्धिक हक्क संपदा, यांसंबंधीचे लेख, वर्तमानपत्र, नियतकालिकांतून प्रसिद्ध करणे. स्वामित्व हक्कभंगाच्या, पायरसीच्या घटना प्रकाशात आणणे.

(२) चालू घडामोडी अंतर्गत माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात मुद्रित साहित्यविश्वाचे स्थान या व ग्रंथ बौद्धिक हक्क संपदा या विषयावर चर्चा, मुलाखती, स्पर्धा इत्यादींचे आकाशवाणी व दूरदर्शनवर आयोजन करणे.

(३) नवलेखक, कलाकार, संगीतकार, चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देणे.

(४) पत्रकारांच्या सर्जनशील लिखाणास प्रोत्साहन देणे, समाजमान्यता मिळवून देणे.

(५) राष्ट्रीय बौद्धिक निर्मितीक्षमतेवर स्वामित्व हक्कभंगाच्या, पायरसीच्या होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे.

(६) आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी भाषांतरास, अनुवादास प्रोत्साहन देणे. त्या अनुषंगाने चर्चा घडवून आणणे.

(७) साक्षरता, प्रौढ शिक्षण व सर्वांसाठी शिक्षण यात ग्रंथ व वाचनाचे महत्त्व यावर परिसंवाद घडवून आणणे.



(८) जागतिक विकास नियोजनात राष्ट्रीय प्रकाशन व्यवसायाची भूमिका विशद करणे. लोकशाही व संस्कृती संवर्धनासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची भूमिका यावर चर्चा घडवून आणणे.

(९) प्रसिद्ध अभिनेते, क्रीडापत्रकार, विश्वसुंदरी यांच्या हाती पुस्तक देऊन मी वाचते/ वाचतो, तुम्हीही वाचा हा संदेश विविध माध्यमांतून जनतेपर्यंत पोहोचविणे.

आंतरराष्ट्रीय ग्रंथदिनाचे महत्त्व लक्षात घेऊन सर्वच सुशिक्षित नागरिकांनी

*दिसामजी काही तरी लिहावे*
*प्रसंगी अखंडित वाचीत जावे !!*

ही समर्थ रामदासांची उक्ती प्रतिज्ञा म्हणून पाळावी व इतरांना नवनवीन उपक्रमांच्या माध्यमांतून ग्रंथांचे, वाचनसंस्कृतीचे महत्त्व व बौद्धिक संपदा हक्काची जाणीव करून द्यावी.

❑ ❑ ❑

## ग्रंथपारखी नजर – ५

सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांचा चरित्र-कोश संशोधकांची तहान भागविण्यास पुरेसा नाही. त्यांचं काम मोठंच आहे, तरीही नोंदी त्रोटक आहेत. त्यातही ब्रिटिश अधिकाऱ्यांविषयी चरित्रात्मक नोंदी मिळणं. मराठी संशोधकाला अवघड जातं. ब्रिटिश कौन्सिलच्या लायब्ररीत असणाऱ्या 'हू वॉज हू' खंडांचं मला इतकं अप्रूप वाटलं की, मी त्या खंडातल्या नोंदी उतरून काढण्यात कित्येक दिवस खर्ची टाकले आहेत. अर्थात हे जेव्हा मी केलं तेव्हा सेकंदात 'नकला' करून देणारी यंत्रं सहजी उपलब्ध नव्हती. 'हू वॉज हू' चे खंडही मला पुन्हा पुस्तकांच्या दुकानात कधी आढळले नाहीत.

असा वेळी अचानकपणे एक दिवस माझ्या हाती दिल्लीच्या मनोहर बुक सर्व्हिसमध्ये बकलँड यांनी संकलित केलेला *'डिक्शनरी ऑफ इंडियन बायॉग्राफी'* हा चरित्रकोश सापडला. त्या दिवसापासून पंधरवडा तरी त्या चरित्र-कोशाची पानं अथपासून इतिपर्यंत कादंबरी वाचावी इतक्या उत्कंठतेने मी चाळली, मुंबई इलाख्यातल्या अधिकाऱ्यांच्या अल्पचरित्रांवर मी खुणा करून ठेवल्या. आजही इंग्रजी शब्दकोश चाळण्याची सवय जडलेली व्यक्ती जशी वेळ मिळताच त्या शब्दकोशाचं कोणतंही पृष्ठ उघडून शब्दार्थ आत्मसात करत असते, तसंच मी बकलँडच्या चरित्र-कोशातल्या नोंदी पुनःपुन्हा वाचत असतो. या माझ्या प्रयत्नांनी माझं किती भलं केलं आहे म्हणून सांगू? माझा घरचा दूरध्वनी क्रमांक कधीमधी माझ्या विस्मृतीत जातो, पण गव्हर्नर, न्यायाधीश, लेखक, सनदी अधिकारी यांच्याविषयीच्या चरित्रात्मक नोंदी माझ्या पक्क्या स्मरणात राहिल्या. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातल्या महाराष्ट्राचं – खरं तर मुंबई इलाख्याचं – बऱ्यापैकी भान मला आलं. बकलँडच्या चरित्र-कोशात मिळालेल्या नोंदीवरून कोणाची कोणती पुस्तकं आपल्या संग्रहात नाहीत, याची जाणीव होऊ लागली अन् ती मिळवण्याच्या प्रयत्न मी करू लागलो.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी, पृ. ८०-८१

# अहमदाबाद लायब्ररी नेटवर्क (ॲडिनेट)

सचिन गराटे

*अहमदाबाद येथील संगणकीय जाळ्यांद्वारा दिली जाणारी सेवा ॲडिनेट (ADINET) या नावाने प्रसिद्ध आहे. या जाळ्यांद्वारा दिल्या जाणाऱ्या सेवा कुठल्या याची माहिती ग्रंथपालन व्यवसायातील सर्वांनाच उपयुक्त वाटेल; परंतु नुसते वाचन करून सोडून देण्यापेक्षा त्याचा प्रत्यक्ष वापर करण्यावर भर ठेवायला हवा.*

संशोधनात माहितीचे महत्त्व अनन्यसाधारण असते. माहिती निर्मितीवर व माहितीच्या वितरणावर पुढील संशोधन अवलंबून असते; परंतु माहितीची निर्मिती ही प्रचंड प्रमाणात होते. या निर्माण झालेल्या अतिप्रचंड माहितीबद्दलची माहिती प्रत्येक अभ्यासकाला मिळणे तिच्या विखुरलेल्या स्वरूपामुळे कठीण होऊन जाते. यावर उपाय म्हणून प्रकाशित महितीची सूचिबद्ध माहिती तयार करून ती या अभ्यासकांना उपलब्ध करून देऊन त्यांच्या अभ्यासाचा कार्यभाग पुढे जाण्यास चालना देणे. अभ्यासकांची ही गरज लक्षात घेऊन अशा प्रकारची सूचिबद्ध माहितीसेवा अनेक माहिती केंद्रांनी तसेच काही व्यक्तींनी खास प्रकल्प राबवून उपलब्ध करून दिली आहे. या सूचिबद्ध माहितीसेवेमुळे अभ्यासकांचा किती वेळ वाचतो व किती नवीन विषय त्यांच्या पाहण्यात येतात याचे मराठीतील उत्तम उदाहरण म्हणजे शंकर गणेश दाते यांची 'मराठी नियतकालिक सूची १८०० ते १९५०'. या सूचीत दीडशे वर्षांच्या कालखंडातील नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांची सूची विषयानुसार पाहण्यास मिळते. अभ्यासकाच्या माहिती शोधण्यातील कितीतरी वेळ या सूचीमुळे वाचतो.

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अशी सूचिबद्ध माहिती छापील स्वरूपाबरोबरच यंत्रवाचनीय स्वरूपातही उपलब्ध होऊ लागली आहे. स्वतंत्र विषयाला वाहिलेले डेटाबेसेस् निर्माण झाले. यात त्या विशिष्ट विषयाची माहिती सूचिबद्ध वा फुलटेक्स्ट् स्वरूपात पुरविली जाते. हे डेटाबेसेस् जसे विषयांचे होते तसे विशिष्ट ग्रंथालयांचेही उपलब्ध झाले. विशिष्ट ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या माहितीची माहिती पुरविण्याचे काम हे डेटाबेसेस् करतात. पुढे विशिष्ट स्थळमर्यादेत येणाऱ्या माहितीकेंद्र व ग्रंथालयांचे डेटाबेसेस् त्या सर्व ग्रंथालयांच्या समाईक उपयोगाकरिता



सहकार्याच्या भावनेने एकत्र आणले गेले. यात विशिष्ट भौगोलिक स्थळातील ग्रंथालये आणि माहितीकेंद्रे एकमेकांशी जोडून (नेटवर्कद्वारे) ही सूचिबद्ध मीहतीसेवा पुरविली जाऊ लागली. उदाहरणार्थ, पुणेनेट (पुणे लायब्ररी नेटवर्क), बोनेट (बॉम्बे लायब्ररी नेटवर्क), डेलनेट (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) इत्यादी. असेच एक नेटवर्क निसाटच्या सहकार्याने अहमदाबाद शहरात सुरू झाले, ते म्हणजे 'ADINET' (अहमदाबाद लायब्ररी नेटवर्क).

'ॲडिनेट' हे अहमदाबाद शहरातील ग्रंथालयांचे मीहती जाळे(इन्फॉरमेशन नेटवर्क). १९९४ मध्ये रजिस्टर्ड झालेले हे माहितजाळे निसाटच्या (नॅशनल इन्फॉरमेशन सिस्टीम फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी) सहकार्याने सुरू झाले.

ग्रंथालये वा इन्फॉरमेशन सेंटर्समध्ये माहितीची साठवण केलेली असते. ही माहिती पुस्तके, नियतकालिके व इतर साधनांच्या स्वरूपात असते. तंत्रज्ञानात झालेल्या विकासामुळे, त्याचा वाढता वापर व ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत झालेली वाढ आणि संशोधन यामुळे माहिती प्रकाशित करण्याची माध्यमे जशी छापील स्वरूपातील होती, तशी यंत्रवाचनीय स्वरूपातही येऊ लागली. प्रकाशित माहिती ग्रंथ,नियतकालिकाबरोबर फ्लॉपीज्, सीडीज् त्याचबरोबर इंटरनेटवर ऑनलाईन स्वरूपातही प्रकाशित होऊ लागली. कोणत्याही ग्रंथालयाला एखाद्या विशिष्ट विषयात प्रकाशित होणाऱ्या माध्यमांचे वा साधनांचे संकलन करणे त्या संस्थेकडे उपलब्ध असलेले अपुरे आर्थिक बळ, त्या साधनांविषयी मिळणारी माहिती, ती मिळण्यातील अडचणी अशा अनेक कारणांनी शक्य नसते. 'रिसोर्स शेअरिंग' ही कल्पना या अडचणींवर मात करून कार्यरत होते. 'रिसोर्स शेअरिंग' चे महत्त्व ओळखून 'अहमदाबाद लायब्ररी नेटवर्क' सुरू करण्यात आले आहे.

अहमदाबाद शहरातील ग्रंथालये व माहिती सेवा केंद्रे यांमध्ये परस्परांच्या सहकार्याचा मार्ग निर्माण करणे आणि त्यातून आपल्या उपभोक्त्यांना, ग्रंथपालांना विशिष्ट सेवा पुरविणे हा महत्त्वाचा उद्देश 'ॲडिनेट' समोर ठेवला आहे. ॲडिनेटमध्ये सहभागी असलेल्या ग्रंथालयांचे जाळे तयार करण्यासाठी सदर ग्रंथालये नेटवर्किंगद्वारे जोडली गेली आहेत. या ग्रंथालयांत उपलब्ध असणाऱ्या माहिती साधनांची एक मध्यवर्ती संघ तालिका तयार केली गेली असून, या संघ तालिकेद्वारे माहितीसेवा देण्याचे काम तर होतेच; शिवाय सहभागी ग्रंथालयातील ग्रंथ तसेच इतर माहितीसाधनांच्या खरेदीमध्ये एकसारख्याच प्रतींची खरेदी टाळून ग्रंथालयाचा 'संग्रह विकास'(Collection Development) साधला जातो. उदाहरणार्थ, एखादा महागडा ग्रंथ खरेदी करण्यापूर्वी तो इतर सहभागी ग्रंथालयात उपलब्ध आहे का ते संघ तालिकेत पाहिले जाते. आणि आवश्यकता असली तरच तो खरेदी केला जातो; अन्यथा तो ग्रंथ सहभागी ग्रंथालयांकडून उपलब्ध करून घेता येऊ शकतो. अडिनेटचे सूचिबद्ध माहितीसेवा देण्याचे कार्य या मध्यवर्ती डेटाबेसमधून केले जाते. अहमदाबाद शहारातील ग्रंथालयांमध्ये ग्रंथ, नियतकालिके आणि ग्रंथेतर साहित्य यांच्या माहितीचा समावेश या डेटाबेसमध्ये आहे. वेळोवेळी हा डेटाबस अद्ययावत ठेवला जातो. सद्यःस्थितीत या डेटाबेसमध्ये ग्रंथालयात आलेल्या नवीन माहितीचा समावेश केलेला आहे. जुना माहितीसाठा हा प्रचंड प्रमाणात असून तो 'रिट्रोस्पेक्टिव्ह कन्व्हर्जन' द्वारा समाविष्ट करण्याचा ॲडिनेटचा प्रयत्न चालू आहे.

## 'ॲडिनेटची' उद्दिष्टे

(१) अहमदाबाद शहरातील ग्रंथालये आणि माहितीसेवा केंद्रे यांमध्ये सहकार्याच्या मार्गाने सेवा निर्माण करणे.

(२) अहमदाबादमधील प्रचलित, अर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक माहिती एका क्रियाशील माहिती जाळ्यात एकत्रित करणे.

(३) 'रिसोर्सेस शेअरिंग ' या फायदेशीर योजनेद्वारे अहमदाबादमधील ग्रंथालये आणि माहितीसेवा केंद्रे यांची ऑनलाईन 'मध्यवर्ती संघ तालिका' तयार करणे, ज्यात उपलब्ध ग्रंथ, नियतकालिके आणि ग्रंथेतर साहित्य यांची सूचिबद्ध माहिती असेल.

(४) इतर उपलब्ध असलेले व होणारे स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माहिती जाळे व ग्रंथालये यांमध्ये माहिती देवाणघेवाण पद्धती निर्माण करणे.

(५) सहभागी ग्रंथालयांना ग्रंथनिवड, ग्रंथसंग्रह, शेअरिंग व माहितीसेवा पुरविण्यासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शन करणे.

(६) उपलब्ध माहितीच्या वापर करण्यासंदर्भात उपभोक्त्यांना मार्गदर्शन व शिक्षण देणे.

(७) सहभागी ग्रंथालयांचा 'वाचनसाहित्य संग्रह विकास' (Collection Development) करणे.

## 'ॲडिनेट'द्वारा दिल्या जाणाऱ्या सेवा

### (१) चालू नियतकालिकांतील लेखसूची (करंट पीरिऑडिकल डेटाबस)

ॲडिनेटने अहमदाबाद शहरातील जवळ जवळ १२२ ग्रंथालयांतून उपलब्ध होणारा डेटाबस तयार केला आहे. यात या नियतकालिकांची सूचिबद्ध माहिती मिळते. हा डेटाबस छापील स्वरूपात तसेच ऑफलाईन (सीडी, फ्लॉपीवर) व ऑनलाईन स्वरूपातही उपलब्ध करून दिला आहे.

### (२) आंतरग्रंथालयीन देवघेव

आंतरग्रंथालयीन डॉक्युमेंट डिलिव्हरी सेवा पुरविली जाते. अभ्यासकांनी डेटाबेस मधून निवडलेल्या संदर्भाची फुलटेक्स्ट् प्रत उपलब्ध करून देण्याचे काम ॲडिनेट करते.

### (३) ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नियतकालिकांच्या अनुक्रमणिकांची सेवा (कंटेंट पेज सर्व्हिस)

ॲडनिटेच्या सर्व सभासदांना ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील नियतकालिकांची कंटेंट पेजेस् पाठविली जातात. वाचकांच्या गरजेनुसार फुल टेक्स्ट् माहितीही उपलब्ध करून दिली जाते.



### (४) प्रतिलिपी सेवा

ॲडिनेटमध्ये सहभागी असणाऱ्या ग्रंथालयांतून येणाऱ्या नियतकालिकांच्या फोटोकॉपीज् मागणीनुसार पुरविल्या जातात.

### (५) इंटरनेट वापराची सुविधा (इंटरनेट सर्फिंग सेवा)

'इंटरनेट सर्फिंग' सेवा पुरवली जाते. ॲडिनेटद्वारे इंटरनेट ॲक्सेस मिळविता येतो. ई-मेल, डाऊनलोडिंग आणि प्रिंटआऊट सेवाही यात पुरविल्या जातात.

### (६) अहमदाबाद शहरातील ग्रंथालये आणि माहितीसेवा केंद्रांत उपलब्ध असलेल्या विविध डेटाबेसेसचा डेटाबेस

अहमदाबाद शहरातील विविध ग्रंथालये आणि माहितीकेंद्रे यांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध डेटाबेसेसची माहिती आपल्या उपभोक्त्यांना उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम ॲडिनेट करते. यासाठी एक डेटाबेस तयार करण्यात आला आहे. सूचींच्या सूचीसारखा हा प्रकार अभ्यासकांना उपयुक्त डेटाबेसची माहिती पुरवून रेफरल सेवा देत आहे.

### (७) ग्रंथपाल आणि माहिती अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक वृद्धीकरिता साहाय्य

#### (अ) ग्रंथपालांना नोकरीची संधी

JOLI (Job Opportunity for Librarians) हा ॲडिनेटचा डेटाबेस ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विद्यार्थी तसेच ग्रंथपालांना पुढे चांगल्या अपेक्षा ठेवण्यासारख्या नोकऱ्यांची संधी उपलब्ध करून देतो. अनेक संस्था व ग्रंथालये ॲडिनेटची सभासद असल्याने 'जॉली' या डेटाबेसचा उपयोग करून आपल्या ग्रंथालयात कुशल सेवकांची भरती करून घेतात. या क्षेत्रातील नवीन विद्यार्थ्यांना एक चांगला प्लॅटफॉर्म ॲडिनेटने उपलब्ध करून दिला आहे.

#### (आ) नवीन ग्रंथालय सेवकांसाठी इंटरनेट प्रशिक्षण

इंटरनेटचा वापर सर्वच क्षेत्रांत उत्तमरित्या केला जात असल्याने ग्रंथालय आणि माहितीसेवा क्षेत्रात याचा वापर पुरेपूर व योग्य पद्धतीने व्हावा यासाठी इंटरनेट वापरण्यासंबंधीचे शिक्षण ग्रंथपाल व ग्रंथालय सेवकांना देण्याचे काम ॲडिनेट उत्स्फूर्तपणे करते.

#### (इ) ॲडिनेट 'स्टडी सर्कल' आणि सभा

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नवीन संकल्पना, ग्रंथालयाची सुधारणा, संगणकीकरण, ग्रंथपालांना येणाऱ्या अडचणी यांवर चर्चा करण्यासाठी ॲडिनेट स्टडी सर्कलचे आयोजन करते. दर दोन महिन्यांतून एकदा, दुसऱ्या महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी संध्याकाळी पाच वाजता ह्या सभा आयोजित केल्या जातात.

### (ई) प्रशिक्षणाचे कार्यक्रम

ग्रंथालयाच्या संगणकीकरणासाठी उपलब्ध असलेल्या प्रणालींपैकी (CDs/ISIS, WINSIS) या प्रणालींच्या वापरकाकरिता ॲडिनेट खास प्रशिक्षण नियमित आयोजित करते. या प्रशिक्षणाकरिता फी आकारली जाते. जास्तीत जास्त दहा प्रशिक्षणार्थींना या कार्यक्रमामध्ये प्रवेश दिला जातो. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला ५०० रुपये शुल्क आकारण्यात येते.

### (उ) डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

ॲडिनेट दरवर्षी रंगनाथन यांची जयंती साजरी करते. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयशास्त्रातील प्रचलित विषयांवर सेमिनार आयोजित करून हा कार्यक्रम साजरा केला जातो.

### (ऊ) ग्रंथपालांसाठी इतर सेवा व सुविधा

सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या ग्रंथपालांना काही समाईक अडचणींना तोंड द्यावे लागते. बजेटची कमतरता, प्रशिक्षित सेवकांचा अभाव यामुळे ग्रंथपालांची नियमित कामे पार पाडणेही त्यांना कठीण होऊन जाते. अशा वेळी ग्रंथपालांना योग्य मार्गदर्शन व मदतीची आवश्यकता भासते. ॲडिनेट अशा ग्रंथपालांना अगदी नाममात्र शुल्कात पुढील सेवा आपल्या प्रशिक्षित अधिकाऱ्यांकडून उपलब्ध करून देते.

(१) ग्रंथालयाचे संगणकीकरण करून देणे.

(२) ग्रंथांचे सोपस्कार पूर्ण करून देणे.

(३) ग्रंथालयाची ग्रंथमोजणी

(४) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण

(५) ग्रंथालय विकासाचा कार्यक्रम

(६) ग्रंथालयाच्या शिल्लक कामांची पूर्तता.

(७) ॲडिनेटच्या सभासदांना काही निवडक सायबर कॅफेमध्ये २०% सूट दिली जाते.

### (ए) ॲडिनेटच्या वेबसाईटवर ग्रंथपालांची डिरेक्टरी उपलब्ध करणे

गुजरातमधील व्यावसायिक ग्रंथपालांची माहिती ॲडिनेटच्या वेबसाईटवर उपलब्ध केलेली आहे. ही माहिती नोंदविणे नि:शुल्क असून ती ई-मेलच्या माध्यमातूनच नोंदविता येते.

## ॲडिनेटची प्रकाशने

### (१) ॲडिनेट न्यूजलेटर

'ॲडिनेट न्यूजलेटर' हे त्रैमासिक नियमित प्रकाशित केले जाते. ॲडिनेटच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेले हे प्रकाशन सर्वांसाठी उपलब्ध आहे.



### (२) महाविद्यालये, विद्यापीठे व इतर संस्थांची यादी (डिरेक्टरी)

अहमदाबाद व गांधीनगर शहरांत अस्तित्वात असलेल्या विविध संस्था, महाविद्यालये तसेच गुजरात राज्यातील विद्यापीठांची डिरेक्टरी ॲडिनेट प्रकाशित करते. जुलै २००४ मध्ये प्रकाशित केलेल्या डिरेक्टरीची किंमत १०० रुपये आहे.

### (३) चर्चासत्रातील कामकाजाचा अहवाल (प्रोसेडिंग्ज)

वेळोवेळी आयोजित केलेल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील सेमिनारमध्ये सादर केलेल्या निबंधांचे संकलन करून काही पुस्तके ॲडिनेटने प्रकाशित केली आहेत. या प्रकाशनांची किंमत प्रत्येकी शंभर रुपये असून ग्रंथालयांसाठी प्रत्येकावर १५% सूट दिली आहे. ती प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत :

(अ) 'लायब्ररी ॲन्ड इन्फॉरमेशन प्रोफेशन इन गुजरात : प्रॉब्लेम्स्, चॅलेंजेस अँड सजेस्टेड रिमेडीज', ऑगस्ट २००१.

(आ) 'लायब्ररी अँड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी फॉर लायब्ररीज अँड इन्फॉरमेशन सेंटर्स इन चेंजिंग इन्व्हायरन्मेंट', ऑगस्ट २००२.

(इ) 'ट्रेड इन लायब्ररीयनशिप', ऑगस्ट २००३.

(ई) 'ई-प्रोडॅक्टस् फॉर लायब्ररी अँड इन्फॉरमेशन सेंटर्स' ऑगस्ट २००४.

### (४) संघतालिका

अहमदाबादमधील १२२ सभासद ग्रंथालयांमधून घेतल्या जाणाऱ्या नियतकालिकांची संघतालिका ॲडिनेटकडे उपलब्ध आहे. एकूण ४६२५ नियतकालिकांची ही यादी त्या नियतकालिकांचे उपलब्धी स्थानही दर्शविते. या यादीची किंमत शंभर रुपये असून तिची सीडी दीडशे रुपयांना उपलब्ध आहे.

### (५) 'CUCOLIS' फॉर लायब्ररी ॲन्ड इन्फॉरमेशन प्रोफेशनल्स्

'CUCOLIS' हे ॲडिनेटचे नियतकालिक वर्षातून सहा वेळा प्रकाशित होते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील निवडक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची अनुक्रमणिका यात समाविष्ट असते. ५०पेक्षा जास्त नियतकालिकांचा समावेश यात केला जातो. या नियतकालिकाची वार्षिक वर्गणी ५०० रुपये असून ग्रंथालयशास्त्रातील सध्या प्रचलित विषयावर कोणते साहित्य कोणत्या नियतकालिकात प्रकाशित झाले आहे याची माहिती मिळविण्यास ते उपयुक्त आहे. वाचकांच्या गरजेनुसार निवडक लेख फुलटेक्स्ट् स्वरूपात दिले जातात.

Website : www.alibnet.org

❑❑❑

# ग्रंथपरिचय

प्रा. मोहन पाठक / प्रा. अविनाश कोल्हे / डॉ. प्रदीप कर्णिक

❑ **ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती**
**लेखक** : डॉ. प्रदीप कर्णिक
**प्रकाशक** : मुंबई, नवचैतन्य प्रकाशन, २००५
पृष्ठे १६८, मूल्य रु.१२०/-

पिढ्यान्‌पिढ्या ग्रंथ, ग्रंथालये यांबाबतच्या कोणत्याही जाणिवा विकसित न होताच आपण जगतो. ग्रंथसंस्कार झालेल्या संवदेनाशील मनाला मग प्रश्न पडतो, '' आता हे सारे का होते? तर कोणाला त्याची निकडच वाटत नाही. निकड वाटली असती तर पालकांनी शाळेवर वा सरकारवर दबाब आणून ग्रंथालये निर्माण करायला लावली असती.'' पण असे होत नाही कारण एकूण समाजमन याबाबत उदासीन आहे, हेही या खंत करणाऱ्या लेखकाला माहीत असते. त्यातूनच 'ग्रंथालयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन' (पृ.१४२) हा लेख डॉ. प्रदीप कर्णिक यांच्या 'ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती' या पुस्तकात वाचायला मिळतो. डॉ. कर्णिकांच्या या पुस्तकातून एकूणच उपेक्षित असलेला ग्रंथ जीवनासंबंधीचा विचार सर्व लेखांतून उत्तम पद्धतीने व्यक्त झाला आहे. या लेखसंग्रहातील लेख पूर्वी नियतकालिकांतून (व आकाशवाणीवरील भाषण स्वरूपात) येऊन गेलेले असले तरी या लेखांतील चिंतन, आशय एकूणच ग्रंथजगताबद्दल अतंर्मुख होऊन विचार करायला लावेल असा आहे. या लेखसंग्रहात समाविष्ट असलेल्या एकोणीस लेखांची वर्गवारी कोश वाङ्मय, ग्रंथ - दुर्मीळ ग्रंथ, ग्रंथालय आणि ग्रंथसंस्कृती अशा चार विभागांत करण्यात आली आहे.

कोशवाङ्मय या विभागातील आठ लेख संदर्भासाठी वापरल्या जाणाऱ्या कोशांचा समग्र विचार करणारे आहेत. 'कोश हे शिक्षकांचे मित्र' या पहिल्या आकाशवाणीवरील भाषणाची स्वतंत्र पुस्तिका यापूर्वी आलेली होती व तिला मागणीही खूप होती. परंतु पुस्तिका संपल्यानंतर या भाषणांचे पुनर्मुद्रण होणे हे कोश आणि संदर्भ या विषयावर मराठीत असलेल्या साहित्याचा अभाव लक्षात घेता गरजेचे होते. त्या दृष्टीने हे भाषण संग्रहात घेतले गेले हे अतिशय महत्त्वाचे ठरले आहे.

अध्यापन सार्थ आीण प्रभावी करावयाचे असेल तर शिक्षकांनी विविध प्रकारचे कोश साहित्य वापरणे, ते वापरून टिपणे तयार करणे अपेक्षित आहे. या दृष्टीने कोश कोणत्या प्रकारचे असतात, त्यांचा वापर किती कल्पकतेने करता येतो याबाबत डॉ. कर्णिक यांनी अनेक उदाहरणांसह मार्गदर्शन केले आहे. कर्णिकांची ही उदाहरणे अभ्यासून आपल्या विषयानुरोधाने शिक्षकांनी अन्य उदाहरणे तयार केली तर त्यांच्यात व पर्यायाने विद्यार्थ्यांतही शोधवृत्ती वाढीस लागू शकेल व अध्यापन आणि अध्ययन या प्रक्रिया सृजनाचा आनंद देणाऱ्या ठरतील.



कवियर्य मंगेश पाडगावकरांच्या एका कवितेचे शीर्षक या भागातील स्थलवर्णन कोशांवरील लेखासाठी वापरले आहे. 'जेथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते' हा तो लेख होय. स्थलवर्णन (किंवा दर्शनिका) कोशांचा विषय येताच ना. गो. चाफेकरांच्या बदलापूरवरील मराठीतील पहिल्या स्थलवर्णन कोशाची (गॅझेटियर या शब्दाच्या मराठीतील पर्याय) आठवण या लेखात आहेच; पण कोल्हापूर गॅझेटियरबाबत लेखकाने व्यक्त केलेले चिंतनही महत्त्वाचे आहे. गॅझेटियर शब्दाची व्युत्पती व अर्थापासून इतिहासापर्यंतचा धावता आढावा या छोटेखानी लेखात आहे. या पहिल्या भागातील सर्वच लेख ग्रंथपालपदी कार्यरत असणाऱ्या सर्वांनी व कार्यकर्त्यांनी वाचायला हवेत. ग्रंथालयशास्त्राच्या पुस्तकी माहितीला व्यवहारात किती परिमाणे असू शकतात याचे भान येण्यास हे लेख उत्तम आहेत.

सिअर्स लिस्टबाबतचा लेख ग्रंथालयशास्त्राच्या दृष्टीने व म्हणूनच ग्रंथपालांना विशेष महत्त्वाचा ठरावा असा आहे. स्वत: डॉ. कर्णिकांनी याबाबत विशेषत्वाने केलेले चिंतन, विषयशीर्षके, वर्गांकाबाबत केलेले प्रयोग हे ग्रंथालयशास्त्रात महत्त्वाचे योगदान ठरणारे आहे. त्या दृष्टीने पृ.१०१ वर केलेल्या शिफारशी भाषा विचारासाठी उपकारक ठरतील अशा आहेत. हा संशोधन आराखडा लेखाच्या स्वरूपात लेखसंग्रहात आला हे ठीकच आहे; पण विस्तारित स्वरूपात यावर ग्रंथ कर्णिकांसारख्या प्रयोगशील व जाणकार ग्रंथपालाने लिहिणे आवश्यक आहे.

ग्रंथ - दुर्मीळ ग्रंथ या भागात तीन लेख आहेत. हे लेख माहितीप्रद आहेत. 'प्रवास पुस्तकाचा' (पृ. १०३ ते ११३) या लेखात मौखिक परंपरेपासून ग्रंथनिर्मिती व ग्रंथविश्वाकडून कागदविरहित ग्रंथापर्यंतचा प्रवास कसा झाला, या प्रवासातील क्रांतिकारक ठरलेले टप्पे कोणते याविषयी उपयुक्त माहिती आहे.

दुर्मीळ ग्रंथ या लेखात दुर्मिळता म्हणजे काय याचा केलेला विचार, अ. का. प्रियोळकर यांचा उल्लेख महत्त्वपूर्ण आहेच. ग्रंथालयातून कालबाह्य झालेले साहित्य बंद करण्यासंबंधी काही धोरण असावे लागते. त्या दृष्टीने असलेला पुढील लेख ग्रंथालयात काम करणाऱ्यांना विशेष उपयुक्त आहे. या धोरणाबाबत अनेक ग्रंथपाल व ग्रंथालयांमध्ये गोंधळाचे वातावरण असते.

ग्रंथालय या पुढील भागातील चारही लेख वाचनीय आहेत; पण त्यातही 'प्रसार माध्यमे व ग्रंथालये' आणि 'मराठीचे माहिती केंद्र' हे दोन लेख अनेकांना नवीन माहिती देणारे ठरतील.

यानंतरचा भाग ग्रंथसंस्कृती हा आहे. या भागामध्ये तीन लेख आणि एक कविता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथप्रेम जगद्‌विख्यात होते. बाबासाहेबांनी आयुष्यभर जपलेल्या ग्रंथसंस्कारांबद्दल एक लेख या भागात आहे. या लेखात पृ.१५८ वर कर्णिकांनी डॉ. बाबासोहबांचे प्राध्यापकांबाबत एक मत उद्‌धृत केले आहे. ते मत आज ५०-६० वर्षांनंतरही प्राध्यापकांना लागू पडेल असे आहे. या लेखात अगदी थोडक्यात डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथसंपदेविषयी डॉ. कर्णिक यांनी माहिती दिली आहे.

या भागात 'स्वत:च्या घराइतकंच स्वत:चं पुस्तकही असायला नको का?' हा एक लेख आहे. आजच्या वाचनसंस्कृतीसमोर उभे केलेले मोठे प्रश्नचिन्ह या लेखातून तळमळीने मांडले आहे. राज्यामध्ये सुमारे बत्तीसशे पूर्णवेळ आणि अठराशे अर्धवेळ ग्रंथालय कर्मचारी आहेत. ते अक्षरश: वेठबिगारासारखे काम करतात; पण त्याचे कुणालाच काही वाटत नाही. (पृ.१५५) हे निरीक्षण आत्यंतिक तळमळीने आले आहे.

या भागात व पुस्तकात सर्वांत शेवटी आलेली कविता माध्यमिक शाळा शिक्षक-पालकांसाठी विशेषत्वाने महत्त्वाची आहे. माध्यमिक शाळेच्या वयात पूर्व पौगंड (कुमार) व पौगंडावस्थेतील मुलांनी कोणते साहित्य वाचायला हवे त्या साहित्याची ही कवितारूपात येणारी यादी आहे. 'खरंच सांगतो, ती वाचनोत्सुक गोड मुलं आहेत' हे कवितेचे शीर्षकही आकृष्ट करेल असे आहे. अब्राहम लिंकनने हेडमास्तरांना लिहिलेले पत्र जसे पोस्टररूपाने असंख्य शाळांतून पोहोचले आहे, त्याच धर्तीवर या कवितेचे पोस्टर सर्व ग्रंथालयांतून पोहोचणे गरजेचे वाटते. आपले मूल खरोखरच विकसित व्हावयाचे असेल तर पालकांनी या प्रिस्क्रिप्शनमध्ये सुचविलेली पुस्तके मुलांकडून वाचून घ्यायला हवीत. त्याविषयी मुलांशी बोलावयास हवे.

## या पुस्तकाचा वाचक

या पुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावर हे पुस्तक ग्रंथालय प्रमाणपत्र परीक्षेचे व ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या पदवी परीक्षांचे विद्यार्थी आणि ग्रंथ संस्कृतीचे चाहते यांना उपयोगी असल्याचे म्हटले आहे. याबाबतच नाही, परंतु पूर्ण पुस्तक वाचल्यावर ग्रंथसंस्कृतीचे चाहते नसणारे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक आणि ग्रंथापालसुद्धा या पुस्तकाचे वाचक ठरतील तर त्यांच्या व्यावसायिकतेत अधिक प्रगती होईल. शिवाय कोणत्याही वयोगटातील पाल्यांचे पालक, ग्रंथविधातील सर्व लहानमोठे घटक यांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरू शकेल. महाराष्ट्र शासनाने तर ग्रंथालय प्रमाणपत्र परीक्षेत हे पुस्तक अनिवार्य करावयास हवे.

या लेखांची भाषा माहिती सादर करणारी असली तरी ओघ टिकवून ठेवणारी आहे. या विषयांची लेखकाच्या मनातील तळमळ हे त्यामागील कारण आहे.

मात्र यातील लेख यापूर्वी कोणत्या नियतकालिकात व मुख्य म्हणजे कधी आले होते याचा तपशील त्या त्या लेखाखालीच यावयास हवा होता. सदर लेखांसाठी डॉ. कर्णिक यांनी अनेक ग्रंथ वाचले आहेत. संदर्भ शोधले आहेत. या ग्रंथांची अकारविल्हे सूची फक्त एका लेखाचा अपवाद वगळता (सियर्स लिस्टचा मराठी अवतार : प्रकल्प आराखडा पृ.७४) कोणत्याही लेखाखाली दिली नाही. ती देणे आवश्यक होते. नवचैतन्य प्रकाशन ही संस्था व तिचे प्रकाशन क्षेत्रातील योगदान महत्त्वाचे आहे. या ग्रंथाची पुढील आवृत्ती काढताना त्यांनी डॉ. कर्णिकांशी बोलून या त्रुटींचे निराकरण करावयास हवे, ही अपेक्षा !

---

❑ **पीपल्स लायब्ररी मुव्हमेंट**
**लेखक** : डॉ. आर. रमण नायर
**प्रकाशक** : दिल्ली : कॉन्सेप्ट पब्लिकेशन कंपनी, २०००
पृष्ठे १५१, मूल्य रु. २००/-

समाजाच्या सांस्कृतिक-बौद्धिक विश्वात सार्वजनिक ग्रंथालय हे महत्त्वाचे अंग असते. आजच्या माहितीच्या युगात तर सार्वजनिक ग्रंथालयांना फार महत्त्व आहे. अगदी प्राचीन काळीसुद्धा



ग्रंथालयाचे महत्त्व खूप होते. भारताच्या इतिहासात चिनी प्रवासी येऊन गेल्याचे उल्लेख आढळतात. त्यांनी तत्कालीन भारतातील ग्रंथालयांची वर्णने केलेली आहेत. त्यावरून त्या काळीसुद्धा आपल्या देशातील ग्रंथालये समृद्ध होती, याचा अंदाज येतो.

पुस्तके खरेदी करणे, ती जतन करणे, त्यांची देखभाल करणे हे एकट्यादुकट्या व्यक्तीचे काम नाही. म्हणूनच सार्वजनिक ग्रंथालये महत्त्वाची ठरतात. याद्वारे गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता ज्ञान-माहितीची देवाणघेवाण करता येते. यासाठी देशातील सार्वजनिक ग्रंथालये चांगल्या अवस्थेत असावी लगतात. यासाठी डॉ. रमन नायर यांचे पीपल्स लायब्ररी मुव्हमेंट हे पुस्तक अभ्यासणे गरजेचे ठरते. डॉ. नायर यांचे हे पुस्तक दिल्लीच्या कॉन्सेप्ट पब्लिशिंग कंपनीने २००० साली प्रकाशित केले आहे. 'सार्वजनिक ग्रंथालय' या विषयावर पुस्तक लिहिण्याचा डॉ. नायर यांचा अधिकार वादातीत आहे. ग्रंथालय ह्या विषयावर डॉ. नायर यांनी आजपर्यंत १४ पुस्तके लिहिली आहेत. 'पब्लिक लायब्ररी डेव्हलपमेंट', 'इंटरनेट फॉर लायब्ररी' वगैरे त्यांची पुस्तके अभ्यासकांनी वाखाणलेली आहेत. डॉ. नायर सध्या केरळ कृषि विद्यापीठाचे ग्रंथपाल आहेत. या पुस्तकाला लेखकाची छोटीशी प्रस्तावना आहे. त्यात ते म्हणतात की, माहितीशिवाय निर्णय घेता येत नाही. योग्य वेळी योग्य माहिती उपलब्ध करून दिल्यास राष्ट्रीय विकास साधता येतो (पृ. ५). त्यांचे असेही मत आहे, की सुजाण, जागरूक नागरिक म्हणजे लोकशाही बळकट करण्याची एक महत्त्वाची पूर्व अट होय. या संदर्भातसुद्धा सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिका महत्त्वाची ठरते. डॉ. नायर असेही दाखवून देतात, की आज आपल्या देशात सार्वजनिक ग्रंथालयाच्या संदर्भात एखादे राष्ट्रीय धोरण नाही की यासाठी एखादा कायदा नाही.

या पुस्तकासाठी डॉ. नायर यांनी दक्षिण भारतातील केरळ राज्याचा अभ्यास केला आहे. केरळ राज्याला सार्वजनिक ग्रंथालयांची भव्य परंपरा आहे. शिवाय या राज्याने सार्वजनिक ग्रंथालयांच्या संदर्भात कायदाही केलेला आहे. म्हणूनच केरळ राज्याचा अभ्यास करणे निकडीचे ठरते. या राज्यात साक्षरतेचे प्रमाण खूप आहे. शिवाय राज्य सरकार सार्वजनिक ग्रंथालयांसाठी चांगला निधी उपलब्ध करून देते, याचाही लेखकाने उल्लेख केला आहे.

तिसऱ्या प्रकरणात डॉ.नायर यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या उत्क्रांतीचा इतिहास तपासला आहे. ख्रिस्तपूर्व तीन हजार वर्षांपूर्वी तिसऱ्या सुमेरियन संस्कृतीत, त्याचप्रमाणे सिंधू संस्कृतीत (पृ.२५) त्या काळीसुद्धा सार्वजनिक ग्रंथालयांची जबाबदारी राजावर असे, ख्रिस्तपूर्व शतकात अलेक्झांड्रिया येथील ग्रंथालयात सात लाख ग्रंथ होते. कॅलिमॅचूस या ग्रंथालयाच्या प्रमुखाने या पुस्तकांची लेख, शीर्षक, विषय यांच्या अनुषगांने वर्गवारी केली होती. भारतात त्या काळी नालंदा, तक्षशिला, पाटलीपुत्र वगैरे ठिकाणच्या सार्वजनिक ग्रंथालयाची कीर्ती होती.

आधुनिक काळात सार्वजनिक ग्रंथालयाचा उल्लेख एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला आढळतो. डॉ. नायर यांच्या मते, केरळ राज्याचा विचार केला तर वाढत्या निरक्षरतेचा सामना करण्यासाठी शासनाने यात लक्ष घालावला सुरुवात केली. याचे श्रेय राणीसाहेब गौरी पार्वतीबाई यांना द्यावे लागते. त्यांनी कर्नल मन्रो यांच्या मदतीने इ.स. १८१७ मध्ये सक्तीचे व मोफत शिक्षण सुरू केले (पृ.३५). त्यानंतर महाराज तिरूनल (१८२९-४७) यांनी या कार्यक्रमात

मोलाची भर घातली. त्यांच्याच कारकिर्दीत केरळातील आधुनिक शिक्षणाचा पाया रचला गेला. त्यांच्या पुढाकाराने १८३६ मध्ये त्रावणकोरमध्ये पाहिली इंग्रजी शाळा सुरू झाली. त्यांच्याच काळात केरळ राज्यात पाहिले सार्वजनिक ग्रंथालय १८२९ साली त्रिवेंद्रम येथे सुरू झाले. त्यानंतर एर्नाकुलम येथे १८६९ साली, त्रिचूर येथे १८७३ साली तर कोट्टायम येथे १८८१ साली सार्वजनिक ग्रंथालये सुरू झाली. ग्रंथालयांच्या संदर्भातील आपल्या जबाबदारीचे सरकारला भान होते. त्रावणकोरच्या महाराजांनी सार्वजनिक ग्रंथालयांना शासनाने देण्याच्या आर्थिक मदतीची नियमावली तयार केली आणि १९१८ साली प्रकाशित केली. यात सरकारची मदत घेणारी ग्रंथालये समाजातील सर्व घटकांसाठी उपलब्ध असायला हवी वगैरे नियम होते.

पुढच्या प्रकरणात लेखकाने केरळ राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या संदर्भातील लोक चळवळीची चर्चा केली आहे. शासनाने पुरस्कृत केलेली सार्वजनिक ग्रंथालय चळवळ आणि लोकांनी चालवलेली सार्वजनिक ग्रंथालय चळवळ एकमेकांना समांतर जात होत्या, असे लेखकाचे निरीक्षण आहे (पृ. ४३). एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी शिक्षित भारतीयांनी सामाजिक/राजकीय सुधारणा घडवून आणल्या. लेखक दाखवून देतो त्याप्रमाणे केरळ राज्यातील संस्थानिक पुरोगामी दृष्टिकोनांचे होते.

त्रावणकोरच्या महाराजांनी १८८८ साली आपल्या राज्यात भारतातील पहिले विधिमंडळ स्थापन केले (पृ. ४४). त्या काळी भारताचा स्वातंत्र्य लढा आकार घेत होता. लोकांना नवनव्या घटनांची माहिती हवी होती. यातूनच गावोगाव सार्वजनिक ग्रंथालये निघाली. केरळातील सार्वजनिक ग्रंथालयांची वाढ आणि राष्ट्रीय लढा यांच्यात थेट संबंध दाखवता येतो. या प्रकरणाच्या शेवटी लेखकाने काढलेला निष्कर्ष महत्त्वाचा आहे. डॉ. नायर म्हणतात, मध्ययुगीन काळात केरळ राज्यात गावागावात मंदिरांचे जे स्थान होते, तेच आधुनिक काळात सार्वजनिक ग्रंथालयांचे आहे (पृ.४७). जवळपास असेच विचार प्रा. न. र. फाटक यांनी लोकहितवादी यांच्या कार्याच्या संदर्भात काढले होते. सोळाव्या शतकातील महाराष्ट्रात संत रामदासांनी जशा गावोगाव तालमी काढल्या, त्याचप्रमाणे एकोणिसाव्या शतकात लोकहितवादींनी गावोगाव सार्वजनिक वाचनालये काढली.

लोकांनी चालवलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या चळवळीचा जोर ओसरू लागला, काही ग्रंथालये बंद पडू लागली. या समस्यांचा विचार करण्यासाठी १९२५ साली सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यकर्त्यांनी एक राज्यव्यापी मेळावा घेतला (पृ. ४९). पुढे १९३१ साली समस्त 'केरळ पुस्तकालय समिती' स्थापन झाली. पण हे प्रयत्न त्रावणकोर, मलबार वगैरे भागात मर्यादित होते. डिसेंबर १९४३ मध्ये केरळच्या सर्व भागाची एक बैठक झाली आणि यात ' केरळ ग्रंथालय संघ' स्थापन झाला. डॉ. नायर दाखवून देतात त्याप्रमाणे या संघाने केलेले महत्त्वाचे काम म्हणजे १९४५ साली डॉ. एस. आर. रंगनाथन (१८९२-१९७२) यांना पाचारण केले. डॉ. नायर यांनी येथे थोडक्यात डॉ. रंगनाथन याचा परिचय करून द्यायला हवा होता. डॉ. रंगनाथन म्हणजे भारतातील ग्रंथालय शास्त्राचे पितामह होय. डॉ. रंगनाथन यांनी केरळ भागातील ग्रंथालयांचा दौरा केला, भाषणे दिली आणि काही उपयुक्त सूचना केल्या. संघाची सुरुवात ४७



ग्रंथालय सभासदांपासून झाली. लवकरच सुमारे दोन हजार ग्रंथालये संघाची सभासद झाली.

एका प्रकरणात डॉ. नायर यांनी केरळ राज्यात सार्वजनिक ग्रंथालयाच्या क्षेत्रात लोक चळवळ का यशस्वी ठरली, याचा ऊहापोह केला आहे. एक म्हणजे वाढत्या साक्षरतेमुळे ग्रंथ वाचण्याची भूक वाढली. दुसरे म्हणजे राजकीय/सामाजिक क्षेत्रात खळबळ उडाली होती. ही समजून घेण्याची वाचकांना गरज वाटत होती. इत्यादी घटकांमुळे या चळवळी यशस्वी झाल्या. (पृ.५८) यानंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३० साली बनारस येथे भरलेल्या पहिल्या ऑल एशिया एज्युकेशनल कॉन्फरन्सच्या अधिवेशनात सादर करण्यात आलेले आदर्श विधेयक! त्यामागे डॉ. एस. आर. रंगनाथन यांची प्रेरणा, बुद्धी, कष्ट होते. या विधेयकानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी 'ग्रंथालय कर' आकारावा आणि शासनाने अनुदान द्यावे. डॉ. नायर यांच्या मते जगात कोठेही इतके आदर्श विधेयक त्या काळी नव्हते (पृ.६९) डॉ. रंगनाथन यांच्या विधेयकापासून प्रेरणा घेऊन 'मद्रास पब्लिक लायब्ररी कायदा' केला. त्यानंतर हैद्राबाद प्रांत (१९५५), आंध्र प्रदेश(१९६०), कर्नाटक (१९६५), महाराष्ट्र (१९६७), इत्यादी राज्यांनी असाच कायदा केला. केंद्र सरकारने १९७६ साली नॅशनल लायब्ररी ऑफ इंडिया कायदा केला.

जरी केरळ राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची चळवळ जोरात होती तरी केरळ राज्याने या संदर्भातील कायदा १९८९ साली केला. लेखकाने यामागचे राजकारण व कायदा करण्यात वेळोवेळी अपयश का आले यासाठी एक प्रकरण खर्ची घातले आहे. यातील पहिला प्रयत्न त्रावणकोरच्या दिवाणांनी १९४७ साली केला. मात्र या काद्यामुळे केरळ ग्रंथालय संघाचे महत्त्व कमी झाले असते. पुढे वेळोवेळी अशा प्रकारचे कायदे करण्याच्या झालेल्या प्रयत्नाना ग्रंथालय संघाने विरोध केला (पृ. ८९) सरतेशेवटी १९८९ मध्ये कायदा अस्तित्वात आला.

डॉ. नायर यांनी पुढच्या एका प्रकरणात ग्रंथालय कायद्याचे मूल्यमापन केले आहे. लेखकाच्या मते, भारतासारख्या गरीब देशाला राष्ट्रीय ग्रंथालय धोरण असणे गरजेचे आहे. (पृ.११६) डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मॉडेल कायद्यानुसार अनेक राज्यांनी कायदे केले. या कायद्यात 'राज्य ग्रंथालय अधिकारी'हे महत्त्वाचे पद असते. लेखकाच्या मते, फक्त कर्नाटक राज्यात या पदी राज्याचे शिक्षणमंत्री असतात. या कायद्यानुसार राज्याच्या पातळीवर 'ग्रंथालय संचालक' असावे. त्यांच्या माध्यमातून राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांवर देखरेख करावी. मुख्य म्हणजे ग्रंथालय हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे राज्य सरकारने पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. या मुद्यावरून लेखकाचे प्रतिपादन संपते.

'सार्वजनिक ग्रंथालय' यासारख्या अतिमहत्त्वाच्या पण तितक्याच दुर्लक्षित विषयावर ग्रंथ लिहिल्याबद्दल डॉ. नायर अभिनंदनास पात्र आहेत. त्यांचा या विषयातील अधिकार मोठा आहे. तथापि, प्रस्तुत पुस्तक वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करत नाही. नायर यांच्या पुस्तकात माहिती, तपशील भरपूर आहे; पण ही सर्व माहिती व्यवस्थित तर्कशुद्ध पद्धतीने न मांडल्यामुळे पुस्तकात एक प्रकाराचा विस्कळीतपणा आला आहे. या पुस्तकात इंग्रजीच्या अक्षम्य चुका आहेत. या टाळण्यासाठी या पुस्तकावर एखाद्या ज्येष्ठ संपादकाचा हात फिरला असता तर बरे झाले असते, असे राहून राहून वाटते.

❑ **श्री ज्ञानेश्वरी : ओवीसूची (कुंटे प्रत)**
**संपादन** : सुप्रिया देशपांडे
**प्रकाशक** : श्री वामनराज प्रकाशन, पुणे
पृष्ठे ३१६, मूल्य रु. १५०/-

महाराष्ट्राचे थोर संत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वाङ्‌मयाला आणि अलौकिक कार्याला ७०० वर्षांहून अधिक काळ लोटला तरीही त्यावर विविध प्रकारचे संशोधन होत आहे. नवनवे ग्रंथ निर्माण होत आहेत. असे भाग्य मराठी वाङ्‌मयात तरी केवळ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्याच वाट्याला आले आहे.

ज्ञानदेवांच्या साहित्याचा अगदी वरवर जरी आढावा घेतला तरी हे कोणाच्याही लक्षात येईल की, इतक्या विविध पद्धतीने ग्रंथ/लेख निर्माण झाले आहेत की त्यांची मोजदादही एखाद्याला घेणे अशक्य होऊन बसावे. सर्वसाधारणपणे ठळक प्रकार दिसतात ते असे की, मूळ संहिता आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या टिपा, अर्थ इत्यादी मजकूर देणारे साहित्य, अनुवाद-भावार्थ देणारे साहित्य, पाठभेद चिकित्सा करणारे साहित्य, संशोधनपर साहित्य, चरित्रात्मक साहित्य इत्यादी अनेक प्रकार आहेत. या सर्व प्रकारांत एक साहित्यप्रकार आहे तो साधनग्रंथांचा. साधनसाहित्य प्रामुख्याने अभ्यासकांना मदतनीस ठरावे, साहाय्यभूत ठरावे, मार्गदर्शक व्हावे यासाठी तयार केले गेले आहे. अशा साधनसाहित्यामुळे अभ्यासकांचा वेळ, श्रम व कष्ट वाचतात आणि म्हणून अशा साधनसाहित्याला कमालीचे महत्त्व प्राप्त होते.

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाची दिशा-दिग्दर्शन करणारे विपुल साहित्य आहे. (उदा.वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। या जनाबाईंच्या अभंगाचे विवेचन, इत्यादी) परंतु साधनसाहित्य त्याहून भिन्न आहे. त्यात ज्ञानेश्वरमहाराजांच्या साहित्याची सूची देणारे साहित्य आहे, तसेच ज्ञानेश्वरीत येणाऱ्या शब्दांचा अर्थ सांगणारे शब्दकोशही आहेत. तसेच पदकोशही समाविष्ट आहेत आणि हे प्रकार प्रसिद्धही आहेत; परंतु 'ओवीसूची' हा प्रकार साधनसाहित्य असूनही कमालीचा दुर्लक्षित प्रकार म्हणून अस्तित्वात आहे. याची काही कारणेही संभवतात.

आजपर्यंत ज्ञानेश्वरीत आलेल्या ओवीच्या प्रथम चरणांची सूची ज्ञानेश्वरीच्या मूळ संहितेत, ग्रंथात सर्वांत शेवटी देण्याची प्रथा पडली असल्याने त्याकडे म्हणावे तसे लक्ष गेलेले नाही. दुसरे असे की चरणसूचीचा उपयोग केवळ एखादा अभंग शोधायचा असला तरच करायचा असतो असे ठाम मत झालेले आहे. तिसरे कारण असे की ज्ञानेश्वरीचा पदकोश हाताशी असताना चरणसूची कशाला वापरायची असा ग्रह अभ्यासकांनी करून घेतला असण्याची शक्यता आहे. चौथे कारण असे की ज्ञानेश्वरीच्या विविध प्रती छापील आणि हस्तलिखित स्वरूपात असल्याने ओवींचे क्रमांक वेगवेगळे आहेत. त्यामुळे एका ग्रंथाला असणारी चरणसूची दुसऱ्या ग्रंथाच्या वापराच्यावेळी उपयोगी ठरत नाही. अशा काही कारणांनी चरणसूचीकडे दुर्लक्ष झाले असले तरी चरणसूची देण्याचा प्रघात अनेक संपादकांनी कष्टपूर्वक पाळलेला दिसतो, तो का व कशासाठी यावर मात्र सखोल विचार झालेला नाही.

ज्ञानेश्वरी किंवा इतर संतसाहित्याला चरणसूची देण्याची आवश्यकता भासली याचा विचार



केला तर एकच उत्तर येते की अभ्यासकांची सोय करण्याची तळमळ संपादकांना वाटत होती. शिवाजीराव भावे यांच्या 'श्री ज्ञानेश्वरी शब्दार्थ कोशा'ची प्रस्तावना व प्रा.अ.का. प्रियोळकरांनी प्रा.रा.ना. वेलिंगकर यांच्या 'ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार' या कोशाला जोडलेला पुरस्कार वाचला तर एक बाब लक्षात येते की, मुद्रण कलेच्या वापरानंतर चरणसूची देण्याचा प्रघात पडला असावा. हस्तलिखितात शब्दार्थकोश जोडण्याची पद्धत मात्र अस्तित्वात होती.

ज्ञानेश्वरीच्या संदर्भात शोध घेण्याचा प्रयत्न केला तर असे दिसते की, १९२७ साली व्यंकटस्वामी यांनी जी 'सार्थ ज्ञानेश्वरी' संपादित केली होती, त्या प्रतीला ओव्यांची सूची त्यांनी जोडली होती. पुढे अनेक संपादकांनी ही प्रथा ज्ञानेश्वरीबाबत उचलली आणि वापरली. अर्थात याचे नेमके श्रेय कोणाला याचा शोध सर्व संत साहित्य तपासूनच द्यावे लागेल. ज्ञानेश्वरीच्या चरणसूचीच्या संदर्भात आणखीही काही प्रकार झालेले दिसनू येतात. उदा. विषयाप्रमाणे चरणसूची. कृष्णानंद स्वामी यांनी १९४३ साली मुमुक्षूंच्या मार्गदर्शनासाठी अध्यायवार सूची तयार केली. दत्तात्रय गणतराव खापरे यांनी विषयावार सूची तयार केली आणि ती न. चिं. केळकरकृत 'ज्ञानेश्वरी सर्वस्व' या ग्रंथात जोडली. शिवाजीराव भावे यांनी १९५३ साली 'ज्ञानेश्वरी दर्शन' या ग्रंथात गीतेच्या पदांचे ज्ञानेश्वरीतील ओव्यांमधील दर्शन सांगणारी सूची जोडली आहे.

आजपर्यंत ओव्यांची चरणसूची ज्ञानेश्वरीच्या मूळ संहितेबरोबर जोडायची परंपरा होती. अपवाद फक्त कृष्णानंदस्वामींच्या सूचीचा. मात्र ही सूची विषयवार आहे. सौ. सुप्रिया देशपांडे यांनी संपादित केलेल्या 'ज्ञानेश्वरी : ओवीसूची' या ग्रंथाने नवीन पायंडा पाडला आहे. 'ओवी सूची'चे स्वतंत्र पुस्तक तयार करण्याचे श्रेय या ग्रंथाला प्राप्त झाले आहे आणि त्यामुळे सौ. देशपांडे यांना ही नवीन पद्धत रूढ केल्याबद्दलही श्रेय द्यायला हवे.

शिवाजीराव भावे यांनी ज्ञानेश्वरीचा पदकोश तयार केला आहे व तो प्रसिद्धही आहे. आता असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की पदकोशासारखे साधन असताना केवळ प्रथम चरणसूचीचा उपयोग काय? ज्ञानेश्वरीतील कोणताही शब्द घेऊन पदकोशाच्या आधारे त्या ओवीपर्यंत जाता येते, मग पहिल्या चरणसूचीचा उपयोग कोण करेल? याचे उत्तर ज्यांना पदकोशाची पूर्ण कल्पना आहे त्यांच्या सहज लक्षात येईल. एखादा शब्द ओवीत अनेकदा वापरला गेला असेल तर त्या अभ्यासकाला त्या सर्वच ओव्या मूळ ग्रंथात जाऊन पाहाव्या लागतात. पदसंदर्भकोश असेल तर त्या शब्दाचा चरणही तिथेच प्राप्त होतो; परंतु तो चरण दुसरा, तिसरा अथवा चौथा असेल तर त्याचा पहिला चरण शोधावाच लागतो. खरे तर पहिल्या चरणसूचीची आणि पदकोशाची तुलनाच अयोग्य ठरते.दोन्ही साधनांचे हेतू पूर्णत: भिन्न आहेत. पदकोश हा त्या साहित्यातील कोणत्याही शब्दाद्वारे मूळ ओवीचा मार्ग दाखवतात, तर पहिली चरणसूची पहिला चरण आठवणाऱ्या अभ्यासकाला मूळ साहित्यातील ओवीची दिशा दाखवतात.

सर्वांत महत्त्वाचा फरक पडतो तो संहितेचा. शिवाजीराव भावे यांनी पदकोश आणि शब्दार्थकोश या दोन्ही कोशांसाठी राजवाडे प्रत प्रमाण मानली. त्यांच्या शब्दार्थकोशातही ओवीचे स्थान दर्शविलेले असले तरी त्यात सर्व शब्द समाविष्ट झालेले नाहीत. रा. ना. वेलिंगकर यांच्या 'शब्दभांडारा'तही ओवीचे स्थान दाखवले असले तरीही त्यातही सोपे शब्द सोडलेले आहेत. शिवाय त्यांनीही राजवाडे प्रत प्रमाण मानली आहे. डॉ. मु. ग. पानसे यांनी Linguis-

tic Pecularities of Jnanesvari या ग्रंथात शब्दसूची (Index Verbrum of Jnanesvari) दिली आहे; परंतु त्यांनी त्यासाठी कोणती प्रत वापरली त्याचा उल्लेख केलेला नाही. ज्ञानेश्वरीच्या बाबतीत संपादक कोणती प्रत आधारभूत ठरवतात यावर त्या ग्रंथाचा शब्दकोश व शब्दसूचीचा वापर ठरत असतो. मग तो पदकोश असो वा प्रथमचरण सूची असो.

सौ.देशपांडे यांनी प्रस्तुत 'ओवीसूची'साठी कुंटे प्रत प्रमाण मानली आहे. जे अभ्यासक कुंटे प्रतीला प्रमाणभूत मानतात त्यांच्यासाठी सदर सूची अत्यावश्यक ठरते. कुंटे प्रतीला अभ्याकांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे, ते तिच्या रचनेमुळे.

कै. कुंटे यांची आजच्या पिढीला फारशी माहिती नसणार. अण्णा मोरेश्वर कुंटे हे 'राजाशिवछत्रपती' काव्य लिहिणाऱ्या महादेव मोरेश्वर कुंटे यांचे वडील बंधू. १८४७ साली त्यांनी एम. डी. पदवी प्राप्त केली. वैद्यकशास्त्रातही त्यांची पुस्तके प्रख्यात आहेत (उदा. वाग्भट किंवा स्त्रीरोग विज्ञान इत्यादी). पुढे त्यांना संतसाहित्यात गोडी वाटू लागली आणि ते ज्ञानदेवांच्या वाङ्मयाकडे वळले. अमृतानुभवाचे विवरण त्यांनी केले. नंतर ही ज्ञानेश्वरी संपादित केली. ही प्रत बरवा प्रत म्हणून प्रसिद्ध आहे. आता बरवा प्रत म्हणजे काय? रामदासांच्या नंतर गोविंद बर्वे नावाचे साधू होऊन गेले. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांसाठी पदपद्धतीची ज्ञानेश्वरी तयार केली. पदपद्धती म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या श्लोकांच पदे पाडून, त्या पदाला श्रीज्ञानेश्वरीच्या ओव्या कशा बसतात ते ओळीने त्यांनी दाखवले असा उल्लेख कुंटे प्रतीच्या प्राक्कथनात आहे. कै. अण्णासाहेब कुंटे यांनी पाठांतरे, तळटिपा, शब्दार्थ, संपक ओव्या इत्यादी तपशील देऊन सदर बर्वे प्रत संपादित केली. १९८४ पासून या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

श्रीरामनराज प्रकाशनाने कै. कुंटे संपादित प्रत प्रसिद्ध केली आहे. या प्रतीचे सुलभ गद्य रूपांतर केशवराज महाराज देशमुख (लोकहितवादींचे नातू) यांनी केले होते. तो ग्रंथही याच संस्थेने प्रकाशित केला. आता या कुंटे प्रतीची ओवी सूचीही प्रकाशित केली आहे. एका टप्प्याने पद्धतशीरपणे या संस्थेने सदर संच पूर्णत्वास नेला आहे. यापुढे कुंटे प्रतीचा पदकोशही त्यांनी तयार केल्यास सर्वच अभ्यासकांची सोय होईल. तसेच त्या पदकोशाबरोबर सर्व शब्दांचा अर्थही दिल्यास अधिकच सोय होऊ शकते.

सौ. देशपांडे यांच्या सूचीला परभणीचे प्राचार्य रामदास डांगे यांचा पुरस्कार आहे तर परिशिष्टात प्राचार्य डांगे यांनी शोधलेल्या काही नवीन ओव्याही दिल्या आहेत (या ओव्यांचा समावेश सूचीत मात्र नाही). ज्ञानेश्वरमहाराजांच्या अभ्यासकांना आणि त्यातही कुंटे प्रतीचा वापर करणाऱ्यांना सदर संदर्भग्रंथ फारच उपयुक्त आहे.

ओवीसूचीचा उपयोग केवळ ती ओवी माहीत असणाऱ्यांना वा ती पाठ असणाऱ्यांनाच करून घेता येतो असे नाही. कोणत्याही साधनग्रंथाचा वापर हा वापरकर्त्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतो. प्रथम चरणसूचीतून 'जन्म' या शब्दापासून सुरुवात करण्याच्या किती ओव्या माऊली लिहितात. 'जन्म' हा शब्द प्रथम योजताना त्यांना काय नेमके साधायचे आहे. 'तेव्हा', 'का', 'ऐसे', 'ते', 'जे', 'तरी' अशा अनेक शब्दांनी सुरुवात करून श्रीज्ञानेश्वरमहाराज काय साधू पाहतात. अशा भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्याला अशा सूचीचा उपयोग होतो. दुसरे असे की विविध प्रतींच्या पहिल्या चरणसूचींचा तौलनिक उपयोग करून नेमकी ओवी कुठल्या प्रतीत आहे (अथवा नाही) याचा शोध घेण्यासाठी चरणसूची आवश्यक ठरते. मात्र आपल्याकडे अजून विविध प्रतींमध्ये पडून राहिलेल्या चरणसूचींची सूची अजून कोणीही तयार केलेली नाही. किंवा सर्व प्रतींतील चरणांची एकत्र सूची नाही. इतर अभ्यासकांनी पुढे येऊन हे कार्य हाती घ्यायला हवे.

❑❑❑

## ग्रंथपारखी नजर – ६

पुण्यात ढमढेरे यांचं जुन्या पुस्तकांचं प्रसिद्ध दुकान होतं. त्याबद्दल डॉ. स. गं. मालशे आणि डॉ. य. दि. फडके यांच्याकडून वेळोवेळी माहिती कळली. ढमढेरे यांना संशोधकांबद्दल प्रचंड आस्था, तर संशोधकांना ढमढेरे यांचं खूप अप्रूप. त्या दिवशी ढमढेरे यांना पैशाची किती आवश्यकता आहे, यावर एखाद्या जुन्या ग्रंथाची किंमत ढमढेरे सांगत, असंही एका संशोधकानं सांगितलं होतं. डॉ. मालशे यांनी ते खोडून काढलं. संशोधकाची आर्थिक अवस्था, त्याची त्या ग्रंथाबद्दल निकड यावर ढमढेरे किंमत ठरवत, असं डॉ. मालशे यांचं म्हणणं. पुढे ढमढेरेही वारले. त्यांचा ग्रंथसंग्रह डॉ. रा. चिं. ढेरे यांच्यासारख्या ग्रंथप्रेमी आणि प्रतिभावान अभ्यासक-संशोधकाला मिळाला, हे मराठी सारस्वताचं भाग्यच म्हटलं पाहिजे. त्यांच्या ग्रंथप्रेमाचा आणि प्रतिभेचा वारसा त्यांची कन्या अरुणा हिच्याकडे आला, हेही महत्त्वाचं.

पुण्यातल्या इतरही काही जुन्या ग्रंथविक्रेत्यांची आठवण होते. 'प्राचविद्ये' (इण्डॉलॉजी, ओरिएन्टॉलॉजी) च्या प्रसारासाठी ग्रंथ प्रसिद्ध करणारे आणि संशोधकांना असे ग्रंथ मिळवून देणारे सरदेसाई, नागनाथ पाराजवळच्या 'आनंद' मासिकाच्या कार्यालयाच्या जवळच राहणारे आणि घरातूनच ग्रंथविक्री करणारे गोंधळेकर, इंटरनॅशनल बुक सर्व्हिसमध्ये आठवड्याचे सहा दिवस ग्रंथविक्री करून सातव्या दिवशी म्हणजे रविवारी त्याच बंद दुकानाच्या पायऱ्यांवर स्वतः मिळवलेले जुने ग्रंथ विकणारे पराडकर... या सर्वांकडून मला काही ना काही मिळालं आहे. सरदेसाई यांनी 'प्राच्यविद्याविभूषित' पाश्चात्त्य संशोधकांच्या छायाचित्रांचं एक सुरेख पुस्तक काढलं होतं. ते माझ्या संग्रही आहे. गोंधळेकरांकडे एक असंच दुर्मीळ पुस्तक मिळालं. याला पन्नास रुपये किंमत पडेल, असं त्यांनी म्हणताच, मी म्हणालो, शंभर रुपये दिले तर चालेल? ते हसले. मी शंभर रुपये दिले, तेव्हापासून त्यांच्याशी स्नेहच जुळला. पराडकरांनीसुद्धा रस्त्यावर न मांडलेले, परदेशी संशोधक अधिक किंमत देऊ शकतात, या समजुतीनं त्यांच्यासाठी 'राखून' ठेवलेले, काही महागडे दुर्मीळ ग्रंथ मला आनंदानं देऊ केले. 'तुम्हाला असा एखादा दुर्मीळ ग्रंथ देईन की जन्मभर तुम्हाला माझी आठवण राहील', अशी धमकी ते मला कित्येक वर्षांपासून देत आहेत. त्यांच्याकडून एखादा दुर्मीळ ग्रंथराज मिळेल, या प्रतीक्षेत मी अजूनही आहे. पराडकर जिंकतात की हरतात, हे काळच ठरवील.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी

पृ. ७८-७९.

# इंटरनेट वापराची दहा वर्षे व ग्रंथपालनाचे बदलते आयाम

प्रा. मोहन पाठक

इंटरनेटच्या वापराला भारतात दहा वर्षे होत आहेत. दहा वर्षांपूर्वी आश्चर्य ठरलेला हा 'इन्फर्मेशन सुपर हायवे' (माहितीचा महामार्ग) आज अनेक 'सर्विस रोड्स'शी जणू जोडला गेला आहे व या जाळ्याचा आकार कल्पनातीत वाढला आहे. ज्ञानगंगोत्रीचे हे सहावे वर्ष. विद्यापीठाने सहा वर्षांपूर्वी हे सदर चालू केले तेव्हा ग्रंथपालांना उपयुक्त ठरतील अशा वेबसाईट्सची माहिती देण्याचा उद्देश होता. आज वेबसाईट्सची माहिती अनेक माध्यमांतून व मोठ्या प्रमाणात मिळायला लागल्यावर या सदरात या इंटरनेट माध्यमाबाबत वेगळ्या विषयांवर लेख सादर करण्यात आले.

इंटरनेटचा वापर वाढला तसे ग्रंथपालनाचे आयामही बदलत गेले. ओपॅक व विशेषतः वेब बेस्ड ओपॅकमुळे अनेक ग्रंथालयांच्या संग्रहाबद्दल माहिती मिळणे सहज झाले असेल तर तालिकीकरणाच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वाचा टप्पा पार केला गेला असे म्हणावे लागेल. ग्रंथपालनाचे आयाम फक्त तालिकीकरण, ग्रंथसंग्रह, इत्यादी कामांपुरतेच बदलले असे नाही तर माहिती प्रतिप्राप्ती, वितरण, इत्यादी सेवाधिष्ठित कामांचे स्वरूपही बदलत गेले.

या दहा वर्षांत ग्रंथपालांना विशेष महत्त्वाचे वाटावेत असे बदल म्हणजे वेबसाईट्सच्या निवडीबाबत व एखाद्या वेबसाईटवरून माहिती डाऊनलोड करण्याबाबत हे आहेत. एखाद्या वाचकास (उपभोक्त्यास) नेमकी माहिती हवी असेल तर ती निवडून, तीच नेमकी साईट ओळखणे याबद्दल अपेक्षा वाढल्या. 'ई-ग्रंथपालां'चे तर सर्व काम या जगभरातून अपलोड होणाऱ्या माहितीवर आधारित असायला लागले. पूर्वीच्या पारंपरिक संदर्भसाधनांचे महत्त्व टिकून असले तरी त्याची ख्याती कमी होत चालली आहे. त्यामुळे माहितीसेवेत इंटरनेटचे महत्त्व विलक्षण वाढले.

याच दहा वर्षांत जे बदल घडत गेले त्यात आणखी एक महत्त्वाचा बदल संगणकाच्या वा इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या अधिकाराविषयी. बौद्धिक संपदा हक्क किंवा कॉपीराईटबद्दल जागरूक असण्याची गरज पूर्वी कधी नाही इतकी वाढली. शिवाय इंटरनेट संबंधातील अनेक इंग्रजी किंवा अधिक अचूक सांगायचे तर तालिक संकल्पना समजावून घेणे, याचीही गरज वाढली. अगदी सर्वच्या सर्व संकल्पना दूर, पण मूलभूत ज्ञान आवश्यक ठरत गेले. त्यामुळे ग्रंथपालांना याबाबत नव्याने अभ्यास करण्याच्या गरजा वाढल्या. नेटवर्किंग, लॅन-वॅन, मोडेम, लीज् लाईन, एचटीटीपी, इत्यादींबाबत किमान ज्ञान तर हवेच; पण याव्यतिरिक्त वेबपेज डिझायनिंग, सर्व्हर, क्लायंट सर्व्हर रिलेशनशिप, इत्यादींबाबतही मूलभूत माहिती गरजेची ठरत गेली.

इंटरनेटच्या या दशवार्षिक वापरात ग्रंथपालांना आणखी उपयुक्त ठरतील असे बदल घडत गेले. उदाहरणार्थ, सर्व वर्तमानपत्रांच्या आवृत्त्या उपलब्ध झाल्या, अनेक प्रकारचे कोश, अनेक ग्रंथवितरक यांच्याशी संपर्कात येण्याच्या शक्यता वाढल्या. इंटरनेटमुळे जग जवळ आले असे आपण म्हणतो तेव्हा ग्रंथपालनाच्या दृष्टीने काय झाले हे आपण जाणून घ्यायला हवे. ई-नियतकालिके, ई-पुस्तके, ई-पत्र (किंवा टपाल) यांबाबत माहिती जशी हवी तशीच इतर अनेक उपयुक्त गोष्टी माहीत हव्यात.

पारंपरिक ग्रंथपालन, अभिजात ग्रंथपालन यांबरोबरच ई-बेस्ड ग्रंथपालन (इलेक्ट्रॉनिक बेस्ड) या दहा वर्षांत जगभर अपेक्षित केले जाऊ लागले. त्यामुळे आज नव्याने ग्रंथपाल होऊ पाहणाऱ्यांनी तर या गतीशी मेळ घालून घ्यायला हवा आहेच. पण शिवाय 'सावध, ऐका पुढल्या हाका' या ओळीतील भविष्याचा वेधही घेत राहायला हवा आहे.

❑ ❑ ❑

## ग्रंथपारखी नजर - ७

एका अजब अन् विक्षिप्त ग्रंथसंग्राहकाच्या चरित्रानं मला निखळ आनंद दिला. त्या श्रीमंत ग्रंथसंग्राहकाचा स्वभाव चिडखोर, मतलबी, संशयी, तापट होता. त्याचे पानापानावर पुरावे मिळूनसुद्धा मला मात्र त्याच्याबद्दल का कोणास ठाऊक, अथपासून इतिपर्यंत आपुलकीच वाटत गेली. 'पोर्ट्रेट ऑफ ॲन ऑब्सेशन' हे चरित्र (प्रसिद्धी - १९६७) आहे सर थॉमस फिलिप्स या ग्रंथसंग्राहकाचं, ए. एन. एल. मन्बी या केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजमध्ये ग्रंथपाल असलेल्या ग्रंथप्रेमीनं लिहिलेलं. सर थॉमस फिलिप्स (जन्म : १७९२ - मृत्यू : १८७२) या ग्रंथसंग्राहकाच्या विक्षिप्तपणाचे अनेक किस्से या चरित्रग्रंथात आहेत. त्यानं आपल्या जावयावरच ग्रंथचौर्याचा आरोप केला. मुलीनं सर थॉमसला समजावण्याचा प्रयत्न केला, तर त्यानं तिच्याशीही आपले संबंध तोडून टाकले. सर थॉमस फिलिप्स हा मुळात अनौरस पुत्र होता, त्यामुळे त्याच्या जीवनातली कटुता इतरांशी असलेल्या त्याच्या संबंधामध्ये वेळोवेळी प्रकट होई. कुटुंबीय, स्नेही, सहकारी, व्यवसाय-बंधू... त्याच्याशी ओळख झालेल्या सर्वांशीच त्याचा खटका उडत असे. पण तो एकाच वेडानं झपाटला होता, हस्तलिखितं गोळा करत सुटण्याच्या. त्याचप्रमाणे जगात 'प्रिंट' झालेलं प्रत्येक पुस्तक वाट्टेल ती किंमत देऊन आपल्या संग्रही ठेवण्याच्या. मुळात तो बऱ्यापैकी श्रीमंत अन् जमीनजुमला भरपूर असलेला होता, म्हणूनच हा छंद त्याला जोपासत आला.

मिळवलेलं पुस्तक तो फार सुरक्षित ठेवी, असंही नाही. शेतावरच्या घरात जागा मिळेल तिथं, अगदी खोक्यातसुद्धा तो ते पुस्तक बंद करून ठेवत असे. मात्र कोणीही ग्रंथप्रेमी, संशोधक व अभ्यासक त्याच्याकडे आला, तर कितीही दुर्मीळ पुस्तक असलं तरी ते त्याला हाताळू देत असे. किंबहुना तसं करण्यात त्याचा अहं सुखावत असे. अनेक समकालिनांनी सर थॉमस फिलिप्सच्या सरबराईचा लाभ घेतल्याचे उल्लेख त्याच्या चरित्रात आढळतात. त्यानं इतर ग्रंथप्रेमींशी, अगदी ग्रंथविक्रेत्यांशीसुद्धा केलेल्या भांडणाची वर्णनं वाचताना खूप गंमत वाटते.

म्हणूनच कोणतंही ग्रंथपुराण सर थॉमस फिलिप्सचा उल्लेख केल्याशिवाय संपू शकणार नाही.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी, पृ. १२६-१२७.

# अजून ताजा वास जुन्याला

## अहमदनगरचा अप्रसिद्ध पण अद्वितीय कोशकार (हिंदुस्थानी मराठी कोश)

प्रा. दत्तो वामन पोतदार

*ग्रंथपारखी नजर कशी असते आणि अशा शोधक नजरा कशी दुर्मीळ रत्ने शोधून काढीत असतात याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे कै. दत्तो वामन पोतदार यांचा हा लेख ! ग्रंथपालांची नजरही अशीच तयार व्हायला हवी हे कोणासही कबूल होईल.*

*कै. पोतदारांना कोशकाराची माहिती मिळाली की नाही हे कळायला मार्ग नाही. सध्या या हस्तलिखिताचे स्वरूप कसे आहे ? पुस्तकरूपात हा कोश प्रसिद्ध झाला का? अहमदनगरच्या ग्रंथपालांना याचा शोध घेता येईल का? १९३५ साली एका मौल्यवान रत्नाचा शोध पोतदारांनी म. सा. प. द्वारा पुढे आणला होता. ७० वर्षांनंतर त्याचा शोध घेण्यास कोणी उद्युक्त होईल का?*

साहित्यसंमेलनप्रसंगी बडोद्यास जाणे झाले असताना तेथील ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये, इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. भट्टाचार्य यांच्या कृपेने आम्हांस एक हस्तलिखित कोश पाहण्यास मिळला. सदरहू कोश सुमारे ५५ वर्षांपूर्वी रचण्यामध्ये आलेला आहे. विशेष कौतुकाची गोष्ट अशी– सदरहू कोश केवळ एका गृहस्थाने आपल्या दृढनिष्ठेने व परिश्रमाने सिद्धीस नेलेला आहे. अलीकडील काळात कै. रा. अनंतराव काळेले किंवा कै. वासुदेवरावजी आपटे यांनी एकएकट्यांनी एक एक कोश हाती घेऊन संपूर्ण केल्याची उदाहरणे आपणांस माहीत आहेत. त्यांच्या उदाहरणावरून त्यांस आपले काम पुरे करण्यास किती श्रम पडले असतील याची चांगली कल्पना होते.

हल्ली शब्दकोशमंडळातर्फे मराठी विस्तृत कोश प्रसिद्ध होत आहे. त्याच्या पहिल्या भागाच्या प्रस्तावनेत अनेक प्रसिद्ध कोशांचा उल्लेख आला आहे. त्यात आम्ही ज्याचा आज येथे



अल्पसा परिचय करून देण्याचे योजिले आहे तो कोश आलेला नाही. तथापि एकवार हा कोश विद्वानांस परिचित असणे आम्हास आवश्यक वाटल्यावरून आम्ही पुढील माहिती देत आहोत.

हा कोश इ. स. १८७८ त पुरा झाला असे दिसते. याचा कर्ता रूपसिंह सुंदरसिंह नावाचा नगरच्या कलेक्टर कचेरीतील एक व्यासंगी कारकून हा होता. व्यासंगाने असमान स्थितीतही माणसास किती मोठे कार्य करिता येते याचे हा कोश हे एक उत्तम उदाहरण आहे. इंग्रजी भाषेचा कोश एकट्याच्या बळावर रचणारा डॉ. जॉन्सन् हा एक होऊन गेला. डॉ. जॉन्सन्च्या चरित्राचे रहस्य महाराष्ट्र समाजास समजाऊन सांगणारे निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर हे व त्यांची निबंधमाला ही दोन्ही हा कोश पुरा झाला त्या वेळी गाजत होती. परंतु या कोशाच्या प्रसिद्धीचा भाग्योदय त्या वेळी आला नाही. आणि आताही यापुढे येईल असे वाटत नाही.

डॉ. भट्टाचार्य यांनी हा कोश गायकवाड सरकारासाठी २०० रुपये किमतीस विकत घेतला. काही सावकारी व्यवहारात रद्दीत जावयाच्या ऐवजी हे रद्दीतील रत्न प्राचीन ग्रंथापालांकडे जाऊन बसले. डॉ. भट्टाचार्यांच्यासारखा रत्नपारखी गायकवाड सरकारांच्या पदरी होता म्हणूनच ही गोष्ट घडून आली.

सदरहू कोश सुवाच्य अक्षराने लिहिलेला असून मजबूत कातडी पुठ्ठ्याने मढविलेला आहे. हा फारसी किंवा उर्दू मराठी कोश आहे व त्याची अकारविल्हेही त्याच भाषेतील क्रमाक्रमाने आहे. मूळ शब्दाचा मराठी उच्चार देऊन व त्याची मूळ जात सांगून मग त्याचे उर्दू लिपीत वर्णलेखन केले आहे. शेवटी त्याचा अर्थ दिला असून त्याची साधितेही दिली आहेत व त्यांचेही अर्थ सांगितले आहेत. मधून मधून आधारादाखल मुसलमानी बयतही दिलेले आहेत हे विशेष आहे. इतकी मेहनत ग्रंथकर्त्याने हा कोश रचताना घेतली आहे.

देशभाषेचा अभिमान व तिची सेवा करण्याची लालसा ही या कोशकर्त्याचे ठिकाणी उत्कटत्वाने वसत असलेली दिसत आहे. ग्रंथकाराने आपले हृद्गत आपल्या प्रस्तावनेत मोकळेपणाने सांगितले आहे. स्वभाषेकडे दुलर्क्ष केल्यामुळे आपण मृतप्राय होऊन आपले नावही उरणार नाही असे भय राजवाडे यांनी उच्चारून दाखविण्यापूर्वी ५० वर्षे या कोशकर्त्याने बोलून दाखविले आहे.

देश सुधारण्यास विद्यावृद्धी हेच कारण असे हा कोशकर्ता सांगतो. अशा विद्यावृद्धीस मोठमोठे पगारदार किती साहाय्य करितात ते आपणांसही या कोशकाराप्रमाणे आज विचारिता येईल. एका एका शब्दाकरिता कोशकर्त्याने प्रहराचे प्रहर मोडलेले आहेत. ग्रंथकर्त्याने हा कोश आपले वडील सुंदरसिंह व बंधू लछमनसिंह यांच्या मदतीने लिहिला. दुर्दैवाने ते दोघेही १८७८ साली महिन्याच्या अंतराने वारले. या कोशाची तयारी १८७० साली सुरू होऊन १८७८ साली पुरी झाली. म्हणजे या कोशासाठी आठ वर्षे ग्रंथकार सतत प्रयत्न करीत होते असे दिसते. मराठी ही ग्रंथकर्त्याची स्वभाषा नसतानादेखील त्याने तिची इतकी बहुमोल सेवा केली हे खरोखरच त्यास भूषणावह होय. आपल्या भाषेने संस्कृताची बरोबरी करावी आणि इंग्रजीपेक्षा तिने मागे राहू नये अशी ग्रंथकर्त्याचे मनात फारच तळमळ असावी असे दिसते.

या कोशात ४०/४५ हजार शब्दांचा संग्रह झालेला आहे असे डॉ. भट्टाचार्य यांचे म्हणणे आहे. कोण जरी छापला नाही, तरी त्याचा उपयोग नवीन कोशकारांस खचित पुष्कळ होईल.

रा. रूपसिंह यांची प्रस्तावना विचारांचे दृष्टीने फार लक्षात घेण्यासारखी वाटली म्हणूनच आम्ही ती पत्रिकेत छापली आहे. ग्रंथकर्त्याची पुढील विधाने विशेष मननीय आहेत असे आम्हास वाटते.

(१) जी देशभाषा नव्हे, तिचा त्या देशामध्ये कितीही फैलाव झाला व कितीही लोकांनी जन्मचे जन्म तिच्या अभ्यासामध्ये व प्रसारामध्ये घालविले, तथापि देशभाषेकडे त्यांनी लक्ष दिल्यावांचून व्यर्थ आहे.

(२) ज्यांना खरोखरी इंग्रजीचे चांगले ज्ञान आहे त्यातील बहुतेकांना स्वभाषेच्या अज्ञानामुळे त्या शिकण्याचा काहीच स्तुत्य उपयोग करता येत नाही.

(३) लहानथोर कामगार सुमारे तीन हजार असतील पण त्यांच्या मोठ्या पगाराच्या मानाने किंवा देशसुधारणेच्या मानाने पाहिले असता त्यांच्याकडून विद्यावृद्धीच्या कामाकरिता किती साहाय्य मिळते हे आबालवृद्धांस माहीत आहेच.

(४) या देशात श्रीमंतांपेक्षा गरिबांची संख्या जास्त आहे आणि विद्या शिकण्यास साधारणत: गरिबांचीच मुले फार झटतात. यास्तव ही अडचण दूर व्हावी आणि अन्य भाषेचे ज्ञान संपादन करण्याचे साधन सर्वांस एकसारखे मिळावे हाही एक माझा हेतू आहे.

नगर वाङ्मय मंडळाने या कामी अवश्य लक्ष पुरवून कै.रूपसिंह यांची माहिती शोधून काढून आम्हाकडे पाठवावी. त्यांचे चित्र मिळाल्यासही पाठवावे अशी आमची विनंती आहे. मोठमोठ्या विद्वानांसही उदाहरण घालून देण्याजोगे जे काम रूपसिंहजी यांनी आपल्या हिंदुस्थानी मराठी कोशाच्या रूपाने करून ठेवले आहे ते आपणा सर्वांस अत्यंत अभिमानास्पद असून अशा व्यासंगी पुरुषाचे आपण स्मरण ठेविले पाहिजे असे वाटल्यावरून आम्ही ही हकीकत वाचकांस सादर केली आहे. बडोदे साहित्यसंमेलनाचे वेळी हा ग्रंथ सर्वांस पाहण्याची सोय झाली असती तर बरे झाले असते. डॉ.भट्टाचार्य यांच्या कृपेने आम्हास या अपूर्व ग्रंथाचे दर्शन घडले याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहो. आमचे साहाध्यायी श्रीमंत रघुनाथराव रायरीकर, बी. ए. यांनी आमचेसाठी या कामी फारच तसदी सोसली हे येथे नमूद करणे भाग आहे. आमच्या नक्कलकारास मुळांतील शब्द कोठे कोठ लागले नाहीत तथापि आमचे काम त्यावाचून फारसे अडण्यासारखे नाही.

(मराठी साहित्य पत्रिका, वर्ष ७ - अंक ५, जाने १९३५ पृ. ७५-७७)

❑❑❑



# प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे यांचे ग्रंथालय

अर्चना गराटे

*गेल्या काही अंकांपासून भारतातील वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालयांची ओळख करून देणारे लेख आम्ही प्रसिद्ध केले. वेगवेगळी ग्रंथालये विद्यार्थ्यांच्यापर्यंत जावीत हा उद्देश त्यामागे आहे. भारताबरोबरच जगातल्या काही प्रमुख ग्रंथालयांचीही ओळख करून द्यायचा मानस आहे.*

*पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेने केलेले कार्य महनीय आहे. ठाण्यासारख्या शहरात (जे मुंबईमुळे झाकोळून गेले आहे) अशीच एक संस्था उभी राहिली आहे. तिचा हा परिचय.*

*हस्तलिखितांचे ग्रंथालय, तेथील संग्रह यांची ओळख तर यामुळे होईलच, परंतु जी हस्तलिखिते विद्यार्थ्यांना फारशी पाहायला मिळत नाही, त्यांचे काही नुमनेही त्यांना इथे पाहता येतील. यामुळे जुन्या प्राच्यविद्येसारख्या विषयाची आवड निर्माण होईल असा विश्वास वाटतो. २००१ पर्यंतचा हा पाहणी अहवाल प्रथम मुंबई केंद्रातून M. Lib. Sc. चा प्रकल्प म्हणून प्रा. मोहन पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली सादर झाला.*

## प्राच्यविद्या अभ्याससंस्थेचा इतिहास

इ.स. १९८२ मध्ये ठाण्यातील डॉ. विजय बेडेकर यांनी प्राच्यविद्या अभ्याससंस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या स्थापनेतील बीजे इ.स.१९७९ मध्ये टोकियो येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्त्रीरोगतज्ञांच्या चर्चासत्रात रोवल्याचे आढळते.

प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र विषयावरील या चर्चासत्रात अनेक देशांतील स्त्रीरोगतज्ञांनी सहभाग घेतला होता, विजय बेडेकर तेथे भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. चर्चासत्रातील चर्चेत सदर विषयावर सर्व प्रतिनिधींमध्ये अमेरिकन तज्ञांचे प्रभुत्व जास्त असल्याचे त्यांना

आढळून आले. आपल्याच देशातील प्राचीन वैद्यकशास्त्रातील मीहती आपणांस परदेशीयांकडून ऐकावी लागते आहे याची खंत वाटली. याचा परिणाम म्हणून त्यांनी प्राचीन भारतीय विद्या, शास्त्रे व मानव्य संस्कृती इत्यादी विषयांचा अभ्यास करण्याचे ठरविले.

या विषयांचा अभ्यास करण्यासाठी पुस्तकांची उपलब्धी अतिशय महत्त्वाची असते. इ.स. १९७९ च्या दरम्यान मात्र ठाण्यात या विषयांवरील पुस्तकांचा संग्रह असणारे समृद्ध ग्रंथालय नव्हते. तसेच बेडेकरांना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करावयाचे असल्याने विश्नसनीय माहिती उपलब्ध होणे ही त्यांची समस्या बनली होती. या विषयावरील अभ्यासासाठी ते संपूर्णपणे मुंबईतील ग्रंथालयांवर अवलंबून होते. व्यवसाय सांभाळून जेव्हा दररोज मुंबईत जाऊन हा अभ्यास करणे त्यांना कठीण जाऊ लागले तेव्हा ठाणे शहरातील या विषयाला वाहिलेले एखादे ग्रंथालय असावे असे त्यांना वाटू लागले. यासाठी त्यांनी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे २६ जून १९८२ रोजी हिंदू संस्कृतीमधील शास्त्र व विज्ञान या विषयावर मुक्त चर्चासत्र आयोजित केल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, या विषयावर सखोल वाचन केल्याशिवाय हा विषय मांडणे अतिशय अवघड आहे, याची सर्वांना जाणीव झाली. त्यामुळे या चर्चासत्रात ठाण्यामध्ये असे ग्रंथालय स्थापन केले जावे या मुद्यावर सर्वांचे एकमत झाले व बेडेकरांनी डिसेंबर १९८२ मध्ये प्राच्यविद्या अभ्याससंस्थेची स्थापना केली.

संस्थेच्या स्थापनेच्या वेळी संस्थेस कार्यालयासाठी जागा उपलब्ध नसल्याने सर्व कामकाज बेडेकरांच्या घरीच नौपाडा येथील शिवशक्ती अपार्टमेंटमध्येच होत असे. तेथेच संस्थेचे ग्रंथसंग्रह जमविण्याचे कार्य सुरू झाले. हे ग्रंथालय सर्वांना मोफत सेवा देत असल्याने तसेच संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नसल्याने संस्थेच्या व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या निधीबाबत प्रश्न निर्माण झाला.

बेडेकरांनी सुरू केलेल्या या समाजोपयोगी कार्यात निधीमुळे अडथळा येऊ नये यासाठीच ठाण्याचे तत्कालीन प्रशासक गोंविद स्वरूप यांनी संस्थेस कार्यालय व ग्रंथालय यासाठी जागा मिळवून दिली. त्यांनी बेडेकर व ठाणे महानगरपालिका यांमध्ये १९८४ मध्ये करार घडवून संस्थेस नौपाडा येथील शाहू मार्केट या इमारतीच्या पाहिल्या मजल्यावर २५०० चौ. फूट जागा उपलब्ध करून दिली. याशिवाय वीज, पाणी, फर्निचर, झेरॉक्स मशीन, स्टेशनरी, इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या.एक शिपाई व स्वच्छता राखण्यासाठी सेवकही उपलब्ध करून दिले. मात्र कालांतराने ठाणे महानगरपालिका या ग्रंथालयाच्या बाबतीत पूर्णपणे उदासीन झाली.

पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या धर्तीवरच निर्माण करण्यात आलेल्या या संस्थेने गेल्या २० वर्षांत निरनिराळे उपक्रम राबवून अभ्यासकांना विदेशी दौरेही करवून आणले आहेत. मात्र संस्था भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराशी संलग्न नाही.

## प्राच्यविद्या अभ्याससंस्थेच्या ग्रंथालयाचा इतिहास

वर्तमानाआधी घडलेल्या सर्व भौतिक-मानवी-नैसर्गिक घटनांच्या वस्तुनिष्ठ, संदर्भसापेक्ष व कालानुक्रमाने नोंदीस इतिहास म्हटले जाते. इतिहासाचा अभ्यास करण्याचे एक प्रमुख साधन म्हणजे हस्तलिखिते. हस्तलिखितांद्वारे तत्कालीन सामाजिक, राजकीय,धार्मिक व आर्थिक परिस्थितीबाबत माहिती मिळते. त्यातून मिळणारी माहिती विश्वसनीय समजली जाते. हस्तलिखिते



संग्रहित करून त्यांचे व्यवस्थापन करणारी ग्रंथालये भारतात फार कमी आहेत व त्यांपैकी एक म्हणजे ठाणे येथील प्राच्यविद्या अभ्याससंस्था होय.

संस्थेचे संदर्भग्रंथालय व पुराणवस्तुसंग्रहालय असे दोन विभाग आहेत. संस्थेच्या स्थापनेच्यावेळी ग्रंथालयात केवळ ३००० ग्रंथ व ८०० हस्तलिखिते होती. सप्टेंबर २००१ अखेर संस्थेकडे १९,६५० ग्रंथ, ३००० हस्तलिखिते व ५०० छापील पोथ्या आहेत. हे सर्व वाचनसाहित्य संस्थेस देणगीदाखल मिळालेले आहे. राजापूर येथील सुबोध पाटणकर यांनी इ.स. १९८५ मध्ये १५०० पुस्तकांचा संग्रह संस्थेस देणगीदाखल दिला. संस्थेस मिळालेली ही सर्वांत पहिली देणगी होय. इ.स. १९८८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे तत्कालीन डीन जॉर्ज मोराईस यांनी इतिहास, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान, इत्यादी विषयांवरील (इ.स.१८५० पासून छापलेले ) ५,८०० ग्रंथ व नियतकालिके संस्थेस दिले.[१] इ. स. १९९५ मध्ये विजय बेडेकर यांनी स्वत:चा खाजगी ३,००० ग्रंथांचा संग्रह संस्थेस दिला. ठाण्यातील पंढरीनाथ देशमुख यांनी संस्थेस ४,००० ग्रंथांची मरणोत्तर देगणी दिली. इ.स. १९९६ मध्ये कर्जत जवळील कोईळ गावाचे दिवंगत वैदिक गांगल यांचा सुमारे ५० पोथ्यांचा संग्रह व इ.स. २००१ मध्ये पुण्याचे संस्कृत व्याकरण पंडित गणेशशास्त्री शेंड्ये यांचा ३०२ दुर्मीळ पोथ्यांचा संग्रह संस्थेस देणगीदाखल मिळाला. तसेच इ.स. २००१ मध्येच केशव जोशी यांनी २,३५० ग्रंथ संस्थेस दिले. गुजरात रिसर्च सोसायटीने शिक्षणविषयक ग्रंथ व प्रबंध संस्थेस देणगीदाखल दिले आहेत.

## संस्थेच्या ग्रंथालयातील संग्रह

अशा प्रकारे सप्टेंबर २००१ अखेर संस्थेकडे १९, ६५० ग्रंथ, अनेक जुन्या नियतकालिकांचे अंक आहेत. ग्रंथांपैकी १०,००० ग्रंथ इंग्रजी भाषेतील; ९,१५० ग्रंथ मराठी व संस्कृत भाषेतील आणि ५०० ग्रंथ पोर्तुगीज भाषेतील आहेत. त्यातील १७९४ सालचे हिस्ट्री ऑफ डेक्कन व १८१५ सालचे इंडिया गॅझेटियर हे ग्रंथ फार जुने आहेत. संस्थेच्या ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथसंग्रहात धर्म, गीता, ज्योतिष, उपनिषद, तत्त्वज्ञान, इतिहास, कोशवाङ्मय, संभाषणकला, मानसशास्त्र, स्थापत्यशास्त्र, शिल्पशास्त्र इत्यादी विषयांवरील ग्रंथ आहेत. स्त्रीजीवनविषयक ४०० कात्रणे आहेत. संस्थेच्या हस्तलिखित संग्रहात वेदसंहिता, ब्राह्मण, आरण्यक, सूत्रे, निघंटू, निरुक्त, व्याकरण, शिक्षण वेदांग, चतुष्ट्य, पुराण, ज्योतिष संस्कार, शांतिकर्म, तत्त्वज्ञान, गीता, कोश, प्रायश्चित, वैद्यक, तंत्र व संकीर्ण अशा निरनिराळ्या विषयांचा अंतर्भाव आहे.

## संस्थेने राबविलेले उपक्रम

प्राच्यविद्या अभ्याससंस्थेद्वारे ग्रंथालयास इ. स. २००१ पर्यंत शंभरहून अधिक देशीविदेशी तज्ज्ञ वक्त्यांची विशेष व्याख्याने आयोजित केली. संस्थेच्या ग्रंथालयात स्थापनेपासून प्रतिवर्षी शिक्षण, विज्ञान, कृषी, पर्यावरण, गायन, नृत्य, नाट्यकला, विदेशी संस्कृत अध्ययन, पाणिनीचे व्याकरण, दैवतशास्त्र, संग्रहालयशास्त्र, तंत्रशास्त्र, स्मृतिविचार, प्राचीन भारतीय प्रशासन, वर्णाश्रम व्यवस्था, पुराणवाङ्मय, बृहत्शास्त्र, आहारशास्त्र, इत्यादी विषयांवर चर्चासत्रे झाली आहेत.

१९८४ साली फिलोडेल्फिया (अमेरिका) येथे भरलेल्या व १९८७ साली लेड (हॉलंड) येथे भरलेल्या जागतिक संस्कृत परिषदेत संस्थेच्या २५ प्रतिनिधींनी भाग घेतला होता. ऑस्ट्रिया येथील आठव्या जागतिक संस्कृत परिषदेत संस्थेचे अध्यक्ष विजय बेडेकर स्वतः सहभागी होते. १९८६ साली १५ अभ्यासकांनी संस्थेतर्फे चीनचा दौरा केला. त्याचवर्षी आशियाई इतिहास परिषदेला विजय बेडेकर व एस. वाय. गोखले सिंगापूरमध्ये उपस्थित होते. इ. स. १९८८ मध्ये विजय बेडेकरांनी पाकिस्तानचा दौरा करून मोहोंजोदडो, हडप्पा, लाहोर, कराची, इत्यादी स्थळांना भेटी दिल्या. याशिवाय संस्थेने प्रदर्शने व शिबिरेही भरविली आहेत.

संस्थेच्या ग्रंथालयात १९८५ साली ठाणे शहराचा दोन हजार वर्षांचा इतिहास दाखवणारे ग्रंथ, वृत्तपत्र कात्रणे व वस्तू, छायाचित्रे यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. १९८६ साली कोशवाङ्मयाचे प्रदर्शन व १९९० साली मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमच्या सहयोगाने पर्यावरणावर प्रदर्शन भरवले होते. २००० साली न्यू इंग्लिश स्कूल, ठाणे येथे शाळेच्या अमृतमहोत्सवात इतिहास प्रदर्शन संस्थेने आयोजित केले होते.

शेषगिरीराव यांच्या संपादकत्वाखाली तयार होणाऱ्या हिंदुत्वाविषयीच्या विश्वकोशाची पश्चिम विभागीय बैठक इ.स. १९८८ मध्ये संस्थेत भरवली होती. त्यास ५० अभ्यासक हजर होते. १९८९ मध्ये मणिपूर व नागालँडच्या युवकांकरिता भारतीय संस्कृतीचा परिचय या विषयावर तीन सप्ताहांचे शिबिर आयोजित केले होते. इ.स. १९९० पासून संस्थेने योग-आयुर्वेद हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे. १९९१ साली भारत सरकारच्या चित्रपट विभागाच्या सहयोगाने 'परंपरा' हा माहितीपटांचा एक सप्ताहाचा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

## संस्थेचे वस्तुसंग्रहालय

संस्थेच्या दुसऱ्या विभागात म्हणजेच पुराणवस्तुसंग्रहालयात दापोली येथील अण्णा शिरगावकर यांनी दिलेल्या अनेक पुराणवस्तूंचा संग्रह केला आहे. संग्रहालयात इ.स. ८०० ते इ.स. १२०० दरम्यानच्या प्राचीन दगडी मूर्ती, मराठेकालीन मिनिएचर पेंटिंग्ज, सातवाहन कालापासूनची नाणी, कलात्मक वस्तू (पितळी, नारळाच्या करवंटीपासून बनवलेले), निरनिराळ्या प्रकारचे रांजण, संगमरवरी मूर्ती, समुद्रातील प्रवाळ वस्तू, बांबूपासून बनवलेल्या कलात्मक वस्तू, खेड्यातील चावडीवरचे चौकोनी दिवे, कंदिलांचे निरनिराळे प्रकार, शिवकालीन योद्ध्याचा अंगरखा, तोफा, तलवारी इत्यादी वस्तू आहेत.

इ.स. १४२६ (शके १३४८) मधील विजयनगरचा शिलालेख हा विशेष ठेवा संस्थेकडे आहे. ९०० वर्षांपूर्वीचा केशदेव या शिलाहार राजाचा ताम्रपट, पेशवेकालीन गणपतची मूर्ती, दुर्गा व सरस्वती यांच्या मूर्ती संस्थेकडे आहेत. मात्र संस्थेस वस्तुसंग्रहालयातील पुराणवस्तूंची मांडणी निधीअभावी करता येणे शक्य झालेले नाही.

## प्राच्यविद्या अभ्याससंस्थेच्या ग्रंथालयातील हस्तलिखितांचे स्वरूप

संस्थेच्या ग्रंथालयात एकूण २,९६२ हस्तलिखिते आहेत. त्यामध्ये व्याकरण, निरुक्त,



कोश, सूत्रे, वैद्यक, प्रायश्चित्त, नाटक विषय आढळून आले. संशोधकास या हस्तलिखितांमध्ये काही वैशिष्ट्ये दिसून आली, ती पुढीलप्रमाणे :

## (१) सचित्र हस्तलिखिते

संस्थेच्या ग्रंथालयात एकूण ४ सचित्र हस्तलिखिते आढळली. त्यांतील चित्रे विविध रंगांत रंगविलेली असून सदर चित्रे मुखपृष्ठाकरिता बनवलेली आहेत. या हस्तलिखितांबाबत माहिती पुढीलप्रमाणे :

| *अ. क्र.* | *नाव* | *लेखक* | *वर्ष* | *पाने* | *ओळी* | *पूर्ण/ अपूर्ण* | *आकार (सेमी)* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | परिभाषेन्दुशेखर | — | — | ४७ | १० | पूर्ण | ३० X १० |
| २. | शांकभरी सहस्रनाम | — | १७८८ | २८ | ८ | पूर्ण | १९ X १० |
| ३. | महागणपति चतुर्थी वृत्तदर्पण | — | — | २ | ९ | पूर्ण | १५ X १० |
| ४. | अध्यात्म रामायण (संपूर्ण) | माधव अत्रे | १८२४ | १४५ | १० | पूर्ण | २५ X २० |

(सचित्र हस्तलिखितांबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक १)

## (२) सुंदर हस्ताक्षर

काही पोथ्यांतील हस्ताक्षर सुंदर आहे. दाखलनोंदवहीत एकूण १७ पोथ्यांच्या नोंदीत सुंदर हस्ताक्षर असा शेरा दिसून येतो. त्यांपैकी निवडक पोथ्यांबाबत माहिती पुढीलप्रमाणे :

| *अ. क्र.* | *नाव* | *लेखक* | *वर्ष* | *पाने* | *ओळी* | *पूर्ण/ अपूर्ण* | *आकार (सेमी)* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीमद्‌भागवत | — | — | २०३ | १४ | पूर्ण | ३० X ९ |
| २. | पिठोरीव्रत पूजाविधी | गजानन | १७६९ | १५ | ४ | पूर्ण | ७ X ६ |
| ३. | ऋग्वेद संहिता | हरिबेर्डेलिखित | १८४७ | — | ७ | अपूर्ण | ७ X ६ |
| ४. | श्रीमद्‌भगवद्‌गीता | हरिभट | १७९९ | ७५ | ७ | पूर्ण | २३ X १३ |
| ५. | जीवच्छ्राद्धविधी | रामकृष्ण गोविंद नवाथे | १७८३ | ११२ | — | पूर्ण | २१ X १० |

| अ. क्र. | नाव | लेखक | वर्ष | पाने | ओळी | पूर्ण/ अपूर्ण | आकार (सेमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | शतश्लोकी टीका | आनंदगिरी | — | १११ | — | पूर्ण | २० X १४ |
| ७. | बलिदान | रामचंद्र हर्डीकर | — | ४ | — | पूर्ण | २९ X १८ |
| ८. | निरुक्त पूर्वषट्क | गणेशभट बेडेकर | १७८५ | — | — | पूर्ण | २१ X १० |
| ९. | आदित्य हृदय | — | — | — | १२ | अपूर्ण | १६ X १० |
| १०. | ऋग्वेदपदे (सप्तमाष्टक) | रामचंद्र सहस्रबुद्धे | १७८९ | १३२ | — | पूर्ण | २१ X १० |

(सुंदर हस्ताक्षरातील हस्तलिखितांबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक २)

## (३) अवाचनीय हस्ताक्षर

संस्थेकडे ज्याप्रमाणे सुंदर हस्ताक्षरातील हस्तलिखिते आहेत त्याचप्रमाणे एकूण ८ हस्तलिखितांतील हस्ताक्षर अवाचनीय आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | नाव | लेखक | वर्ष | पाने | ओळी | पूर्ण/ अपूर्ण | आकार (सेमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | याज्ञवल्क्य मिताक्षर | — | — | ४३४ | — | पूर्ण | २०X१२ |
| २. | दर्शपूर्णमास पंचप्रयोग | सदाशिव उपाध्ये | १७७९ | ४६ | — | पूर्ण | २० X १२ |
| ३. | ज्ञानेश्वरी | — | — | १०५ | १८ | अपूर्ण | २९ X १८ |
| ४. | स्मार्त आधान पद्धती | — | — | १३ | १ | पूर्ण | २१X१० |
| ५. | हरतालिकापूजा | — | — | १७ | ७ | पूर्ण | २०X१२ |

(अवाचनीय हस्ताक्षरातील हस्तलिखितांबाबत मीहती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक ३)





**हस्तलिखित क्र. १ : सचित्र हस्तलिखिताचा नमुना**

**नाव : अध्यात्म रामायण**

**लेखक : माधव अत्रे**



हस्तलिखित क्र. २ : सुंदर हस्ताक्षरातील हस्तलिखिताचा नमुना

नाव : श्रीमद्भागवत





हस्तलिखित क्र. ३ : अवाचनीय हस्ताक्षरातील हस्तलिखिताचा नमुना

नाव : याज्ञवल्क्य मिताक्षर

## (४) जीर्ण हस्तलिखिते

संस्थेच्या नोंदवहीत काही जीर्ण हस्तलिखितांची नोंद केलेली आहे. एकूण ४५ हस्तलिखिते जीर्ण झालेली आहेत. त्यांपैकी निवडक हस्तालिखतांबाबत माहिती पुढीलप्रमाणे–

| अ. क्र. | नाव | लेखक | वर्ष | पाने | ओळी | खराब होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ऐतेरेय ब्राह्मण | रामचंद्र अनंत जोग | १८६९ | २३ | ९ | वाळवी |
| २. | ऐतेरेय ब्राह्मण | केशवभट चैसास | १८७७ | ३५ | ९ | वाळवी |
| ३. | ग्रहयज्ञ | सदाशिव भट | १७६० | २३ | ७ | कसर |
| ४. | प्रयोग | — | १६९१ | ३१ | ९ | खराब कागद |
| ५. | ग्रहलाघव | रघुनाथ नारायण | १७६९ | ३५ | १० | वाळवी |

(जीर्ण हस्तलिखितांबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक ४)

## (५) लिखाणाचे माध्यम

ग्रंथालयात कागद व ताडपत्र या दोन लेखन–माध्यमांवर लिहिलेली हस्तलिखिते आढळली. दाखलनोंदवहीत नोंदवलेली सर्व हस्तलिखिते कागदावर लिहिलेली असून केवळ दोनच हस्तलिखिते ताडपत्रांवर लिहिलेली आहेत. मात्र त्यांची दाखलनोंदवहीत नोंद केलेली नाही. पैकी एक हस्तलिखित संस्कृत भाषेतील असून गीता या विषयावरील आहे तर दुसरे तामिळ भाषेतील आहे.

## (६) भाषा

संस्थेकडे संस्कृत, मराठी व तामिळ भाषेतील हस्तलिखिते आहेत. यांपैकी तामिळ भाषेतील हस्तलिखितांची नोंद दाखलनोंदवहीत केलेली नाही. संस्कृत भाषेतील २,९५५, मराठीतील ०७ तर तामिळ भाषेतील केवळ ०१ हस्तलिखित दिसून आले. मराठी हस्तलिखितांपैकी काही निवडक हस्तलिखितांची माहिती पुढीलप्रमाणे–

| अ. क्र. | नाव | लेखक | वर्ष | पाने | ओळी | पूर्ण/ अपूर्ण | आकार (सेमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जैमिनी अश्वमेध | फकिरा पोसण्या | — | ९६ | — | पूर्ण | २९X११८ |
| २. | गर्भगीता | — | १८७१ | — | ८ | पूर्ण | २०X१० |
| ३. | रामदास ग्रंथ | आत्माराम | — | २५ | ९ | पूर्ण | २१ X ९ |
| ४. | अंतर्भाव | — | — | १७ | — | अपूर्ण | २० X ९ |
| ५. | जुनाट पुरुष | रामदास | — | ८ | — | पूर्ण | २०X१० |

(मराठी भाषेतील हस्तलिखितांबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक ५)





**हस्तलिखित क्र. ४ : जीर्ण हस्तलिखिताचा नमुना**

**नाव : ऐतरेय ब्राह्मण**

**लेखक : रामचंद्र अनंत जोग**



**हस्तलिखित क्र. ५ : मराठी हस्तलिखिताचा नमुना**

**नाव : जैमिनी अश्वमेध**



## (७) पूर्ण व अपूर्ण हस्तलिखिते

ग्रंथालयातील हस्तलिखितांपैकी २,२८९ हस्तलिखिते पूर्ण आहेत तर ६७३ हस्तलिखिते अपूर्ण आहेत.

## (८) लिपी

प्रस्तुत ग्रंथालयात देवनागरी व मोडी लिपीतील हस्तलिखिते आढळली. मोडी लिपीतील हस्तलिखितांची नोंद दाखलनोंदवहीत केलेली नाही. मोडी लिपीतील केवळ एकच हस्तलिखित आहे. रामदासचरित्र या विषयावरील सदर हस्तलिखित असून ते अपूर्ण आहे.

## (९) प्रतलेखन काळाचा उल्लेख असणारी / नसणारी हस्तलिखिते

प्रस्तुत संग्रहातील हस्तलिखिते ज्या काळात लिहिली गेली त्या काळाचा उल्लेख असणारी एकूण ११६४ हस्तलिखिते तर काळाचा उल्लेख नसणारी एकूण १७९८ हस्तलिखिते आहेत.

## (१०) सर्वांत जुने हस्तलिखित

संस्थेच्या संग्रहात लक्ष्मीधर याने लिहिलेली इ.स. १५५१ मध्ये लिहिलेली अद्वैत मकरंद ही सर्वांत जुनी पोथी आहे.

| *अ. क्र.* | *नाव* | *लेखक* | *वर्ष* | *पाने* | *ओळी* | *पूर्ण/ अपूर्ण* | *आकार* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अद्वैत मकरंद | लक्ष्मीधर | १५५१ | २४ | — | पूर्ण | २५X १० |

(संस्थेच्या संग्रहातील सर्वांत जुन्या हस्तलिखिताबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक ६)

## (११) संग्रहातील सर्वांत अलीकडे लिहिलेले हस्तलिखित

सदर संग्रहात इ.स. १९५९ मध्ये लिहिलेले चलप्रतिष्ठा हे सर्वांत अलीकडे लिहिलेले हस्तलिखित आहे.

| *अ. क्र.* | *नाव* | *लेखक* | *वर्ष* | *पाने* | *ओळी* | *पूर्ण/ अपूर्ण* | *आकार* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चलप्रतिष्ठा | सखाराम केशव भट वैशंपायन | १९५९ | — | ११ | पूर्ण | २५ X १० |

(संस्थेच्या संग्रहातील सर्वांत अलीकडे लिहिलेल्या हस्तालिखिताबाबत माहिती देणारा तक्ता, तक्ता क्रमांक ७)



हस्तलिखित क्र. – : मोडी लिपीतील हस्तलिखिताचा नमुना

नाव :





हस्तलिखित क्र. ६ : संस्थेच्या सर्वांत जुन्या हस्तलिखिताचा नमुना

नाव : अद्‌वैत मकरंद

लेखक : लक्ष्मीधर, लेखन काल : १५५१ (इ.स.)



**हस्तलिखित क्र. ७ : संस्थेच्या संग्रहातील सर्वांत अलीकडे लिहिलेल्या हस्तलिखिताचा नमुना**

**नाव : चलप्रतिष्ठा**

**लेखक : सखाराम केशव भट वैशंपायन**

**लेखनकाल : इ. स. १९५९**



## समारोप

गेल्या ३०-३२ वर्षांत सुरू झालेली ठाण्यातील ही एकमेव संस्था. अल्पावधीत या संस्थेचा विस्तार फार मोठा नसला तरी महत्त्वपूर्ण आहे. विविध प्रकारची ग्रंथालये शहरात असणे ही त्या शहरातील नागरिकांची फार मोठी सोय असते. मुंबई, पुणे ही शहरे त्या मानाने भाग्यवान आहेत. पुण्याची भांडारकर प्राच्य संशोधन संस्था जगप्रसिद्ध आहे. ठाणे शहराने त्यांच्या पावलावर पाऊल टाकून एक वेगळेच ग्रंथालय निर्माण केले ही महत्त्वाची घटना. ग्रंथालयात हस्तलिखितांचा संग्रह असणे ही दुर्मीळ गोष्ट असते. परंतु ज्या ग्रंथालयात दुर्मीळ हस्तलिखितांचाच केवळ संग्रह केला जातो, अशा ग्रथालयांचे व्यवस्थापन, सेवा या विशेष असतात. जे अभ्यासू तिथे येतात त्यांना सेवा देण्यासठी हे ग्रंथालय तत्पर असते हे सांगायची आवश्यकता नाही. पुढे ही संस्था ठाण्यातील महत्त्वाची संस्था ठरेल असा विश्वास संस्थेने निर्माण केला आहे.

(संस्थेच्या ग्रंथालयातील हस्तलिखितांचा त्यांच्या लेखनकालानुसार तक्ता, तक्ता क्र.८)

पुढील तक्त्यात इ.स. १९५१ ते १९६०, इ.स. १९६१ ते इ.स. १९७० अशा प्रकारे काळाचे दशकानुसार गट पाडलेले आहेत.

| *अ. क्र.* | *लेखनकाल (इ. स. मध्ये)* | *आलेखातील संज्ञा* | *उपलब्ध हस्तलिखितांची संख्या* |
|---|---|---|---|
| १. | १५५१ - १५६० | A | १ |
| २. | १५६१ - १५७० | B | १ |
| ३. | १५७१ - १५८० | C | १ |
| ४. | १५८१ - १५९० | D | २ |
| ५. | १५९१ - १६०० | E | २ |
| ६. | १६०१ - १६१० | F | — |
| ७. | १६११ - १६२० | G | १ |
| ८. | १६२१ - १६३० | H | ५ |
| ९. | १६३१ - १६४० | I | — |
| १०. | १६४१ - १६५० | J | १ |
| ११. | १६५१ - १६६० | K | २ |
| १२. | १६६१ - १६७० | L | २ |
| १३. | १६७१ - १६८० | M | २ |
| १४. | १६८१ - १६९० | N | — |
| १५. | १६९१ - १७०० | O | ३ |
| १६. | १७०१ - १७१० | P | १ |




**आलेख क्र. १ : हस्तलिखितांचा त्यांच्या लेखनकालानुसार माहिती देणारा आलेख**



| अ. क्र. | लेखनकाल (इ. स. मध्ये) | आलेखातील संज्ञा | उपलब्ध हस्तलिखितांची संख्या |
|---|---|---|---|
| १७. | १७११ – १७२० | Q | ८ |
| १८. | १७२१ – १७३० | R | १३ |
| १९. | १७३१ – १७४० | S | 23 |
| २०. | १७४१ – १७५० | T | २१ |
| २१. | १७५१ – १७६० | U | ५० |
| २२. | १७६१ – १७७० | V | ७१ |
| २३. | १७७१ – १७८० | W | ९० |
| २४. | १७८१ – १७९० | X | १४६ |
| २५. | १७९१ – १८०० | Y | ९९ |
| २६. | १८०१ – १८१० | Z | ६९ |
| २७. | १८११ – १८२० | AA | ९२ |
| २८. | १८२१ –१८३० | AB | ७४ |
| २९. | १८३१ – १८४० | AC | ७५ |
| ३०. | १८४१ – १८५० | AD | ७५ |
| ३१. | १८५१ – १८६० | AE | ५५ |
| ३२. | १८६१ – १८७० | AF | ३४ |
| ३३. | १८७१ – १८८० | AD | ४६ |
| ३४. | १८८१ – १८९० | AH | २५ |
| ३५. | १८९१ – १९०० | AI | ३२ |
| ३६. | १९०१ – १९१० | AJ | २३ |
| ३७. | १९११ – १९२० | AK | ७ |
| ३८. | १९२१ – १९३० | AL | ५ |
| ३९. | १९३१ – १९४० | AM | ३ |
| ४०. | १९४१ – १९५० | AN | १ |
| ४१. | १९५१ – १९६० | AO | १ |
| | | एकूण | ११६२ |

# संज्ञा–संकल्पना परिचय

डॉ. राजेंद्र कुंभार

*अभ्यास करीत असताना अनेक तांत्रिक, पारिभाषिक शब्द येतात, संज्ञा येतात. त्यांचा नेमका अर्थ लक्षात आल्याशिवाय तो शब्द व तो ज्या संदर्भात वापरला आहे तो विचार नीट आकलन होत नाही आणि म्हणूनच विविध प्रकारचे पारिभाषिक शब्दकोश तयार केले जातात. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयासाठी य. च. म. मुक्त विद्यापीठाने जे वाचनसाहित्य तयार केले आहे, त्यात आवर्जून पारिभाषिक शब्द देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे, याबरोबरच ग्रंथालयाशास्त्राचा पारिभाषिक शब्दकोश हा उपलब्ध आहेच. पारिभाषिक शब्दांपेक्षाही अनेकदा अडचण येते ती संज्ञा (Concepts) समजून घेताना. संज्ञांमधील नेमका अर्थ समजून द्यावा लागतो. PDF, रेफरल सर्व्हिस इत्यादी संज्ञा आपण नेहमी सहज वापरतो; परंतु त्याचा नेमकेपणा त्यात येतोच असे नाही. यावरचा उपाय म्हणून आम्ही हे नवीन सदर सुरू करीत आहोत. या विषयातले तज्ञ डॉ. राजेंद्र कुंभार हे दर अंकात संज्ञा परिचय करून देणार आहेत.*

## (अ) पोर्टेबल डाक्युमेंट फॉर्‌मॅट (P.D.F)

इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील फाईल्सची इंटरनेटवर देवघेव करण्यासाठीचा हा फॉर्‌मॅट आहे. हा फॉर्‌मॅट म्हणजेच एक आज्ञावली आहे ती अडोब सिस्टीम्स या कंपनीने तयार केली आहे.

जगातील वेगवेगळे संगणक उपभोक्ते संगणकामध्ये माहिती साठविण्यासाठी वेगवेगळ्या आज्ञावली वापरतात. तसेच प्रत्येक उपभोक्ता वेगळ्या प्रकाराची फाईल संरचना वापरतो. प्रत्येक उपभोक्त्याच्या फाईलतील अक्षरांचा प्रकार, आकार, रंगही वेगवेगळा असू शकतो. प्रत्येकाच्या संगणकावर वेगवेगळी ऑपरेटिंग सिस्टीम असू शकते. अशा विविधता असलेल्या फाईल्सचा एक संगणकावरून दुसऱ्या संगणकावर शोध घेण्यासाठी, त्या पाठविण्यासाठी, प्रिंट करण्यासाठीचा



फॉर्‌मॅट म्हणजे PDF फॉर्‌मॅट होय. PDF फॉर्‌मॅटमधील फाईल वाचण्यासाठी त्यांची प्रिंट काढण्यसाठीची आज्ञावली (Adobe Acrobat Reader) या नावाने ओळखली जाते. ही आज्ञावली.

http://www.adobe.com/support/downloads/main.html या वेबसाईटवरून आपल्या संगणकावर मोफत संगृहीत (Download) करता येते.

## (आ) प्रलेख प्रदान सेवा (Document Delivery Service)

ग्रंथालयातील विशिष्ट प्रलेखाची झेरॉक्स प्रत (शक्यतो नियतकालिकातील लेखाची प्रत) उपभोक्त्याला त्याच्या घरी, कार्यालयामध्ये पोहोचती करणारी सेवा म्हणजे प्रलेख प्रदान सेवा. त्याला मिळालेल्या प्रलेखाची ही प्रत उपभोक्ता कायमची त्याच्याकडे ठेवू शकतो. ही प्रत त्याला ग्रंथालयात परत करावी लागत नाही. म्हणूनच या सेवेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ही सेवा बहुतांशकरून शुल्काधारित असते.

अलीकडच्या काळामध्ये बरेच प्रलेख संगणकामध्ये डिजिटल स्वरूपात साठविले जात आहेत. डिजिटल स्वरूपातील प्रलेख ग्रंथालये आता ई–मेल सोबतच्या फाईलमध्ये (Attatched File) उपभोक्त्यास पाठवीत आहेत. या सेवेला इलेक्ट्रॉनिक्स प्रलेख प्रदान सेवा असे म्हणतात. मुद्रित प्रलेखाची प्रत पाठविण्यापेक्षा इलेक्ट्रॉनिक प्रलेख प्रदान सेवा स्वस्त आहे.

## (इ) रेफरल सेवा (Referral Service)

उपभोक्ते विशिष्ट माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयात येतात. परंतु काही वेळा उपभोक्त्यास पाहिजे असलेली माहिती ग्रंथालयाकडे नसते. अशा 'उपभोक्त्यास माहितीच्या संभाव्य स्रोताकडे योग्य त्या मार्गदर्शनासह पाठविणे म्हणजे रेफरल सेवा होय.' हा संभाव्य स्रोत दुसरे एखादे ग्रंथालय, संस्था किंवा व्यक्तीही असू शकते.

कोणतेही ग्रंथालय स्वयंपूर्ण नाही या संकल्पनेतून रेफरल सेवेचा उगम झाला आहे. तसेच उपभोक्त्यास पाहिजे असलेली माहिती आपल्या ग्रंथालयात उपलब्ध नसली तरी नाही म्हणावयाचे नाही. त्याला माहितीच्या स्रोतापर्यंत पोहोचवायचेच या तत्त्वज्ञानातूनही रेफरल सेवा उगम पावली आहे.

रेफरल सेवा देण्यासाठी ग्रंथालये, संस्था, व्यक्ती यांच्याबद्दलची माहिती असणारे 'रेफरल डेटाबेसेस' व 'निर्देशिका' (Directories) यांचा वापर केला जातो.

### *संदर्भ*

(१) हिस्टोरियन डोनेट्स युनिव्हर्सिटी ऑफ बुक्स टु ठाणे इन्स्टिट्यूट, द डेली, १८ जुलै १९८८ : पृ. ६.

❑ ❑ ❑

# पत्रव्यवहार

श्याम जनार्दन दाइंगडे

'ज्ञानगंगोत्री' च्या वर्ष ५ अंक २ मध्ये डॉ. बी. ए. सन्नासे यांचा 'राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ' हा लेख प्रसिद्ध केला होता. सदर लेख डॉ. सन्नासे यांच्या एम. लिब. साठी सादर केलेल्या प्रबंधातील (२०००) निवडक भाग होता. त्यामुळे त्यात नवीन योजना, योजनेतील नवे बदल, दुरुस्त्या समाविष्ट होऊ शकले नव्हते.

पुणे येथे राहणाच्या आणि कोकण भवन, मुंबई येथील सहायक ग्रंथालय संचालकांच्या कचेरीतून 'प्रभारी सहायक ग्रंथालय संचालक' पदावरून ३१ मे २००३ रोजी निवृत झालेल्या श्री. श्याम जर्नादन दाइंगडे यांनी सदर लेख वाचून अधिक माहितीची भर घालणारे एक पत्र पाठवले. सदर पत्रासोबत अचूक व अद्ययावत माहितीचा तक्ताही पाठवला आहे. तो तसा इथे आम्ही प्रसिद्ध करीत आहेत.

Books for the millions at their Doorsteps या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या पुस्तिकेचे 'सर्वांसाठी पुस्तके' हे मराठी भाषांतर त्यांनी केले असून नॅशनल बुक ट्रस्ट तर्फे ते प्रकाशित झाले आहे.

आर.आर. एल.एफ. विषयीची अद्ययावत माहिती सदर लेखात येत नव्हती याची रुखरुख आम्हास त्या वेळी फार वाटत होती. श्री. दाइंगडे यांच्या प्रस्तुत पत्राने ती उणीव भरून निघाली आहे. त्यांच्या या विशेष सहाकार्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. वाचकांनी या अद्ययावत माहितीचा उपयोग करून घ्यावा ही विनंती.

**– संपादक**

❑❑❑

**ज्ञानगंगोत्री, वर्ष ५, अंक २**

| *क्र.* | *पृष्ठ क्रमांक ओळ क्रमांक* | *देण्यात आलेला मजकूर* | *अचूक व अद्ययावत मजकूर* |
|---|---|---|---|
| १. | ४०/९ | उपसंचालक, अनेक वर्षे | सहायक ग्रंथालय संचालक, प्रभारी उपसंचालक. |



| *क्र.* | *पृष्ठ क्रमांक ओळ क्रमांक* | *देण्यात आलेला मजकूर* | *अचूक व अद्ययावत मजकूर* |
|---|---|---|---|
| २. | ४७/(अ) (५) | सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक उपक्रमासाठी टी. व्ही. कम व्ही. सी. पी. संचासाठी समतुल्य अर्थसाहय्य. | योजनेत बदल – सुधारित योजना ''राज्य मध्यवर्ती ग्रंथालय स्तराखालील सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक उपक्रमांसाठी टी. व्ही., व्ही. सी. पी. संच किंवा ग्रंथालयातील दैनंदिन कामकाजासाठी संगणक प्राप्तीकरिता समाज निधी योजनेमधून अर्थसाहाय्य''. |
| ३. | ४७/(अ) (६) | जिल्हा स्तराखालील सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत विस्तार करण्यासाठी अर्थसाहाय्य | योजना नावात बदल. नोंदणीकृत जिल्हा ग्रंथालयांचा लभार्थी म्हणून नव्याने समावेश. सुधारित योजना नाव ''शासनाची जिल्हा ग्रंथालये वगळून (ईशान्येकडील राज्ये सोडून) कोणत्याही वर्गाच्या सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत विस्तार करण्यासाठी समान निधी योजनेमधून अर्थसहाय्य''. |
| ४ | ४७/(ब)(२) | केंद्रशासन पुरस्कृत ग्रंथालयांना साहाय्य | योजना नावात बदल. सुधारित योजना नाव ''केंद्र/राज्य शासन पुरस्कृत संस्था आणि ग्रामीण भागात सार्वजनिक ग्रंथालय सेवा पुरविणाऱ्या विद्यापीठांना अर्थसाहाय्य'' |
| ५. | ४८ (७) | ७ वी योजना देण्यात आलेली नाही | ''राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांना ग्रंथालयातील दैनंदिन कामकाजासाठी संगणक प्राप्तीकरिता असमान निधी योजना अर्थसाहाय्य'' |

| क्र. | पृष्ठ क्रमांक ओळ क्रमांक | देण्यात आलेला मजकूर | अचूक व अद्ययावत मजकूर |
|---|---|---|---|
| ६. | ४९/(अ)(४)२ | फर्निचर साधनसामग्री शब्द | फर्निचर साधनासामग्री शब्द कमी केले आहेत. |
| ७. | ५३/अर्थ साहाय्याचे प्रमाण १ | जास्तीत जास्त रु.२०,०००/- अर्थसाहाय्य | जास्तीतजास्त रु.५०,०००/- अर्थसाहाय्य (स्वयंचालित वाहन खरेदी वगळून |
| ८. | ५६/५, ६ | २ व ३ साठी जास्तीत जास्त रु.१०,०००/- | सुधारित अर्थसाहाय्य रु.२५,०००/ |
| ९. | ५८/८ | जास्तीत जास्त रु. ६,०००/- | सुधारित अर्थसाहाय्य रु.१०,०००/ - |
| १०. | ५९/अ-५ | अनुक्रमांक - २ नुसार | अनुक्रमांक - २ - नुसार |
| ११. | ६०/अ-६ | अनुक्रमांक - ३ नुसार | अनुक्रमांक - ३ - नुसार |
| १२. | ६१/१३ | ग्रंथालयात किमान ३,५०० ग्रंथ असावेत | ग्रंथालयात किमान ग्रंथ असावेत -ग्रामीण २००० -शहरी ३००० |
| १३. | ६३/१० | सुधारित तरतूद दिलेली नाही. | सुधारित तरतूद- बांधकाम करणारे पी.डब्लू, डी., सी. पी. डब्लू डी.- सारखे शासकीय माध्यम असल्यास मंजूर अर्थसाहाय्य एक हप्त्यात दिले जाईल. |
| १४. | ७०/१० | ग्रंथांची संख्या ५००० पेक्षा अधिक | ग्रंथांची संख्या- ग्रामीण ग्रंथालय ३००० पेक्षा अधिक शहरी ग्रंथालय ४००० पेक्षा अधिक |



| क्र. | पृष्ठ क्रमांक ओळ क्रमांक | देण्यात आलेला मजकूर | अचूक व अद्ययावत मजकूर |
|---|---|---|---|
| १५. | ७०/अर्थसाहाय्या चे प्रमाण -४ | ग्रंथ खरेदीसाठी रु.१५,०००/- | ग्रंथ खरेदीसाठी रु.१५०००/- प्रतिवर्षी |
| १६. | ७६/४ | ग्रंथ, फर्निचर खरेदी रक्कम दर्शविलेली नाही | ग्रंथ, फर्निचर खरेदी रु.५०००/- |

## ग्रंथपारखी नजर - ८

अहमदाबादमध्ये कार्यालयीन कामासाठी गेलो असता तेथील एलिस ब्रिजच्या पायथ्याशी असलेल्या 'न्यू ऑर्डर बुक कंपनी' नावाच्या दुर्मीळ ग्रंथविक्रेत्याच्या दुकानात शिरलो. त्याचे मालक दिनकरभाई त्रिवेदी अत्यंत मिठास वाणीचे; पण पक्के व्यवहारी. दुर्मीळ ग्रंथविक्रीच्या व्यवसायात जागतिक कीर्ती मिळवलेले. त्यांच्याकडील ग्रंथांची स्थितीही उत्तम असे, अन् किमतीही तितक्याच उत्तम. अमेरिकनांनाही त्या किमती अधिक वाटत. पण दिनकरभाई कधी बधले नाहीत. माझ्यावर त्यांचा लोभ बसायला काही वर्षं लागली. अहमदाबादमध्ये एकदा कर्फ्यू असताना मी त्या शहरात पोहोचलो. दिनकरभाईंना फोन केला. त्यांनी रिक्षाचालकाला योग्य सूचना देऊन त्यांच्या बंगल्यापर्यंत आणावयास सांगितलं. दिनकरभाईंचा पाहुणा म्हणून मी त्यांच्याकडे काही दिवस राहिलो. तेव्हा ध्यानात आलं की, आंतरराष्ट्रीय बौद्धिक जगतात सर्वपरिचित असलेल्या दिनकरभाई त्रिवेदींच्या दृष्टीनं ग्रंथप्रेमीचं स्थान तिहेरी आहे. पाँडिचेरीच्या अरबिन्दो आश्रमात जसं भक्तांसाठी आऊटर सर्कल, इनर सर्कल, इनरमोस्ट सर्कल असं तिहेरी स्थान असल्याचं मानलं जातं ना, तसं. दिनकरभाईंच्या लेखी मी त्यांच्या इनरमोस्ट सर्कलमध्ये सामील होतो की नाही, मला कधी कळलं नाही. पण निदान इनर सर्कलपर्यंत पोहोचलो होतो, असं मला वाटतं. आता दिनकरभाई त्रिवेदी गेले. अहमदाबादची 'न्यू ऑर्डर बुक कंपनी' कुणी पुढं चालवतं आहे की नाही, हेही मला माहीत नाही. मला मात्र त्यांच्याकडून जे ग्रंथ मिळवता आले, बघता आले, त्यांचं अस्तित्वही पूर्वी ज्ञात नव्हतं. उदाहरणार्थ, *'द लिटररी रिमेन्स ऑफ डॉ. भाऊ दाजी'* हा अ. का. प्रियोळकरांनाही न मिळालेला ग्रंथ मला दिनकरभाईंनीच दिला.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी

पृ. ३५-३६.

# लेखक परिचय

**डॉ. प्रदीप कर्णिक :** मुंबईच्या डी. जी. रूपारेल महाविद्यालयात २१ वर्षांपासून ग्रंथपाल. विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध. वर्तमानपत्रे व नियतकालिकांतून सातत्याने लेखन, य. च. म. मुक्त विद्यापीठाच्या कार्यात सक्रिय सहभाग.

**डॉ. सु. प्र. सातारकर :** स्वामी रमानंद तीर्थ मराठावाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख. पीएच. डी. साठी मार्गदर्शक. विविध लेख प्रकाशित. Personnel Management in College Libraries या पुस्तकाचे लेखक.

**मोहन पाठक :** 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक. ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल. य.च.म.मु. विद्यापीठाच्या बी.लिब./एम.लिब. चे केंद्र संयोजक. 'दिशा' मासिकाचे संपादक. विविध वृत्तपत्रांतून सातत्याने लेखन.

**श्री. मधुकर शेवाळे :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात गेली १४ वर्षे सहायक ग्रंथपाल म्हणून कार्यरत. विद्यापीठाच्या बी. लिब. व एम. लिब. शिक्षणक्रमाच्या विकसन कार्याचे संयोजक. नाशिकच्या एच. पी. टी. महाविद्यालयात १९९० ते १९९४ या कालावधीत 'अभ्यागत प्राध्यापक' म्हणून काम. मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब. व एम. लिब. शिक्षणक्रमाचे १९९६ पासून मार्गदर्शक प्राध्यापक. १९९८ मध्ये हाँगकाँग येथे भरलेल्या आशियायी ग्रंथपालांच्या परिषदेत पेपर वाचन.

**जगदीश कुलकर्णी :** स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयात सहायक ग्रंथपाल म्हणून कार्यरत. 'ज्ञानगंगोत्री' मध्ये लेखन समाविष्ट.

**सचिन गराटे :** मुंबईच्या डी. जी. रूपारेल महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कार्यरत. य. च. म. मुक्त विद्यापीठातर्फे एम. लिब. पूर्ण. 'ज्ञानगंगोत्री' मध्ये लेखन प्रसिद्ध.

**प्रा. अविनाश कोल्हे :** मुंबईच्या डी. जी. रूपारेल महाविद्यालयात राज्यशास्त्र या विषयाचे प्राध्यापक. स्तंभलेखक. इंग्रजी व मराठीतून अनेक लेख प्रसिद्ध. भारताचे पतंप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पुस्तकाचा अनुवाद प्रसिद्ध.

**कै. प्रा. दत्तो वामन पोतदार :** प्रसिद्ध इतिहास संशोधक, शिवचरित्राचे अभ्यासक. ग्रंथकर्ते, लेखन आणि प्रख्यात वक्ते.

**अर्चना पुजारी :** मुंबई राजीव गांधी इंजिनीअरिंग महाविद्यालयात ग्रंथपाल. य. च. म. मुक्त विद्यापीठाची एम. लिब. पदवी उत्तीर्ण. 'ज्ञानगंगोत्री'मध्ये लेखन प्रसिद्ध.

**श्याम जनार्दन दाइंगडे :** सहायक ग्रंथालय संचालक, कोकण भवन, नवी मुंबई येथून 'प्रभारी सहायक ग्रंथालय संचालक' पदावरून निवृत्त. भारती विद्यापीठ, पुणे येथे M. Lib साठी समंत्रक. सर्वांसाठी पुस्तके हा अनुवाद NBT तर्फे प्रकाशित.

**डॉ. राजेंद्र कुंभार :** नाशिकच्या एच. पी. टी. महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागात प्रपाठक. मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब. व एम. लिब शिक्षणक्रमासाठी पुस्तक लेखन तसेच नाशिक अभ्यासकेंद्राचे शिक्षणक्रम संयोजक.

# LIB 013
# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी

*संपादक*

डॉ. रमेश वरखेडे

*कार्यकारी संपादक*

प्रदीप कर्णिक

*संपादक मंडळ*

श्री. मधुकर शेवाळे

श्री. प्रवीण घोडेस्वार

डॉ. राजेंद्र कुंभार

श्री. नागार्जुन वांजरवाडकर

*व्यवस्थापक*

श्री. मधुकर शेवाळे

© २००५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

श्री. सुहास पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक – ७

*प्रकाशक*

कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

# ज्ञानगंगोत्री

**वर्ष ६ वे — सप्टेंबर–ऑक्टोबर–नोव्हेंबर २००५ — अंक २**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| ❏ संपादकीय | : | | २ |
| ❏ प्रा. जे. एच. शेरा यांची तत्त्वप्रणाली – भाग १ | : | प्रदीप कर्णिक | ५ |
| ❏ माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथपालांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या | : | डॉ. सु. प्र. सातारकर | २१ |
| ❏ माहितीचे मूल्यनिर्धारण व तदनुषंगिक प्रश्न | : | प्रा. मोहन पाठक | २८ |
| ❏ मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब. शिक्षणक्रमातील स्वयं–अध्ययन पुस्तकांच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास | : | मधुकर शेवाळे | ३३ |
| ❏ आंतरराष्ट्रीय ग्रंथ व स्वामित्व हक्क दिन : २३ एप्रिल | : | जगदीश एन. कुलकर्णी | ४२ |
| ❏ अहमदाबाद लायब्ररी नेटवर्क (ॲडिनेट) | : | सचिन गराटे | ४६ |
| ❏ ग्रंथपरिचय | : | प्रा. अविनाश कोल्हे / प्रा. मोहन पाठक / प्रदीप कर्णिक | ५२ |
| ❏ वेब | : | प्रा. मोहन पाठक | ६२ |
| ❏ अजून ताजा वास जुन्याला | : | प्रा. दत्तो वामन पोतदार | ६४ |
| ❏ प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे यांचे ग्रंथालय | : | अर्चना गराटे | ६७ |
| ❏ संज्ञा–संकल्पना परिचय | : | डॉ. राजेंद्र कुंभार | ८६ |
| ❏ पत्रव्यवहार | : | श्याम जनार्दन दाइंगडे | ८८ |



| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. ५० | व्यक्ती : रु. २५ |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. २०० | व्यक्ती : रु. १०० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन –** प्रा. मधुकर शेवाळे, सहायक ग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) –** प्रदीप कर्णिक, ३०१, टॉवर नंबर १, फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा, ठाणे (प.) – ४०० ६०१.

● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.